CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

भारत-इतिहास-संशोधक-मंडळ, स्वीय ग्रंथमाला क्र. ८९

ऐतिहासिक संकीर्ण साहित्य

१० वा खंड

कोंकणच्या इतिहासाचीं साधनें

संपादक
श्री. शां. वि. आवळसकर
शिवचरित्रसाहित्य खंड ९ व १०, आंगरेकालीन अष्टागर,
आंगरेकालीन पत्रव्यवहार, इत्यादि पुस्तकांचे संपादक

4767

शक १८७८] किंमत ५ रु. [इसवी १९५७

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

निवेदन

येथें प्रकाशित होत असलेलें पुस्तक म्हणजे सदतिसाव्या वर्षाचें मंडळ त्रैमासिक होय. या पुस्तकांत पेशवेकालीन साधनें प्रकाशित झालीं असल्यानें यास 'ऐतिहासिक संकीर्ण साहित्य १० वा खंड' असें नांव दिलें आहे. यांत दुसऱ्या बाजीरावाच्या काळांतलीं आणि कोंकणांत मिळालेलीं साधनें प्रकाशित केलीं आहेत. श्री. शां. वि. आवळसकर मराठी इतिहासाचे एक साक्षेपी संशोधक, संग्राहक व संकलक आहेत हें मंडळसभासदांना तरी नव्यानें सांगण्याची आवश्यकता नाहीं. त्यांचा कोंकणांतील मराठी इतिहासाचीं साधनें जमविण्याचा उद्योग आज कित्येक वर्षें अव्याहत चालू आहे. त्यांनीं जमविलेल्या सामग्रीचीं तीन पुस्तकें मंडळानें आजवर प्रकाशित केलीं असून हें चवथें आहे. या पुस्तकाच्या, प्रुफें तपासण्यासुद्धां, संपादनाचें सर्व काम त्यांनींच केलें आहे. याबद्दल मंडळास अतिशय संतोष वाटतो. येवढेंच नव्हे तर या प्रकाशनाचा आर्थिक भारहि अंशतः त्यांनीं उचलला असल्यानें त्या संतोषांत अधिकच भर पडते.

दुसऱ्या बाजीरावकालीन इंग्रजी साधनें इतकीं व अशा प्रकारचीं उपलब्ध तसेंच प्रकाशित झालीं आहेत कीं, त्यापुढें आमचीं मराठी साधनें फिकी पडतात. पण याच मुद्यावर कोणी केवळ इंग्रजी साधनांवरून या काळाचा इतिहास लिहूं पाहील तर तो निःसंशय एकांगी होईल. घटनांचे इंग्रजी साधनांतील अर्थ वेगळे आणि मराठी साधनांतील त्याच घटनांचे अर्थ वेगळे असें अनेक ठिकाणीं असण्याचा संभव आहे. तसेंच कित्येक लहानमोठ्या घटना व त्यांचे अर्थ केवळ मराठी साधनांमुळेंच माहीत होतात. म्हणून मराठी साधनेंहि उपलब्ध करून देणें आवश्यक आहे. या दृष्टीनें अशा प्रकारच्या प्रकाशनांकडे पहावयाचें आहे.

या पुस्तकाच्या सूचीमध्यें लेख व पृष्ठें अशा दोहोंचेही आकडे आहेत. पृष्ठांच्या आकड्यांमागें तसा स्पष्ट पण एकदांच निर्देश आहे. लेखांच्या आकड्यांमागें कोणताच निर्देश नाहीं. लेखांचे आकडे नेहमींच पृष्ठांच्या आकड्यांपूर्वी आहेत.

श. १८७८ माघ शु.१०, ता.१०।२।५७ **चिटणीस**

प्रकाशक : **श्री. शं. ना. जोशी** व **श्री. ग. ह. खरे**, चिटणीस,
भा. इ. सं. मंडळ, ३१३अ, सदाशिव पेठ, पुणें २.
मुद्रक : **केशव गणेश शारंगपाणी**, आर्यभूषण मुद्रणालय,
९१५/१ शिवाजीनगर, पुणें ४.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

भारत-इतिहास-संशोधक-मंडळ, स्वीय ग्रंथमाला क्र. ८९

ऐतिहासिक संकीर्ण साहित्य

१० वा खंड

कोंकणच्या इतिहासाचीं साधनें

संपादक
श्री. शां. वि. आवळसकर
शिवचरित्रसाहित्य खंड ९ व १०, आंगरेकालीन अष्टागर,
आंगरेकालीन पत्रव्यवहार, इत्यादि पुस्तकांचे संपादक

4767

शक १८७८] किंमत ५ रु. [इसवी १९५७

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

भा. इ. सं. मंडळांत सध्या चालू असलेलीं कांहीं कामें

१ पत्रसूची

मंडळांत असलेल्या कागदपत्रांचें स्वरूप नीट समजेल अशा प्रकारचें सुमारें ३०० पृष्ठांचें पुस्तक तयार करून प्रकाशित करणें.

२ पोथीसूची

मंडळांतील अदमासें सोळा हजार हस्तलिखित ग्रंथांची वर्णनात्मक सूची तयार करून प्रकाशित करणें.

३ नाणकसूची

मंडळांतील सुमारें पांच हजार नाण्यांची सूची तयार करून प्रकाशित करणें.

४ चित्रसूची

मंडळांत असलेल्या जुन्या एक हजारांहून अधिक चित्रांची तपशीलवार वर्णनात्मक सूची तयार करून प्रकाशित करणें.

५ फार्सी पत्रव्यवहार

मंडळांत असलेले कांहीं महत्त्वपूर्ण शिवशाही व पेशवाई कागद सारांश, टीपा, इत्यादींसह प्रकाशित करणें.

६ मंडळचित्रगुच्छ

मंडळांतील कांहीं अप्रतिम चित्रें बहुरंगी रूपांत प्रकाशित करणें.

७ मराठी इतिहासाची शकावली

मराठी इतिहासाच्या लेखनांत समकालीन मराठी पत्रांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. पण त्यांतील अपूर्ण कालनिर्देशांमुळें त्यांचा नीट उपयोग करतां येत नाहीं. म्हणून मराठी इतिहासाची विस्तृत शकावली तयार करण्याचें काम पुणें विद्यापीठाच्या साह्यानें गेलीं पांच वर्षें मंडळ करीत आहे अजून दहा वर्षें तें काम सहज चालेल, चालविलें पाहिजे.

विनंति

या सर्व योजनांसाठीं केंद्र व मुंबई अशीं दोन्ही सरकारें आणि पुणें विद्यापीठ यांजकडून साह्य मिळालें आहे, मिळत आहे. पण तें अपुरें पडत असल्यानें जनतेनेंहि साह्य करावें अशी कळकळीची विनंति आहे.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

प्रस्तावना

कोंकणच्या इतिहासाच्या साधनांचा हा 'दुसरा बाजीराव खंड' वाचकांस सादर करण्यांत मला आनंद होत आहे. कोंकणांतील ऐतिहासिक साधनें नकलून घेत असतांना दुसऱ्या बाजीरावाचे काकिर्दीबद्दल माहिती सांगणारीं सुमारें दोनशें तत्कालीन पत्रें हातीं आलीं; त्यांतील एक्यायशी येथें प्रसिद्ध होत आहेत. उरलेलीं साधनेंहि केव्हां तरी वाचकांच्या पुढें ठेवण्याची आशा मी बाळगून आहे. याशिवाय, इ. स. १६९५ ते १७९५ पर्यंतच्या इतिहासाचीं शेंकडों साधनें मजजवळ पडून आहेत; त्यांचेंही प्रकाशन होईल अशी आशा करावयास हरकत नाहीं. भारत इतिहास संशोधक मंडळानें हीं साधनें प्रसिद्ध करण्यास मम म्हटलें, याबद्दल मी मंडळाचा ऋणी आहे. भारताच्या इतिहासाचीं साधनें अमूप आहेत; पण तीं प्रकाशांत आणणाऱ्या संस्थांची उणीव आहे. हीं साधनें प्रकाशित कशीं होतील व राष्ट्राच्या इतिहासाचें सत्य स्वरूप कसें उघड होईल, याबद्दलचीच काळजी संशोधकांस वाटत असते. सरकारनेंच याबाबत कांहीं तरी निश्चित योजना आखून हें काम तातडीनें उरकावयास पाहिजे, अशी वस्तुस्थिति आहे. पण सरकारला वेळ नाहीं व याबद्दल फारशी आस्था नाहीं.

येथें प्रसिद्ध होत असलेल्या साधनांची उपलब्धि अनेक ठिकाणच्या सद्गृहस्थांच्या दप्तरांतून झाली आहे; त्यांचा तक्ता पुढें देतोः—

(१) **तळें**– श्री० रामचंद्र विठ्ठल भट– ले. १. (२) **पोलादपूर**– कै० रावजी गोविंद चित्रे– ले. २, ९, १२, १६, २२, २३, २७ ते २९, ४९, ६४, ७५, ७७, ७८ व श्री० विष्णुपंत चित्रे– ५९, ७२, ८१. (३) **चौल**– कै० वासुदेवराव अधिकारी–ले. ४, ६, ६३. (४) हुजूर **रेकॉर्ड्स् जंजिरा**–ले. ३, ७, ८, १०, १३ ते १५, १९, २०, २४ ते २६, ४७, ४८, ७१, ७३, ७४. (५) **वाळण बुद्रुक**– श्री. तुकाराम झुरू कालगुडे– ले. ५ (६) **अलीबाग**– श्री. केशवलाल मोदी– ले. ११. (७) **विम्हेरें**– श्री० शिवाजीराव व बाबूराव दळवी– ले. १७, १८, २१, ३० ते ३९; ४१ ते ४६, ५० ते ५४, ५६, ५७, ६० ते ६२, ६५ ते ७०, ७९, ८०. (८) **वरंध**– श्री. विष्णु रामचंद्र देशमुख– ले. ४०, ७६. (९) **नांदवी**– श्री० सुभेदार आबा सावंत– ले. ५५. (१०) **महाड**– श्री० यशवंतराव टिपणीस–ले. ५८.

वर उल्लेख केलेल्या व्यक्तींच्या साह्याबद्दल मी त्यांचा सादर आभारी आहे. जंजिरा संस्थान भारतांत विलीन झाल्यावर तेथील 'हुजूर रेकॉर्ड्स्' ही मुंबई सरकारची मालमत्ता झाली. या दप्तरांतील साधनें पहाण्यास व नकलून घेण्यास मला मुंबई सरकारचे डायरेक्टर ऑफ आर्काइव्ज व हिस्टॉरिकल मॉन्युमेंट्स् डॉ. पी. एम्. जोशी व अन्य अधिकारी मंडळी यांनीं संमति दिली त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

दुसऱ्या बाजीरावाची कारकिर्द तपशीलवार सांगणारीं साधनें इंग्रजींतून फार मोठ्या प्रमाणावर प्रकाशित झालीं आहेत. त्यांच्या अभ्यासानें आपणांस इ. स. १७९६ ते १८१८ या तेवीस वर्षांच्या काळांतील इतिहासाची कल्पना येते. पण या साधनांतून आपल्याला जो दृष्टिकोन समजतो, तो इंग्रजांचा म्हणजे तत्कालीन शत्रु किंवा मराठ्यांच्या

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

प्रतिस्पर्धी सत्तेचा आहे. शत्रुराष्ट्राचा दृष्टिकोन नेहमींच दूषित असतो व त्या दृष्टिकोनांत पराभूत होणाऱ्या राष्ट्रांतील दोषांचें चित्र अतिरंजित केलेलें असतें, ही गोष्ट स्वयंसिद्ध आहे. अशा साधनांवरून कळणाऱ्या इतिहासाची मातबरी कोणी मानीत नाहीं. इंग्रजींतून प्रसिद्ध झालेलीं साधनें ही भारताच्या इतिहासाची, फार तर, एक बाजू होऊं शकेल. त्यामुळें मराठी साधनें प्रसिद्ध होण्याची जरूरी वाढते. थोडें अतिरिक्त विधान असें करतां येईल कीं इंग्रजी साधनें साक्षेपानें प्रसिद्ध झालीं, म्हणूनच मराठी साधनें प्रसिद्ध करण्याची जरूरी तीव्रतर झाली आहे.

म्हणूनच कै० खरेशास्त्री यांच्या ऐतिहासिक लेखसंग्रहांत प्रसिद्ध झालेल्या मराठ्यांचा दृष्टिकोन सांगणाऱ्या पत्रांचें वाचकांस महत्त्व वाटतें. पण खरेशास्त्र्यांच्या ग्रंथांत कोंकणविषयक साधनें थोडींच प्रसिद्ध झालीं आहेत; म्हणून, ज्यांतून कोंकणविषयक इतिहास समजेल अशीं साधनें वाचकांपुढें ठेवण्याची जरूरी निश्चितच आहे; या विचारप्रणालींतून हें पुस्तक निर्माण झालें आहे. गायकवाड, शिंदे, होळकर, यांच्या दप्तरांतील साधनें प्रसिद्ध झालीं आहेत; पण त्यांतही कोंकणविषयक मजकुराचा अभाव ठळकपणें जाणवतो हें ध्यानीं घेतलें म्हणजे कोंकणच्या इतिहासाचीं साधनें शोधण्याच्या खटाटोपाची जरूरी उघड होते. कोंकणांत संस्थानें नाहींत, म्हणून दप्तरें एकत्र मिळण्याची सोय नाहीं. ठिकठिकाणीं हिंडून, गळ घालून, विश्वास उत्पन्न करून, पदरमोड करूनच हें कार्य करावें लागतें व तसें करण्यांत अनेक वर्षें मीं घालविलीं आहेत. खाजगी व्यक्तींचीं दप्तरें तपासण्याची परवानगी मिळविणें हें एक दिव्य असतें. कांहीं दप्तरें किलकिलीं होण्यास अक्षरशः तपश्चर्या करावी लागली. येथें प्रसिद्ध होत असलेले कांहीं कागद नकलण्याची परवानगी मिळण्यासाठीं मला सात वर्षें खटपट करावी लागली; पण हें काम मीं इतिहासावरील प्रेमानें प्रेरित होऊन केलें आहे. त्याबाबत माझी तक्रार नाहीं; फक्त वस्तुस्थिति दिग्दर्शित केली आहे.

आपल्या इतिहासाचीं साधनें सर्वत्र विखुरलीं असून कोणत्या प्रदेशांतील साधनें कोठें गवसतील याचद्दल धरबंध उरलेला नाहीं. चौल हा आंग्र्यांचा गांव; पण तेथें गायकवाडींतील गंगाधरशास्त्री पटवर्धनांचद्दल पत्रें पहावयास मिळालीं! विन्हेरें हा गांव रायगडापासून वीस मैलांवर कुलाबा जिल्ह्यांत आहे; तेथें ब्यारें, सोनगड, धरमपूरकडील इतिहासाचीं साधनें उपलब्ध झालीं!! पोलादपूर हें गांव महाडपासून केवळ अकरा मैलांवर आहे. तेथें कोंकणच्या इतिहाससाधनांबरोबर गुजराथच्या इतिहासाचीं साधनें व तींही अस्सल स्वरूपांत आढळून आलीं. इतिहाससंशोधन करीत असतांना या साधनांस डावलून पुढें जाणें शक्य नाहीं; कारण प्रादेशिक इतिहास शोधावयाचा, तो तरी राष्ट्रीय इतिहास परिपूर्ण करण्यासाठींच ना! मग तीं साधनें बाजूस टाकून कसें चालेल? यामुळें, या लहानशा पुस्तकांत गुजराथ, पुण्याकडील महाराष्ट्र व प्रत्यक्ष कोंकण या तीन प्रदेशांचीं साधनें एकत्र आलीं आहेत हें वाचकांनीं ध्यानीं आणावें.

सवाई माधवरावाच्या मृत्यूबद्दल प्रभाकर शाहिरानें जो दीर्घ पोवाडा लिहिला आहे,

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

त्यांत बाजीरावाबद्दल एका वाक्यांत निर्देश केला आहे. 'इथुन अतां प्रारंभ दिसंदिस अद्भुत प्रलयाला!' या वाक्यांत मराठ्यांच्या शेवटच्या तेवीस वर्षांच्या इतिहासाचें सार आलें आहे, असें मानावयास हरकत नाहीं. प्रस्तुत पुस्तकांत त्या अपेशी कारकिर्दीबद्दलचीं साधनें प्रसिद्ध होत आहेत. इसवी १८०० ते १८०५ या कालांत सुरत अठ्ठाविशींत आणि तींत असलेल्या संस्थानांवर असलेली मराठी सत्ता उत्तरोत्तर कशी दुबळी होत गेली, याचें दिग्दर्शन करणारीं कॅप्टन हॉर्टन व हणमंतराव दळवी हवालदार किल्ले पारनेरा यांचीं अनेक पत्रें येथें दिलीं आहेत. वसईच्या कुप्रसिद्ध तहानंतर लवकरच मराठे किल्लेदार, कमाविसदार व सुभेदार यांना या प्रदेशांतुन आपलें चंबूगवाळें आटपून मराठी प्रदेशांत यावें लागलें. या प्रदेशांत केवढी दैना उडाली याचें चित्र सोनगडच्या एका पत्रांत नमूद करण्यांत आलें आहे. सोनगडचा किल्ला मोडकळीस आला, तेथें धान्य नाहीं, दारूगोळा नाहीं व अधिकाऱ्यांना त्याची फिकीर नाहीं, असा स्पष्ट मजकूर सांगणारीं पत्रें या पुस्तकांत आलीं आहेत. गुजराथच्या इतिहासाचें एतत्कालीन भयानक चित्र मुळांतून वाचकांनीं पहावें. ले. ५९ हें प्रदीर्घ पत्र गायकवाडींतील सैन्याची हलाखी सांगतें. सैन्यास अनेक महिन्यांचे रोजमुरे नाहींत, पगार थकला आहे, बेदिली माजली आहे व संस्थानिक कर्जबाजारी झाल्यामुळें पुढील वर्षाचे शेतसारे व ऐवज वसूल केल्याचे स्पष्ट निर्देश या पत्रांत आहेत. फणसे मंडळी ही गायकवाडांची कारभारी मंडळी. त्यांना इंग्रजांच्या कच्छपी कां लागावें लागलें, याची उपपत्ति वरील पत्राच्या वाचनानें लागते. गायकवाडांतील सयाजीराव, गोविंदराव इत्यादिकांचे चुरशीचे संबंध या पत्रांतुन आले आहेत; भिल्ल आणि भुमे यांच्या उपद्रवाचे उल्लेख आले आहेत; जकातीच्या भानगडी-भांडणें आहेत.

चित्रे दप्तरामधील मजकूर प्रामुख्यानें कोंकणच्या व पुण्याकडील महाराष्ट्राच्या इतिहासाशीं निगडित आहे. पुण्याजवळील शिंदेहोळकरांची लढाई, शिंद्यांचा पराभव, बाजीराव आणि चिमाजीआप्पा यांचें पलायन, त्यांचे बीरवाडी, महाड, नळें येथील मुक्काम, त्यांचें वसईस जाणें, त्यांचेबरोबर वसईस इंग्रजांकडे गेलेली मंडळी, मातुश्री यशोदाबाईंचें रायगडावर रहाणें, होळकराच्या सैन्याचें रायगडच्या परिसरांत आगमन, बाळण येथें तीन सैन्यांचे युद्धाच्या तयारीनें मुक्काम, यांबद्दलचा मजकूर क्रमवार समजण्यास चित्रेदप्तरांतील कागदांचा उपयोग होईल. कै. खरेशास्त्री यांच्या ऐतिहासिक लेखसंग्रहांतुन या प्रकरणीं कांहीं मजकूर आला आहे. इतिहासलेखन न्यायाधिशाच्या निःपक्षपाती दृष्टींतुन व्हावें, यासाठीं अनेक साक्षीदारांच्या साक्षी-कैफियती इतिहासकारापुढें असल्या पाहिजेत. अनेक ठिकाणच्या लेखकांनीं एक गोष्ट निश्चित झाल्याचें सांगितलें, म्हणजे ती गोष्ट झाली, असें मानण्याची पद्धति आहे. प्रत्यंतर पुराव्याचें महत्त्व इतिहासांत फार आहे व हा प्रत्यंतर पुरावा सादर करणारा लेखक स्वतंत्र असला पाहिजे असा सिद्धांत आहे. येथें प्रसिद्ध होणारा मजकूर प्रत्यंतराचा स्वतंत्र पुरावा म्हणून मान्य करण्यास प्रत्यवाय नाहीं, इतक्या तोलाचा आहे. शिवाय हा पुरावा त्या

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

त्या वेळींच नोंदला गेलेला असल्यानें त्यास महत्त्व आहे. बाजीरावाच्या पलायनाचा मुक्कामांसह मार्ग, बीरवाडीच्या रयतेची त्रेधा या पत्रांतून स्पष्ट दिग्दर्शित झाली आहे.

हुजूर रेकॉर्डस्‌मधील साधनांचें महत्त्व तर फार मोठें आहे. पेशवेकालांत पुण्यास निरनिराळ्या सत्तांचे वकील आपल्या विवाद्य मुद्यांचा फडशा करून घेण्यासाठीं रहात असत. जंजिऱ्याच्या शिद्दीचे असे मुद्दे असत आणि नसल्यास उत्पन्न करण्याचा नाठाळपणा शिद्दीमध्यें भरपूर होता. शिद्दीच्या प्रदेशास लागून तीन बाजूंनीं मराठी प्रदेश असल्यानें शिद्दीचा वकील पुण्यास असावयाचाच! ज्या काळांतील साधनें येथें प्रसिद्ध होत आहेत, त्या काळांत राघो बहिरव, भिकाजी नाईक व वामनराव जनार्दन हीं तीन माणसें शिद्दीच्या वतीनें पुण्यास वावरतांना दिसतात. यांपैकीं वामनराव जनार्दन हा वकील आहे. या तिघांचीं पत्रें मोठीं मासलेवाईक आहेत. बाजीरावाच्या कारकिर्दीत शिद्दीनें पोलादपूर, रायगड, नातें, देवळें इ. अनेक जागीं जाळपोळ केली; त्याबद्दलचे कागदपत्र येथें प्रसिद्ध झाले आहेत. शिद्दीनें धर्मांतराचें कार्य चालवावें म्हणून वामनराव जनार्दन त्यास प्रोत्साहन देत असल्याचा प्रकार तर मति गुंग करून सोडणारा आहे! रेवदंड्याच्या किल्ल्यास शिड्या लावून तो घेण्याच्या प्रयत्नांबाबत, कैदी सोडण्यासाठीं ऐवज व ऐनजिनसी खंड मिळण्याबाबत, शिद्दीनें केलेल्या प्रयत्नांचीं टिपणें या लेखांत अंतर्भूत झालीं आहेत. बापू गोखल्याची वासोट्यावरील स्वारी या पत्रांत आली आहे.

या लहानशा पुस्तकांत ऐतिहासिक गोष्टींची विविधता आढळून येईल. अमृतराव पेशवे, बळवंतराव नागनाथ, दौलतराव शिंद्याच्या हालचाली, यांबद्दलही उल्लेख आढळतील. आलीबागच्या मोदी घराण्यांतील एकच लेख येथें प्रसिद्ध केला आहे. आंगऱ्यांना लागणाऱ्या वस्तु मोदी यांनीं कोणत्या अटींवर पुरवावयाच्या याबद्दलचा हा लेख महत्त्वाचा आहे. तसेंच, अगदीं आरंभींची तळें शकावली स्थानिक इतिहासाचे दृष्टीनें महत्त्वाची आहे. इतिहासांत राजकारणाइतकेंच समाजकारणास महत्त्व असल्यानें ही शकावली धार्मिक परिस्थितीबाबत उद्‌बोधक म्हणून अभ्यसनीय आहे.

प्रस्तुत पुस्तकांतील सर्व मजकूर वाचकांपुढें ठेवण्याचें श्रेय जरी माझें एकट्याचें असलें, तरी या साधनांच्या अभ्यासांत मला श्री. ग. ह खरे यांची बहुमोल मदत झाली आहे. जंजिऱ्याच्या शिद्दीच्या वकिलांनीं पुण्याहून लिहिलेलीं पत्रें स्वरूपानें थोडीं वेगळीं आहेत, त्यांतून फार्सी शब्दांचा भरणा बराच आढळतो व त्यांचें वाचन दुरुस्त करण्यांत त्यांचें साह्य मीं घेतलें. लेखांची निवड करतांनाही त्यांची मदत झाली आहे. इतिहास-संशोधनांत, संशोधित मजकुरावर चर्चा होणें जरूर असतें. अशी चर्चा करण्यास मला, मी सध्या पुण्यासच असल्यानें संधि मिळाली ही समाधानाची गोष्ट आहे.

इतिहासप्रेमी रसिक वाचक या पुस्तकाचें सहर्ष स्वागत करतील, अशी मला आशा आहे.

शक १८७८, मकरसंक्रमण
ता. १०-१-१९५७, पुणें.

शां. वि. आवळसकर.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

भारत इतिहास संशोधक मंडळ

ऐतिहासिक संकीर्ण साहित्य–१० वा खंड

ले. १ } तळें-शकावली {

[ही शकावली मला कसबे तळें तालुके माणगांव जिल्हा कुलाबा येथें रा. रामचंद्र विठ्ठल भट यांजकडे मिळाली. शकावलींतील मजकूर सर्व शाबूत आहे. शिवराज्याभिषेक आणि शिवछत्रपति व शाहूराजे यांचा मृत्यु यांवद्दलच्या तीन नोंदी वगळून बाकीची संपूर्ण शकावली येथें क्रमानें दिली आहे. स्थानिक इतिहासाचे दृष्टीनें शकावली महत्त्वाची आहे. ज्या घराण्यांत ही उपलब्ध झाली, तें भट घराणें श्रीवर्धनकर भटांपैकीं, म्हणजे पेशव्यांचीच एक शाखा होय. जुने कागद वाचण्याचे कामीं, या घराण्यांतील कर्ती माणसें चांगलीं तरबेज आहेत. जरूर तेथें त्यांची मदत घेऊन ही नक्कल केली आहे. शकावलीचें मूळ सध्या त्यांचेकडेच आहे. या शकावलीचे संदर्भानें भा. इ. सं. मं. च्या ऐतिहासिक संकीर्ण साहित्य खंड ३ पृ. ७५ ते ९४ मधील 'सुभेदारांच्या कारकिर्दी सुभा तळें' हें प्रकरण अभ्यासकांनीं पहावें.]

१ कसबे तळे येथे श्रीहरिहरेश्वर याचें देवालय आहे याचें जोते व जिवरखि प्राचीन बहुकाली आहे वडिलांचे मुखें कसबे मजकूरचा कुळकार्णि ब्राह्मण होता त्याणि हे काम केले आहे ॥ याप्रमाणे ऐकण्यात आहे ॥

२ कसबे मजकुरी श्रीगणपतीचे जीवरखीचे काळे चिऱ्याचें काम प्राचीन आहे ते कसबे मजकूरचे जोशी याणि केले आहे म्हणोन वडिलावडिली बोलण्यांत आहे अलिकडे महादेव जोशी बिन बाळ जोशि प्रमुख सर्व जोशि यांही वर्गणी करून जांबेत्री चिऱ्यांचे जोते मोठे बाधून त्यावर लाकडी देवालय बांधिलें श्रीची मूर्ति कांहीं विच्छिन्न जाहली होती तिहि लुकण शेंदुर लाउन सावयव नीट केली आणि श्रीची महाअर्चाशुद्धि सर्व मिळोन केली

३ [इ. १७७३] ॥ श्री ॥ हकीकत परशुराम जोशी तळेकर — आपले आजे चिंतामण जोशि हे शामलाचे दंग्यात **शके १६९५** हे शकीं शामलानी काही आकसामुळें कसबे मजकुरी मारलें नंतर त्याची स्त्री लाहान पुत्र दोन एक अडीच वर्षांचा व एक आगावरचा असे होते ते घेऊन आपले माहेरी नाशिक क्षेत्र येथे गेली त्या काळापासून आपले वतन वगैरे सर्वस्वाची वाताहत जाहली नाशिक येथे दोन मूल होते त्यातील मोठा मूल वारला पुढे त्याची मातोश्री मृत्यु पावली पुढे काही दिवस लहान मुलगा होता त्याचे प्रतिपाळण मातुळानी करून मुंजीही केली नंतर तो मातुळ निधन पावला पुढे तो मुल श्रीभद्रकाळीचे मठात राहुन क्षेत्री माधुकरी मागुन विद्या संपादन

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

करून होता तो काही दिवशि कुलाबा येथे आंगरेयाकडे मोठे लग्न जाहालें त्यास समारंभास आला होता तेथे घोसाळकर जोशि याची गांठ पडली त्याणि त्या मुलास विचारिले कीं तू कोण्हाचा कोण त्याणि पुर्ववृत्त सर्व सागीतल्यावरून हा मूल चिंतामण जोशि यांचा असे जागून येथे तळ्यास आणून मोठा भगिरथ प्रयत्न करून आपले वतन वृतिस्छळ वगैरे ठिकाणावर आपले वडिल आनंत जोशि यांची संस्छापना केली पुढे येथे सर्व प्रकार नूतन केले विवाहही च्यार येथे तळ्यास आल्यावर केलें ॥

[येथवरचा मजकूर देवनागरींत आहे. पुढें सर्व मोडी मजकूर]

४ [इ. १७२८] श्री **शके १६५०** हे शकीं श्री चंडिकेचे ओहोळामध्यें गायमुख काळे दगडाचें आहे त्याचे दक्षणेस पिंपळाचे झाड आहे त्याची मुंजी आपाजीपंत पोफले वाा तळें यांहीं केली ते दतात्रयजयंतीचा महोछाह करीत असेत.

५ [इ. १७७३] सदरेस जाताना उजवा हाताकडे सातविनाचे झाड आहे त्याजवळ पिंपळाचे झाड आहे त्यास जांबे दगडाचा पार बाधून जयराम त्र्यंबक मजमदार यांहीं मुज्य केली **१६९५** [शके.]

६ [इ. १७७४] **शके १६९६** हे शकी बहिरोपंत जोगळेकर वास्तव्य कसबे तळे यांची बहीण बगुबाई जोसी हिणे कसबे मजकुरी पुसाटी आळींत जोगळेकर यांचे घराजवळ देवालय बांधून त्या देवालयात श्रीविठल रुखुमाईच्या मूर्तीची प्रतिष्ठा केली ते समई आचार्यवर्ण रामभट उपाधे यास व सापस्थवर्ण तान जोसी तलेकर यास होते दुसरीही सिष्ट ब्राह्मण होते बहिरोपंत जोगलेकर हे आपले मुखांत वरची टाळ्यांत निरंतर शाळग्राम बाळगीत असत जोगलेकर हे तीन बंधु येथून निज्यांपुरास राहावयास गेल्यानंतर त्या जाग्यावर बाळाजीपंत पिंगळे याही घर बांधिले हाली पिंगळे तेथे आहेत.

७ [इ. १७७६ आगस्ट १५ ते सप्टें. १२] **शके १६९८** हे शकीं तोतया रत्नागिरीस उत्पन्न होऊन अधिक भाद्रपद मासीं तळागडावर आला पेठ लुटून किला घेतला पुढे **अश्विन**मासी राजमाचीस त्यांचा पराभव होऊन पुन्हा श्रीमंत सवाई माधवराव याहीं किले घेऊन तोतयाचे पारिपत्य करून बदोबस्त केला तोतया सदाशिव चिमणाजी भाऊबाहेब यांचे नाव सांगत होता.

८ [इ. १७७८] **शके १७००** हे शकीं शामल याणी तळ्याची पेठ [जा]ळिली ते समई सिवराम सूर्याजी चिटणीस यांचे घर आपले पिसवड्यास पूरवेकडे होते ते जळले पुढे त्याहीं जोगवडीस घर बाधिले त्यापासून त्यांचे आगण्याची जागा आपले वहिवाटीस आहे ती जागा पूरवपश्चिम रुंदी हात आठनऊ लांबी दक्षिणोतर हात वीस चिटणिसाचे ओटींचे जोत्याबरोबर

९ [इ. १७७८] **शके १७००** हे शकीं हबसी तल्याचे पेठेवर येऊन पेठ लुटून जालून किल्यास महसरा देऊन दोन दिवस बसला होता तिसरे दिवसी माणकर याही उठऊन लाविला नंतर मौजे कुर्डे येथे डोगरावर मेढा घालून काही

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

दगडी कोट करून तीन वर्षे राहिला नंतर माणकर याहीं **शके १७०४** हे शकी [इ. १७८२] तेथून उठऊन लाविला

१० [इ. १७८७ जाने. २० ते फेब्रु. १८] श्री गणपतीचे देवलापुढे पिंपळ वृक्ष बहुकाली जुना होता त्या पिंपळास गोपाळ हरि वर्तक श्रीवर्धनकर याही जांबे चिरेबंदी पार **शके १६८०** [इ. स. १७५८] हे शकी बाधिला होता तो पिंपळ शके **१६९७** [इ. १७७५] **मन्मथ** संवसरी मोडला व पारही काही कोसळला होता तो परशराम जोसी तळकर यानी गोपाळपंत वर्तक यांस पुसोन तो पार बांधून नवा पिंपळ लाऊन त्यांची बहीण उमाबाई वेलंची कोतवाल इजपासून त्या पिंपळाची व्रतबंध करविला यजमान आबा कोतवाल तिचा दीर जाला होता त्या अनुष्ठानास वो रा तान जोसी आबा व बाजी जोसी पालवणकर व दुसरेही थोर थोर ब्राह्मण होते शके **१७०८ माघ** मासी

११ [इ. १८०२ जून.] **शके १७२४ दुंदुभि** सवछरे **ज्येष्ठ** मासी चावडी पुढील झेंड्याचे पश्चिमेस रा आबाजी लक्ष्मण कोतवाल उपनाम वलवे याणी श्रीविठ्ठल-रखुमाबाईचे देवालय बांधून स्थापना केली

१२ [इ. १८०२ जून ११] हकीकत परशराम अनंत जोसी तळेकर आमची पुरातनी घराची जागा आहे त्याची पश्चिमेस कुलकर्णी व पालवणकर या उभयताची घरे त्यांचे व आमचे जाग्यामधे सुभ्याचे कोठीस वाईल जाण्याचा रस्ता होता त्यातून ओहोळ जात असे तो मोडून [र]स्त्याचे जाग्यांत कुलकर्णी व पालवणकर या उभयतानी विहिरी खटल्या आणि ओहोळाचे पाणी आमचे जाग्यांत चेऊ लागलें ते समई वो रा बाजी जोसी पालवणकर यासी सांगितले कीं रस्ताची जागा आरधी आमची आसतां सालीम जागा तुम्ही विहिरीकडेस घेऊन माझे जाग्यांत ओहोळाचे पाणी घेऊन पराड्याचा नाश होतो येविसी मी सरकारांत फिर्याद होतो त्यावरून तीा राजश्री तान जोसी आबांचे विद्यमाने पालवणकर बोलावयास लागले की आमची विहीर आरधे रस्तांत आहे राहिला जागा तुमचा व विहीर खेरीजकरून बाकी जागा पूर्वपश्चिम आरधे रस्ताचे आमची तीही तुम्हास देतो परंतु श्रीगणपतीस जाण्याविसी तुम्ही आपले पुढील आंगण्यातून जुजवी वाट द्यावी म्हणजे त्या वाटेने पाणी जाईल आणि तुमचे परडें धुपणार नाहीं तुम्हास मागील रस्ताची जागा सालीम उपयोगी पडेल यप्रमाणे पालवणकर बोलिले आणि तीा तान जोसी आबा याही मजला सांगितलें कीं पालवणकर यासी व विद्यार्थी यासी बाजारचे वाटेने श्रीगणपतीस जाण्यास बहुत दूर पडतें आणि या करण्यांत उभयताचे बरे आहे त्यापक्षी तूं हे कर त्यावरून वडिलांचे समक्ष राजश्री भवानी नारायण यांचे यांचे हातून यादी लिहिली आणि पालवणकर व आबा यांचे समक्ष आपले पुढील आंगण्यातून कुपणीस आंवर घालून वाट केली पश्चमेकडे पालवणकर याही विहिरीबरोबर कुपण घातली त्या कुपणीचे आंत

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

आपण बहुत दिवस वहिवाट केली पुढे मी पुण्यास गेल्यानंतर काही दिवसी पालवणकर याहीं पुढील नवे गलीला दगडी फरस बांधिला तो मी पुण्याहून आल्यावर पाहिला ते समई आम्ही कलह करावा परंतु वतनाचा कलह आपले मागें कोण याकरितां आपण काहींच बोलिलो नाहीं ती गली आपण पूर्वीच दिल्ही आहे मिति **जेष्ट शुध्ध १० शके १७२४**

१३ [इ. १८०२ जुलै ३१] किस्त बामणसई सेत दंग्यामुळे सरकारांत गेले पुढे पेशवाईंत माणकरानी केले त्याही जयराम च्यंचक सोमण यास दिले त्याजवळ आपण परशराम जोशी मागत होतो ते शेत राजश्री कृष्णाजी जयराम व गोविंदराव श्रीधर सोमण याही आपणास बक्षीसपत्र **श्रावण शुध्ध २ शके १७२४** चे करून दिले.

१४ [इ. १८०२ जुलै ३० ते ऑक्टोबर २६] **शके १७२४** हे शकीं श्रीमंत बाजीराव रघुनाथ पेशवे राज्य करीत असतां जंजिरा किला शामलाचा घेण्याची मसलत करून राजश्री खंडेराव बापुजी रास्ते सरसुभेदार यास चार हजार फौज बरोबर देऊन श्रीमंताही तल्याचे मुकामी पाठविले ते **श्रावण शुध्धात** येथे आले ते **अश्विन वद्य पक्षीं** जंजीरकर शामल याजवल राजश्री आबाजी लक्ष्मण वलवे शामलाचे वकील याचे द्वारे तहाचे बोलणे करून श्रीमंतास लिहून पाठविले कीं पाभ्रे येथील पाण्यापरयंत मुलुख सोडविला त्यावरून श्रीमंताची खूशमर्जी होऊन वस्त्रें पाठविली आणि पुण्यास यावे म्हणोन लिहिलें त्यावरून निघोन पुण्यास गेले–

१५ ॥ श्री ॥ वेदशास्त्रसंपन्न राजश्री आबाशास्त्री टकले वा नागावें यासी पुसिलें कीं परभू ग्रहस्थाकडे तुमचे गुरुत्वाची कलमे काय काय त्यावरून त्याही सांगितलीं तीं कलमे–१ उपनयन १ पलाशपूजन १ समावर्तन १ श्रावणी १ अक्षरारंभ १ अग्रपूजा १ वरवस्त्र वरदक्षणा १ पिंडाची दक्षणा

१६ [इ. १८०३ जाने. २८] **शके १७२४** हे शकीं श्रीमत अमृतरावसाहेब व बाजीराव साहेब पेशवे हे उभयताही पडोन उभयतां राज्याचा बंदोबस्त करावयासी लागले ते समई आमृतराव साहेबाकडून बापुजी बलाळ धडफले कुळकरणी निज्यांपूरकर हे राजपुरी येथील मामलतीची सनद घेऊन निज्यांपुरास आले आणि तव्यावर घेऊन येथील मामलेदार राजश्री कृष्णाजी जयराम व गोविंदराव श्रीधर सोमण यांजवळ [ल]ढई करणार हे ऐकून सर्व गांवातील लोक घरें साडून बाहेरगावीं गेले ते समई मौजे बेलधर येथे बालाजी मोरेश्वर जोसी खोत यांचे घरीं चारपांच कुटुंबे होतीं तें घर अकस्मात दोप्रहरी **माघ शु।। ६** सर्व मनुष्यें नदीवर भोज्यनास गेली या संधीत वन्हीने दग्ध जाहले. सर्वस्वापाहार जाहले त्यांत आपले कागदपत्र प्राचीन बहुकाली वतनसंबंधे वगैरे होते ते सर्व दग्ध जाहले त्यांत आपले वडील वामन जोसी तलेकर यांचे नावे मौजे चेखली प्रो खरवली व किस्त बामणसई प्रो हवेली या

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

दोन गांवच्या इनाम सनदा दोन वासई सिक्याच्या होत्या त्या गेल्या काहीं कार्याकारण कागदांचे पुडकें निराळे स्थलांतरी होते तितके मात्र राहिले.

१७ [इ. १८०३ नोव्हें. १४] हकीकत जोसी मामले तले कसबे तळे उपाध्यपणाचे कार्यपणाचा वगैरे उपाध्यपणाचे सिवेचा फडशा पंचाईतमतें जाला त्यांत मेढ्याबाहेर बाळंभटाचे उपाध्यपण सोनार गौळी वाणी याजकडे नाही असा ठराव जाला असतां दक्षणेकडचे भेटाबाहेर पिंपळ आहे तेथे सोनारणी बायका सोमवती वहाण्याकरितां गेल्या होत्या तेथे आपले त्र्यंबक जोसी पूजा सांगत होते तेथे बाळंभट जाऊन बोलला कीं हा पिंपळ आम्हाकडे फडशांत असेल असे वाटतें पूजा मी सांगेन त्यावरून कजिया जाला उपेंद्र अमानत ठेऊं म्हणोन बोलू लागला तेव्हां आम्ही श्रीगणपतीचे देवळाजवळ पिंपळ आहे तेथे ब्राह्मण बायकानीं साखर वाहिली होती ती दोन पुड्या व पिपळापुढचे पेढे तीन उचलून घेतले याचे कारण निभ्रांत ठराव जाला त्याचे यादीची नकलही प्रत्यक्ष आम्हाजवळ आहे असे असतां उगाच कज्या जाला होता असा दाखला होतो याकरितां आपला संबंध नसतां साखरेच्या पुड्या घेतल्या त्या उपेंद्रास आमचा वारसा नाही व त्याणींही भेटाखालचे पिंपळाजवळ जावयाचा सोनाराकडे संबंध नाही त्याणी दाखला केला म्हणोन आम्हींही ब्राह्मणाकडचे सोमवतीचे उपेंद्रासीं गावात दाखला केला मिति **कार्तिक वद्य ३० सोमवार शके १७२५ रुधिरोद्गारी** नाम **संवसरे** बीा परशराम अनंत जोशी मामले तळे.

१८ [इ. १८०३ नोव्हें. २४] **शके १७२५ रुधिरोद्गारी संवछर मार्गसीर्ष शुध्द १० गुरुवारी** शामलाचे जंजिरा किल्यातील घरे दग्ध जाली नवगजी तख्त व ईशानेकडील दाहापांच घरे मात्र राहिली.

[आंअ ६६७ वर उपोद्घलक पुरावा; पण तेथील कालोल्लेख मोघम आहे. जंजिरा संस्थानचा इतिहास '८ साबान गुरुवार' देतो. ऐलेसं भाग १४ ले. ६७६६ पृ. ७९२३ वर पुरावा.]

१९ [इ. १८०३ डिसें. २] **शके १७२५ रुधिरोद्गारी** संवसरे **मार्गसीर्ष वा ४ शुक्रवारी सायंकाळी** रा नारोबा आवटी सुभेदार किल्याचे तल्याचे पेठेंत आले

२० [इ. १८०३ डिसें. २] **शके १७२५ रुधिरोद्गारी** संवसरे **मार्गसीर्ष वा ४ शुक्रवारी** सिदी जमरुद शामल जंजीरकर हे मृत्य पावले

[आंअ. ६६७ वर मोघम माहिती. येथें मृत्युदिन स्पष्ट कळतो. ऐलेसं भाग १४ ले. ६७६६ पहा.]

२१ [इ. १८०३ डिसें. ४] **शके १७२५ रुधिरोद्गारी** संवसरे **मार्गसीर्ष वा ६ रविवारी** सिदी इभराईमखान सिदी सुरूलचे नातू सिदी हसनचे पुत्र हे जंजिरा तखतारूढ जाले हसनचे पुत्र सिधी इभराईम

[जंजिरा सं. चा इति० पृ. १२९; आंअ. ६७० पहा.]

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

२२ [इ. १८०३ डिसें. ५] **शके १७२५ रुधिरोद्गारी** संवसरे **मार्गशीर्ष वा ७ सोमवारी** राघोजी वालुंज हवालदार किले तलागड हे रा॥ नाना आवटी सुभेदार याणी किल्याखाली उतरले.

२३ [इ. १८०४ मार्च १२] **शके १७२६ रक्ताक्षी** संवत्सरे **अधिक चैत्र शु॥ १ प्रतिपदा सोमवारी** रा॥ विठलपंत आवटी सुभेदार किलेहाये मामले तळे वाही किले तलागड येथे माहांकाल बुरुजाजवळ चांफ्याचें झाड आहे त्याजवर भगवा झेंडा लाविला संवत्सर प्रतिपदा तीच जाली यापूर्वी भगवा झेंडा नव्हता.

२४ [इ. १८०४ जून १८] **शके १७२६ रक्ताक्षी** सवसरे **ज्येष्ट शु॥ ११ इंदुवारी** रा॥ नारो गोविंद आवटी किल्याचे सुभेदार याजकडे माहलानिहायेची मामलत होऊन सनदा सदरेस दाखल जाल्या बळवंतराव अनंत धामणकर सुभेदार होते ते दूर जाले.

२५ [इ. १८०४ आगस्ट १८] हकीकत परभू लोकाचा व पेणकर ब्राह्मण यांचा परभूंचे कर्माचरणावपई कजिया वाढोन सर्व कर्मे बंद जाली होती ती मा[म]लेदार याहीं परवानग्या सांगून बहुत्येक पूर्ववतप्रा॥ चालू जाली श्रावणी आज बारा चौदा वर्षे राहिलीं होती ती राजश्री विठलपंत नाना आवटी सुभेदार याणी आम्हा जोसी उपाध्यास बोलाऊन नेऊन सरकारचे सदरेंत सांगितले कीं परभू लोकाच्या श्रावण्या चालत नाही चौदा वर्षापूर्वी अविछिन चालत होत्या त्याप्रा॥ तुम्ही सुखरूप चालवणे पेणकर ब्राह्मणानीं सरकारचे पत्र आणिले आहे त्यामध्येंही श्रावण्या चालू नये असे कलम नाही त्यास तुम्ही दिकत करूं नये श्रावण्या चालवणे याप्रा॥ **श्रावण शु॥ १२ द्वादसी सह त्रयोदसी शनवारी सायंकाळी** समक्ष सांगितले त्यावरून परभू लोकांच्या श्रावण्या श्रीहरिहरेश्वराचे देवालयांत पूर्ववत केल्या **शके १७२६ रक्ताक्षी** नाम संवसरे.

२६ [इ. १८०४ आगस्ट २५] **शके १७२५ रुधिरोद्गारी** संवसरी **मघा** नक्षत्रपरयंत परज्यन्य चांगला पडला जित्रबें चांगली आली होती. पुढें पूर्वा नक्षत्रापासून परज्यन्य आगदी गेला कोकण व देश येथील जित्रबें बुडाली कोकणांत जीनवट पटणीची सेतें होती तीं मात्र आली वरकड सर्व जिंनस सुकले त्यामुळे महर्गता जाली. शके १७२६ **रक्ताक्षी** संवसरे **श्रावण** मासीं धान्याचे व इतर जिनसांचे भाव जाले त्याचा दर येणेप्रा॥

दर रुपयाचे

८८२	भात कैली	८८१	काटाणे कैली
८८३	तेल वजन कचे	८८४	तूप वजन कचे
८८८	गूल वजन कचे	८८५	साखर वजन कचे
१०	नारळ सुमारी	८८१	करनाटकी उकडे तांदूल कैली
८८४	मिरच्या वजन कचे	८८१	काळी वाटोली मिरें कैली
८८१	नागली कैली		

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

येणेप्रा जिनस महर्ग जाले कर्नाटक मात्र चा···आले होते म्हणोन कोकण आंत येथील माणसें काही वांचली बहुत्येक धान्य कर्नाटक येथूनच आले याप्रा जिनसांचा पाड कसबे तळे येथे जाला होता पुण्यामध्ये तर सर्व धान्याचे जिनस एक सेर प्रा जाले होते मिति **शके १७२६ रक्ताक्षी** नाम संवसरे **श्रावण वा ५** पंचमीचे दिवसी हे वर्तमान लिहिलें माणसें बहुत अनावेगल मृत्यु पावलीं.

[आंअ ६७५ वर दुष्काळाचें स्वरूप मोघम दिलें आहे. येथील नोंद विस्तृत.]

२७ [इ. १८०४ आक्टो. १४] **शके १७२६ रक्ताक्षी** संवसरें **आश्विन शु विजया दशमीचे** दिवसी आवटे सुभेदार याही पूर्वी किल्यावरचे चांफ्यावर झेंडा लाविला होता तो पीराचे मागें खडकावर लाविला.

२८ [इ. १८०४ डिसें. १ सह २] **शके १७२६ रक्ताक्षी** संवसरें **कार्तिक वा ३० शनिवारी व रविवारी** शामल जंजीरकर याचे दिवाण लक्ष्मणजी हे काही हरामखोरीत होते याकरितां सिधी इभराइम खानसाहेब याही विष पाजून मारिलें व बलवतराव त्रिचक कुलकरणी तपे नांदगाव मुरुड व अनाजी सबनीस जंजीरकर या दोघांचा सिरछेद केला.

२९ [इ. १८०५ फेब्र. ४] **शके १७२६ रक्ताक्षी** संवसरे **माघ शु ५ इंदुवारी** जनार्दनपंत जोग पुणेकर याही नंद तल्याचे पूर्वेस जयरामपंत कोकणे याही पिंपळास काळे दगडांचा चिरेबंदी पार बांधिला आहे त्याचे पश्चिमेस संनिधच काळे दगडाचा चिरेबंदी वाटोळा पार बांधून कसबे तळे येथे अश्वत्थोद्यापन केले

३० [इ. १८०५ ऑक्टो. ३०] **शके १७२७ क्रोधन** नाम सवसरे **कार्तिक शु ८ अष्टमी बुधवारी रात्रौ** रा भालचंद्र अनंदराव साठये हे रा नारोबा आवटी सुभेदार याजकडून सुभ्याचे कारभारावर येऊन सदरेस बसले पूर्वी नारोबाचे चुलते त्र्यंबकपंत व विठलपंत आवटी होते त्याचे करणें बहुत अननवित याकरितां त्यांजवर रयत फिर्याद जाली म्हणोन त्या उभयतांस नारोबानीं दूर केले.

३१ [इ. १८०५ नोव्हें. ४] **शके १७२७ क्रोधन** सवसरे **कार्तिक शु १२ इंदुवारी** रा विश्वासराव गोपाळ देशमुख चार्णा जोगवाडीस होळीचे आग्नेयेस घर बांधिले होते त्याची वास्तुशांति केली त्यासमई सातारकर टकले येऊन आम्ही त्यांचे गुरु ब्राह्मत्वाची सुपारी आम्हास द्यावी असे बोलिले त्यावरून राघोबा जोसी तलकर याही त्याची बहुत निर्भर्छना करून उठऊन लाविले हे वलस्ते ! कर देशमुख बाळभटाचा पक्ष धरून आम्हा जोसियावर नाना प्रकारचीं कुफराणे करीत आहेत त्यांहीच टकल्यास सिकऊन पाटावर बसविले आणि हे बोलविले.

३२ [इ. १८०६ जाने. १३] **शके १७२७ क्रोधन** नाम सवसरे **पौष वा ९ सोमवारी रात्रौ आवसीस** तल्यास सुभ्याचे सदरेस आंगण्यामध्ये दाहापांच

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

कोल्हीं येऊन मोठा कोलाहल शब्द केले त्यासमई श्रीमंत गोविंदपंत बाचा आवटी हे सदरेचे घरांत होते समागमे आपाजीपंत भोपले होते.

३३ [इ. १८०६ जाने. १५] श्री **शके १७२७ क्रोधन** नाम सवसरे **पौष वा ११ बुधवारी सायंकाळी दिनास्तसमई** धरणीकंप जाला आकाशी शब्द मोठा जाला. सर्व भूमि हालली.

३४ [इ. १८०६ जाने. २० ते फेब्रु. १८] हकीकत टकले गुरु परभू ग्रहस्तांचे साताऱ्यास राहतात त्याचा व सिधेश्वर नागावें येथे राहतात या उभयताचा गुरुत्वाविषई कजिया गुजरार्थेत बडोद्याचे मुकामी जाला तेथे ठरले कीं जो तलेकर टकल्या असेल तो सर्व कायस्थाचा गुरु त्याजवरून सातारकर टकले येथे तल्यास येऊन सर्व कायस्थ मंडळीचे अर्जव करून आम्ही तलेकर असी साक्ष मागूं लागले मागील कागदपत्रांचे दाखलेहि दाखविले परंतु शेकडों वर्षे सिधेश्वरकर व नागावकर टकले याही परभू ग्रहस्तांकडे वहिवाट गुरुत्वाची केली होती तेव्हां हेच तलेकर कशावरून म्हणावे ही दिकत पडली याकरितां कोण्ही त्यास न बदत सडीपत्र न होई तेव्हां सातारकर याहीं द्रव्य देऊन सडपत्रावर नावे परभू लोकांची लिहून घेतली ग्रहस्थाही द्रव्यावर द्रष्टी देऊन आज दीडशें वर्षे सिधेश्वरकर व नागावकर टकले यांची गुरुत्वाची वहिवाट चालत आली याचे कारण काय वडिलाही त्यांस गुरुत्व कां दिले याचा शोध काहींच न करितां नावनिसी लिहून दिली सातारकर यांचे चिन्हाड राा हरिपंत पालवणकर यांचे घरी होते त्यांचे मुखांतून आपण परशराम जोसी यानी ऐकिले कीं कायस्थास सातारकर टकले यानी पैका बहुत खर्चवेच केला व नाना प्रकारचे जिनस व वस्तभाव देऊन नावनिसी लिहून घेतली त्यावरून हे लिहिले असे मिति **माघ मास शके १७२७ क्रोधन** नाम संवसरे

३५ [इ. १८०६ मार्च १८] श्रीचंडिका. **शके १७२७ क्रोधन** सवसरें **फालगुन वा १३ त्रयोदसी सह चतुर्दशी भोमवार** ते दिवसी श्री चंडिकेची समाराधना राम जोसी बाबा तलकर यांचे घरी होती ती समाराधना ग्रामस्थाही अग्नीचा उपद्रव गावांत होत असे म्हणून सालावाद शंभर ब्राह्मणाची समाराधना करावी म्हणोन मानसिक केले त्यास आजमासे सोळा सत्रा वर्षे जालीं मध्यें जोसी उपाध्ये याचा कजिया लागोन हुजूरपरियंत गेला होता अकरा वर्षे कसब्यांत वृत्ति चालवावयाकरितां सरकारातून आगांतुक ब्राह्मण ठेविले होते तेच वृत्ति चालवीत होते तेव्हां श्रीचे समाराधनेचे दिवसीं श्रीची पूजा करीत होते कीं नाहीं हें आम्हा जोसियांस ठाऊक नवतें पुढे **शके** १७२२ हे शकीं [इ. १८००] आमचा कजिया तुटला त्यापासून पुढें बाळंभट याणी समाराधनेचे दिवसीं श्रीची पूजा व मुंजी याची मेटाचे पिंपळास करूं लागला आणि श्रीजवळ सप्तशतीचें आवर्तन करूं लागला हे आम्हास आम्ही बहुत म्हणून समजले नाही जोसी उपाध्ये उभयतां जाऊन कर्म मात्र चालतें असें असतां

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

गावकीची समाराधना आणि आम्ही नसतां चोरून श्रीची पूजा व जप करीत होता ते आम्हास समजल्यावरून आपण जोशी याही आडथळा केला तों पूजा बाळंभटाने केली म्हणोन चतुष्टाई केली तेव्हा सर्व ग्रामस्त होते त्याहीं सांगितलें कीं उभयतानीं हें गावकीचें कर्म यामध्यें श्रीचें जें करणे असेल ते करावे जप जोसी याहीं करावा आणि पूजा बाळंभटानीं करावी याप्रा सांगितले असतां बाळंभट न ऐके म्हणोन सर्वांही सांगितलें कीं पुढील समाराधनेचे दिवसीं जोसी याही आथवा उपाध्यानीं श्रीची पूजा व जप करूं नये याचा ठराव न होतां या उभयतानी पूजा जप केला तर जो करील तो सर्व ब्राह्मणांचा अन्यायी होईल यांप्रा सर्व ग्रामस्तांही सांगितले त्यातील प्रमुख ग्रामस्थ समक्ष्य होते ते नावनिसी— १ भालचंद्रपंत सुभेदार साठये १ बापू देशमूख १ लक्ष्मणपंत वाड १ गणेशपंत देवल १ नाना पंडित १ सदाशिवपंत शहाणे येणेप्रां सर्व ग्रामस्थ होते त्यांचे समक्ष्य ठरलें

३६ [इ. १८०६ सप्टें. ८] राजश्री माहादाजीपंत कानडे हे श्रीमंत नाना आवटी सुभेदार प्रां राजपुरी यांजकडून मामलतीचे कारभारावर आहेत याणीं श्रीरामेश्वराचे पूर्वेस पुष्करण आहे तेथून देवळास जावयाच्या पाइऱ्या जुन्या ढांसळल्या होत्या त्या बांधल्या **शके १७२८ क्षय** संवसर **श्रावण वा १०**

३७ [इ. १८०६ डिसें. २०] **शके १७२८ क्षय** संवसरे **मार्गसीर्ष शु १० शनवारी** राजश्री माहादाजीपंत सुभ्याचे कारभारी याहीं श्री रामेश्वराचे देवालय बांधावयाकरितां शिलाजपास आरंभ केला

३८ [इ. १८०६ डिसें. २३] **शके १७२८ क्षय** नाम सवसरे **मार्गसीर्ष शु १३ भौमवारी** श्री चंडिकेची आर्चाशुध्धीस प्रारंभ करून वद्य प्रतिपदेस समाप्ती समाराधना उतम साखरपोळीची केली रा महादजीपंत कानडे यानी पुढाकार केला रा दाजिबा चिटणीस यांस कारभारी ठेविले होते त्याहीं प्रयोजन फार चांगले केले सिध जोसी तलकर ब्रह्मे जाले होते ग्रहयज्ञाचे मंडल व आयुत होमाचे मंडल आम्ही जोसी याहीं घेतलें आयुत होमाचे ग्रहमंडलावर दुसऱ्या देवता आधिक आहेत याकरितां बाळंभट बोलत होता कीं हे मंडल तुम्ही घेऊं नये त्यास आम्ही उतर केलें कीं आर्चेस सोळाच मातृका आहेत ते मातृकापूज्यन आम्ही घेऊं तेव्हां पुढें बोलिला नाहीं आम्हींच आणिले.

३९ [इ. १८०७ जाने. १७] **शके १७२८ क्षय** संवसरे **पौष शु ८ अष्टमी शनिवार** ते दिवसी श्री चंडिकेची वार्षिक समाराधना जाली ते समई गुदस्ताचा करार होता कीं श्रीची पूजा व आवर्तन जे करणे ते जोसी उपाधे याही आपली समजूत करून उभयतानी करावें समजूत न होतां ऐकानी जाऊन येकास न कळतां पूजा करील तो सर्व ब्राम्हणांचा अन्याई याप्रा ठरलें होते त्यास उभयतांची समजूत याच कलमाची जाली नवती म्हणून चौघाही वो रा अनंतभट भोळे तिन्हाईत

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

चाजवकून पूजा व आवर्तन करविले ते ग्रहस्थ १ आबा सफरे १ भगवंतराव देशमुख १ नाना पंडित १ दादा वाड

४० [इ. १८०७ जुलै १३] **शके १७२९ प्रभव** नाम संवसरे **आषाढ शुा ९ नवमी इंदुवारी** रा॥ माहादाजीपंत कानडे श्रीत्र्यंबकेश्वरकर सुभ्याचे कारभारी रा॥. नारो गोविंद आवटी यांचे गुमस्ते याही श्री रामेश्वर याचे देवालय लांकडी काम भिंतीसहित बांधिले त्याची प्रासाद वास्तुशांति केली तेथे अनुष्टानास ब्राम्हण आचार्य बाळंभट ब्रम्हे राम जोसी भाऊ सापस्थ माहादेव जोसी तलकर होते त्या देवालयाचे पूर्वेस पुष्करण आहे त्यातील खडक पुरुषभरपर्यंत फोडून उदकास सांठ केला आणि पुष्करणीचे पश्चिमेस प्राचीन धका होता तो कोसळला होता तोही कोरे दगडानी बांधिला इतके काम रा॥ माहादाजीपंतानी केले.

४१ [इ. १८०७ आगस्ट १३] **शके १७२९ प्रभव** सवसरे **श्रावण शुा १० गुरुवारी** जनार्दनपंत साबणे रा॥ नाना आवटी सुभेदार यांजकडून प्रांत राजपुरी येथील फडाणिसीचे कामावर आहेत त्याही श्री रामेश्वर याचे देवालयास जावयाची वाट ओहोलांत उतरत्ये ती चिपांच्या दगडानी पाइन्या बांधल्या.

४२ [इ. १८०७ सप्टें. ११ [**शके १७२९ प्रभव** संवसरे **भाद्रपद शुा १० शुक्रवारी** आबा जोसी पालवणकर यानी केशव जोसी पालवणकर आपले चुलते ज्यांही श्री वैजनाथांचे देवालय व ब्रंम्हाळीचे तळे बांधिले त्यांचे खीस आपला पुत्र वामन दत्तपुत्र [दे]ऊन दत्तपुत्रविधान केले तेथे माहादाजीपंत सुभेदार व जमेदार विश्वासराव देशमुख व मोरोबा कुलकर्णी व दुसरेहि होते.

४३ [इ. १८०७ ऑक्टो. ११] **शके १७२९ प्रभव** सवसरे **आश्विन शुा १०** रा॥ गणेश विनायक रानडे वा॥ कसबे तळे याहीं श्री चंडिकेचे दक्षणेस दरडीची वाट आहे ती चिपांचे दगडानी बांधिली पूर्वी ती वाट बहुत अवघड होती.

४४ [इ. १८०७ डिसें. १९] हकीकत **शके १७२९ प्रभव** संवसरे **मार्गसीर्ष वा॥ ५** ते दिवसी रा॥ बाला देशमुख मामले तले याचा चाकर राम्या जाधव वा॥ मौजे पिटसई यासी सरकारातून फांसी देऊन ठार केला आणि कामथाचे वाटेस आंब्याचे झाडास टांगून ठेविला याचे कारण बाबा देशमुखांची कुळबीण पळोन कवारगडास गेली होती तिचे शोधास बाबा देशमुख आपले चाकर राम्या जाधव व सुडक्या विचारा हे दोघे समागमे घेऊन कवरगडास गेले तेथे कुळबिणीचा शोध होता परंतु हातास आली नाही म्हणून घाट उतरून जामुलपाड्याकडून पालीस आले तेथे दोन प्रहरी भोजन करून सुकेली खिडीने घरी येणार म्हणोन निघोन आले सुकेली खिंड आवघी टाकून खिंडीचे दक्षणेकडेचे तोंडी आले ते समई राम्या जाधव याणी ओझे ठेऊन बाबावर टोणपा घातला बाबा सावध व्हाव आहे तों दुसरा घातला आणि बाबास ठार केला सुडक्या विचारा होता तो मागें चालत होता तो मसलतीत मात्र होता त्याणी हाला

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

केला नाही चाप्राा कर्म करून दुसरे दिवसीं बावाचीं वस्तभाव समागमीची होती ती कोलाडचे डोहांत बुडऊन **शनिवारी श्रावण वद्य एकादसीचे दिवसीं सायंकाळीं** [इ. १८०७ आगस्ट २९] तळ्यास येऊन घरीं सांगू लागले कीं बावा व आम्हीं सुकेली खिंड टाकून तोंडासी आलों तो सात असामी चोर येऊन बावास सोट्यानी ठार मारिलें आम्ही जीव घेऊन पळालों चाप्राा सांगितल्यावरून माधवराव कुलकर्णि दाहा बारा असामी बरोबर घेऊन शोधास गेले तो राा राा लंबोदर जोसी टकले मौजे सिरवली येथील मोकासी याहीं मुर्दा ब्राम्हण असेल म्हणून सरकारची आज्ञा घेऊन वन्हिप्रवेश केला मग हे पावले चाप्राा वर्तमान जाल्यावर तीन महिने गुजरले पुढें सुडक्या दुसरे चाकराजवळ सहज बोलिला कीं बावा चांगले होते परंतु रामचाने घात केला चाप्राा बोलला तेव्हां त्यानीं गळा पडून पुसिल्यावरून सुडक्याने सविस्तर सांगितले त्यावरून राम्यास व सुडक्यास सरकारांत नेऊ मार देऊन विच्यारिले कीं धन्यास ठार मारावयाचे कारण काय त्याही सांगितलें कीं कामाकाजावरून लय किरकीर करीत असे म्हणून ठार मारिले मग राम्यास फांसी दिला व सुडक्याचे हातपाय तोडिले चाप्राा हकीकत जाली.

४५ [इ. १८०८ जाने. ६] **शके १७२९ प्रभव** नाम संवसरे **पौष शुा ८ बुधवारी** श्रीचंडिकेची वार्षिक समाराधना जाली तेव्हां श्रीची पूजा व जप करण्याविषई जोसी व उपाधे याची समजूत पडली नाही म्हणूत वो राा अनंतभट भोळे तिन्हाईत चापासून पूजा व जप श्रीचा करविला ते ग्रहस्त १ दादा वाड १ बापुजी देशमुख

४६ [इ. १८०८ फेब्रु. २२] **शके १७२९ प्रभव** सवसरे **माघ वा अेकादसी इंदुवारी** श्रीमंत चिमणाजी रघुनाथ व आपासाहेब माहाडास आले आणि आठ दाहा दिवस राहून फिरून पुण्यास गेले

४७ [इ. १८०८ मे १०] **शके १७३० विभव** नाम संवसरे **वैशाख शुा १५ भौमवारी** किस्त बामणसई सेतावर देवी बामणाई आहेत त्याचे संनिध परशराम जोसी तलेकर यानीं विहीर कोणा दगडांची इमारत करून पाइऱ्यांची विहीर बांधिली.

४८ [इ. १८०८ मे २३] **शके १७३० विभव** सवसरे **वैशाख वद्य १३ इंदुवारी** मौजे खाववली येथे गावाचे पश्चिमेस ओहोळांत धर्माचे १ जवळ पाण्याचा डोहोरा होता ते पाणी खणोन राजश्री बालकृष्ण बापुजी गांगल याणी कोरे दगडीची इमारत करून पायऱ्याची विहीर बाधिली त्याचे काम संपूर्ण जालें.

४९ [इ. १८०८ सप्टें. १२] **शके १७३० विभव** नाम सवसरे **भाद्रपद वा ७ इदुवारी** परशराम केशव ओक यांस प्रांत राजपुरी येथील मामलत होऊन त्यांचे कारकून मोरोपंत जोग जप्तीस आले राा नारो गोविंद आवटी सुभेदार होते ते दूर जाले.

५० [इ. १८०८ ऑक्टो. ६] **शके १७३० विभव** नाम सवसरे **आश्विन**

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

वा। २ गुरुवारी परशराम केशव ओक सुभेदार प्रांत राजपुरी याजकडून राजश्री बाबाजी केळकर आंबवलीकर हे मामलतीचे कामावर येऊन कसबे तले येथील सदरेंत बसले

५१ [इ. १८०८ डिसें. २५] **शके १७३० विभव** संवसरे **पौष शु।। ८ रविवार** ते दिवसी श्री चंडिकेची वार्षिक समाराधना जाली श्रीची पूजा व सप्तशतीचे आवर्तन करावयास ब्राम्हण वो। रा। विनायक जोसी पालवणकर या सर्वांही सांगितलें त्याहीं संपादिलें मुंज्याची पूजाही त्याहींच केली जोसी उपाध्यांची समजूत जाली नाहीं.

५२ [इ. १८०९ जाने. ९] हकीकत **शके १७२९ प्रभव** सवसरे **श्रावण शु।। १४ सायंकाळी** [इ. १८०७ ऑगस्ट १७] रा। माहादाजीपंत कानडे सुभ्याचें कारभारी याही जोसी उपाध्ये यांस बोलाऊन नेऊन ताकीद केली कीं परभू ग्रहस्त यांच्या श्रावण्या व मुंजी एकंदर चालऊ नये आम्हास श्रीमंत नानाचे पत्र आले आहे त्यावरून मना जालो होतों हालीं रा। परशराम केशव सुभेदार यांचे कारभारी बाबाजी केळकर सुभां कारभार करीत आहेत याहीं आम्हा जोसी उपाध्ये यास ताकीद करून परवानगी सांगितली कीं परभू ग्रहस्त याजकडे मुंजी व श्रावण्या पूर्ववतप्रा। चालवणे त्यावरून आम्ही आज्ञेची चिठी मागितली त्याहीं उतर केलें कीं तुम्हास मुंजी व श्रावण्या चालवण्याविषईं सुभाहून मनाई केली त्या मनाईची चिठी दिली नव्हती समक्ष्य परवानगी मात्र जाली होती तेव्हां आतांही चिठीचें कारण नाही आम्हासही पुण्याहून लिहिलें आले आहे त्यावरून समक्ष्य ताकीद करितों याप्रा। सांगितले ते समईं बाबाजी कारभारी सदरेचे घर आहे त्याचे ओसरींवर पूर्वामुख बसले होते कचेरी बहुत होती त्यातील काही ग्रहस्तांची नावनिसी

१ बाळाजीपंत भाटे बोरवाडीकर
१ भाऊ आंगरे सरदार रेवदंडकर
१ त्र्यंबकराव केतकर
१ काल सावंत देसाई सरदार रेवदंडा हेटकरी
१ बाजीपंत कुंटे रेवदंडकर

इतरहि ग्रहस्त बहुत कचेरीस होते त्याचे समक्ष्य परशराम जोशी बालंभट या उभयतांस ताकीद केली **शके १७३० विभव** सवसरे **पौष वद्य ८ इंदुवारी**

५३ [इ. १८०९ मार्च २१] हकीकत सातारकर टकले यांस परभू ग्रहस्थानीं आपले कुलगुरुत्वाची याद करून स्वदस्तुर नांवनिसी लिहून दिली हा मजकूर पेशजी जाला होता त्याजवरून वेदशाखसंपन्न रा। आबाशास्त्री बिन चिंतामण जोसी टकले हे गुजरार्थेत बडोद्यास होते ते निघोन पुण्याकडून तल्यास आले त्याहीं आम्हा जोसी उपाध्ये यास रा। चिटणिस राजमंडल याचे पत्र आणिलें की तुमचे गावी आमचे स्वज्ञातीचे ग्रहस्तांकडे कार्ये प्रयोजनें जाली असतां गुरुत्वाचा भोगवटा प्राचीन कोण्हाकडे चालत आहे ते लिहून पाठवावे असें पत्र आणिलें त्याचे उतर देणे प्राप्त

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

जाले ते समईं साउजी कुमाजी देशमुख लोकांजवळ बोलिले कीं तान जोसी बावानी आपले हातचें पत्र सातारकर यास दिले आहे आतां जोसी सड दुसरी कसी देतील त्याज वरून आपण सर्व भाऊबंद मिळोन देशमुख यांचे घरीं जाऊन त्यांस पुसिले कीं तीर्थस्वरूप-कैलासवासी तान जोसी आबानी सातारकर टकल्यास पत्र काय म्हणून दिले आहे त्याची नकल तुम्हांजवळ असल्यास दाखवावी त्यावर त्याहीं उतर केले कीं काही दस्तऐवजी पत्र आहे आम्ही पाहिलें नकल आम्हाजवळ नाही याप्रा बोलिले त्यांचेच समक्ष्य आम्हीं भाऊबंद दाहा आसामी होतो तितके यांस समक्ष पुसिले कीं तीा तान जोसी आबा वयेकरून आम्हास वडील विद्वान होते परंतु वृत्तीचें दाखलापत्र देणे तें सर्वास कळऊन सर्वांचे विचारें द्यावे तुम्हास कोण्हास बोललें होते कीं काय शपथपूर्वक सांगावे तेव्हां सर्वाहीं सांगितलें कीं पत्र सातारकर यास दिलें आसे आमच्या आईकण्यांतही नाही एकट्यानी दाखलापत्र द्यावयाचा अधिकारही नाहीं आपल्यास चिटणिसांचे पत्र आले आहे त्याचे उतर आपल्यास वडिलोपार्जित ऐकण्यांत पाहाण्यांत असेल तें सर्वांचें संमतें सुखरूप द्यावें तान जोसी आबाचें ऐकट्याचें जरी कसेंही पत्र असिलें तरी तें मसदू ! नव्हे असे सर्वांचे विचारें ठरोन पत्रोत्तर वो रा आबाशास्त्री टकले याजजवळ दिले मिति **शके १७३१ चैत्र शुा ५**

५४ [इ. १८०९] परभू ग्रहस्थ याहीं पूर्वी सातारकर टकले यांस याद करून सर्वांची समत्तें घालून गुरुत्व दिलें होतें त्याजवर आबाशास्त्री आले तेव्हां सातारकर टकले लटके [ठ]रून आबाशास्त्री टकले यांस गुरुत्वाची याद करून सर्वांचीं समतें घालून याद दिली शास्त्री याणी हे वर्तमान सुभां विदित करून सुभांहून सरकारी पत्र करून घेतले **शके मजकूर**

५५ [इ. १८०९ मे १८] हकीकत **शके १७३१ शुक्ल** संवसरे **ज्येष्ठ शुा ४ गुरुवार** ते दिवसीं निज्यांपुरास काहीं ब्राम्हणानी मद्यमांस भक्षिलें होते ते बहिष्कृत होऊन त्याखेरीज राहिले ब्राम्हण होते त्यांस काही पतितांचा संसर्ग जाला होता म्हणून त्यांस तळे घोसाळे बोरवाडी व सिरवली या चहुगावचे ब्राह्मण निज्यांपुरास जाऊन पतितांखेरीज ब्राम्हण होते त्यांस मुंडणपूर्वक प्रायश्चित्त देऊन शुध्द करून पंक्तिपावन केले.

५६ [इ. १८१० जाने. १३] **शके १७३१ पौष शुा ८ शनवारी** श्री चंडिकेची समाराधना जाली श्रीचे पूजेस व जपास ब्राम्हण वो रा विठलभट वलंबे सर्वांही सांगितले त्याहींच संपादिले जोसी उपाध्यांची समजूत जाली नाहीं.

५७ [इ. १८१० जून २१] **शके १७३२ ज्येष्ठ वा ५ गुरुवार** ते दिवसी रा विसाजीपंत केलकर कारभारी निा परशराम केशव सुभेदार याही ताकीद केली कीं दुदांडी सिवराई खुर्दा कोण्ही घेऊं देऊ नये जुना सिवराई बारीक खुर्दा द्यावा घ्यावा याप्रा ताकीद करून जुना सिवराई चालविला पूर्वी जुनाच खुर्दा चालत

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

होता तो दुलभसेट कसबें पुणें यानी हुजूर विनंती करून दुदांडी खुर्दा चालविला होता तो आजपर्यंत पुण्यांत व देशांत व कोकणांत वसईपासून दक्षणेस तल्यापर्यंत आजपावेतो चालला आतां तो मोडून बारीक चालविला आष्टमीपासून उत्तरेस दुदांडी खुर्दा चालत आहे.

५८ [इ. १८१० जून २४] **शके १७३२ प्रमोद** संवसरे **ज्येष्ठ वा।। ८ रविवार** ते दिवसी राजश्री रामचंद्रपंत दामले जमेनीस यानी पुसाटीस कसबे तळे येथे श्री विठोबाचे देवालय आहे तेथे देवाचे संमुख काळे दगडाची दीपमाला बांधिली मिति मजकुरीं काम समाप्तीस गेले.

५९ [इ. १८१० आगस्ट २२] **शके १७३२ प्रमोद** संवसरे **श्रावण वा।। ८ बुधवारी** राजश्री विसाजीपंत केलकर सुभ्याचे कारभारी यांही कसबे तले येथील कामथाची दरडीची वाट चिपांचे दगडानी पायऱ्या पाडून बाधिली त्या कामावर गणेशपंत रानडे ठेविले होते मिति मजकुरी काम संपलें.

६० [इ. १८१० आगस्ट २७] **शके १७३२ प्रमोद** नाम संवसरे **श्रावण वा।। १३ इंदुवारी** बालंभट बिन रामभट कसबे तले यानी रा।। रावजी चलाळ वलंचे कसबें मजकूर याचा कनिष्ट बंधु होता तो दत्तपुत्र घेतला सुभेदार व जमेदार व वतनदार व ग्रामस्थ मिळाले होते त्या अनुष्टानास ब्रम्हे पांडुरंग जोसी अन्या जोसी मामले तळे व सापस्थ परशराम जोसी अनंत जोसी मामले तळे व आचार्य अनंतभट भोळे श्रावणा सोमवार

६१ [इ. १८१० ऑक्टो. ७] **शके १७३२ आश्विन शु।। १० रविवार** ते दिवसी श्रीचंडिकेचे देवळास सप्तशतीचे हवन केले तेथे पोथी वाचावचास श्रीधर जोसी तळेकर सापस्थ होते पूर्वी सप्तशतीचा जप मात्र होता घटस्थापना व पूर्णाहुति होम नवता तो रा।। विसाजीपंत बाबा केळकर सुभ्याचे कारभारी यांही पूर्णाहुतीचा होम चालता केला प्रतिपदेचे दिवसीं घटस्थापना करणार होते परंतु त्या दिवसीं काही दुर्योग होता म्हणोन चौघां सिष्टाचे विचारें ठरले कीं आज दुर्योग आहे याकरितां यंदा घटस्थापना करूं नये जप होतच आहे पूर्णाहुति नवमीचे दिवसीं करावी; पुढील वर्षापासून घटस्थापना करून जप पूर्णाहुति चालवावी त्यावरून सालमजकुरीं पूर्णाहुति मात्र केली पुढचे वर्षापासून घटस्थापना व पूर्णाहुति चालेल.

६२ [इ. १८१० ऑक्टो. २३] पुढे **अश्विन वा।। ११** चे दिवसी आपण परशराम जोसी निघोन पंढरपूरचे यात्रेस गेलो कार्तिक मासी मामलत रा।। गंगाधरपंत मराठे यांस जाली त्याजकडून गुमस्ते गंगाधरपंत भट कारभारास आले.

६३ [इ. १८११ सप्टें. १८–२६] **शके १७३३ प्रजापति** नाम सवसरे **अश्विन शु।। प्रतिपदेस** श्री चंडिकेस घटस्थापना करून पुढें **नवमीचे उतर रात्रीं**

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

पूर्णाहुति केली कारकीर्द गंगाधरपंत मराठे सुभेदार यांचे कारकून रा॥ हरिपंत साठे माहा[ड]कर कारभारी होते आचार्य रुष्णंभट सापस्थ परशराम जोसी होते पूर्ववर्षी पूर्णाहुति होम मात्र जाला होता या वर्षापासून घटस्थापना चालली.

६४ [इ. १८११ डिसें. २३] **शके १७३३ पौष शु॥ ८** श्री चंडिकेची वार्षिकी समाराधना जाली ते समई पूज्या जप व मुंज्याची पूज्या पास तिन्हाईत ब्राम्हण बाळंभट काणे आग्निहोत्री होते.

६५ [इ. १८१३ जाने. १०] **शके १७३४ पौष शु॥ ८ रविवार** श्री चंडिकेची समाराधना वार्षिकी जाली ते समई श्रीची पूज्या जप व मुंज्याचे पूजेस तिन्हाईत ब्राम्हण तात्या भोळे होते

६६ [इ. १८१३ फेब्र. १३] **शके १७३४ अंगिरो** नाम सवत्सरे **माघ शु॥ १३ शनवारी** श्रीमंत बाजीराव सा॥ गुहागराकडून तळ्यास आले चतुर्दसीस रविवारीं वृषोत्सर्गीग ग्रहयज्ञ करून पौर्णिमेस इंदुवारीं काल्य वृषोत्सर्ग करून प्रतिपदेस मंगळवारी भोजन करून रोह्यास गेले बाबाजीपं...

[उपोद्‌बलक पुरावा–दुसरे बाजी पे० यांची रोजनिशी पृ० ३२२ पेशव्यांचा मुक्काम.]

ले. २ चित्रे घराण्यांतील टिपणें

[पोलादपूरच्या चित्रें घराण्यांतील कांहीं टिपणें शि. च. सा. खंड १० मध्यें दिलीं आहेत. येथें दुसऱ्या बाजीरावाचे कारकिर्दीपुरतीं दिलीं आहेत.]

१ [इ. १७९६ जून ५] **शके १७१८ नल** नाम संवत्सरे, **सवा तिसैन मया व आलफ, राज्याभिषेक शके १२३ वैशाख वा॥ ३० रविवार** ते दिवस बालाजी जनार्दन फडणीस याचा मुा॥ पोलादपुरी जाला दुसरे दिवसी माहाडास गेले

[ऐलेसं भाग ९ वा पृष्ठ ४९७३ – पत्रें नं ३७९९, ३८००, ३८०४ पहा. जंत्रीप्रमाणें रा. भि. शक १२२ पाहिजे]

२ [इ. १७९७ जून ७–१७९८ मार्च १७] **शके १७१९ पिंगल** नाम संवत्सरे, **समान तिसैन मया व आलफ, राज्याभिषेक शके १२४** त्रिंबक जयेराम बापट सुभेदार किले प्रतापगड माहे **जिलकाद** गोविंदराव काले सुभेदार किले माार

३ [इ. १७९८ जून ५–१७९९ एप्रिल ५] **शके १७२० कालयुक्ताक्षी** नाम संवत्सरे **तिसा तिसैन मया व आलफ राज्याभिषेक शके १२५** गोविंदराव रुष्ण काले सुभेदार किले प्रतापगड

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

४ [इ. १७९९ जून १५ – १८०० मार्च २५] **शके १७२१ सिधार्थी** नाम संवत्सरे, **सन मयातैन व आलफ, राज्याभिषेक शके १२६** बालाजी रघुनाथ पटवर्धन सुभेदार किले प्रतापगड कारभारी आबाजी नारायण बर्वे

या सालात रघुनाथ रंगाजी व बाजीराव रंगाजी देशपांडे व गावकुलकर्णी पो कोंढवी व ता। विन्हेरे याचा वाडा देवल्यास प्रतापगडाखाली होता तो जंजीरकर हबसी याणी कोढवीचे खडणीचो दग्ध केला

५ [इ. १८०० मार्च १४] या साली **फाल्गुन वा। [दोन] सुक्रवारी** पुणियात बालाजी जनार्दन फडनीस पेशजी कारभार करीत होते ते वारले

[ऐलेसं. भाग १२ वा पृ. ६२५८ व पृ. ६३०५, ले. ५३३६ पहा. पोलादपूरकरांस गुरुवार रात्र अडीच प्रहर ता० १३ मार्च १८०० ची बातमी शुक्रवारीं समजली असावी.]

६ [इ. १८०० मे २५] **शके १७२२ रौद्र** नाम संवत्सरे, **इहिदे मयातैन व आलफ, ज्येष्ठ शुा ४ रविवारी** पो कोंढवी तो प्रतापगड येथील ठाणे व पेट पोलादपूरची जंजिरकर शामल याणी कोढवीवर चौथाई बसऊन खडणी घ्यावया चो दग्ध केली स्वारी माघारी जंजिरयास जात होती ती रायेगडकरी सरदार चांदजीराव दरेकर याणी बेचीस आसामी शामलाकडील धरून चामोटे ! थिटून रायेगडास नेली या साली रायेगडास हवालदार बालोजी दिवेकर व सुभेदार बालोजी कुंजेर पुण्यात राज्याचा कारभार करीत होते त्याजकडोन माहाडास कारभारी नारो नीलकट केलकर सुभ्याचे कामावर होते [जंत्रीप्रमाणें रविवारीं शुा २ पाहिजे.]

७ [इ. १८०१ जून ५ – १८०२ एप्रिल २] **शके १७२३ दुर्मती** नाम संवत्सरे, **सन इसने मयातैन व अलफ** या सालात किले प्रतापगड येथे बालाजी रघुनाथ पटवर्धन सुभेदार दुर्गोजी लाडगे हवालदार चिमणाजी खंडेराव ब्राम्हण जाधवाकडील दिवाण किले माारी बंदी होता त्याणी केलजा व पांडवगड व जजिरकर शामल याजकडेस फितूर करून किला घ्यावयाचा विचार केला लोक जागा जागा किलानजिक जमविले त्यामध्यें कांगोरकरही कोणी माठे सरदार होते व पारकर वतनदार म्हार किलास चाकरीस होते तेही सामीलात होऊन दिंडी व दरवाजा येथील लोक फितूर केले हे वर्तमान किलास नारो गोविंद बर्वे कारभारी होते त्यास समजल्यावर त्याणी च्यार पाच आसामी तोफेचे तोंडी दिल्हा व दोहोचहूची डोकी मारली सरकारचे परवानगीसिवाये याजकरिता हुजरोन पुणियाचे मुकामीहून चौकसीस किलास नारो गोविंद आवटे सिंहगडचे सुभेदार आले त्याणी चौकसी करून चिमणाजी खंडेराव यासी मार दिल्हा किलेमारचे सुभेदार बालाजी पटवर्धन हुजरोन किले कुवारी येथील मसलतीस होते याणी पुढे **फालगुन** मासी **सुध्द पक्षी** कुवारी घेऊन पुणियास

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

आले आणि सरकारात विनंति करून दोनसे लोक गोल्याकडील किले प्रतापगडास राहवयासी रवाना केले.

ले. ३ } हु { श. १७१७ भाद्र. शुा १ नंतर १
सफर २९ } पंचतन { इ. १७९५ सप्टें. २९

दिगर मोहबतनामा छ २९ माहे **सफर**चा फिरिस्ताद केला तो खुशवख्तीचे सात इबलाग होऊन कुभांडी लोका आलीबाग व हिराकोट धरोन राहिले होते त्याजवर मोर्चेबंदी तोफाचे मारगिरी करोन हिरेकोटावर निशाण चढविले त्या गुलीत बेड वर्तक व कानोजीराव देशमुख रात्रीचे पलोन गेले आहेत त्याचा बदोबस्त करोन दोस्तीचे जागा रवाना होऊन यावे म्हणोन निगारिष केले ते कुल आया होऊन आले ऐशास कुभाडी लोकाचा कर्कशा सुरू जाहाल्यापासोन आवलिया——साहेबाजवल रातदिन च्याहाणे की त्या लोकाची नामुरादी होऊन शौकतपन्हाकडील तरकीम ज्यादा व्हावी ल्याहाजा मकान महरुसा व कुलाबा ज्यानु·····बिला जुदाईन असेत

ले. ४ } श्री { श. १७१७ आश्विन शुा १
सुा ११९६ रवल २९ } { इ. १७९५ ऑक्टो. १३

राजमान्य राजश्री वासुदेव गणेश कारकून निा सरसुभा गोसावी यांसि

सेवक माधवराव नारायण प्रधान नमस्कार सुा **सीत तिसैन मया व अलफ** राघोजी आंगरे मृत्यु पावले यास्तव पुढें त्यांचे पुत्र राजश्री मानाजी आंगरे यांचे नावें ···किलेकोटसुध्धां वजारतमाब सरखेलीचा किताब पेशजीप्रमाणें करार व्हावा तो त्यांचे घरीं बखेडा जाहाला सबब त्यांचे प्रांताची जत्फी सरकारातून सन **आर्बा तिसैनात** केली होती हालीं बंदोबस्त करून देऊन मुलकाची जत्फी सरसुभांतून मामलेदार यांस ताकीद करून मोकलीक करावी असें हुजुरून ठरलें याजकरितां तुम्हाकडे चेऊल प्रांताची जत्फी आहे ती मोकलीक केली असे तरी सुदामतप्रमाणें वहिवाट आंगरे करितील तुम्ही दखलगिरी न करणें जाणिजे [नि. अ.] **छ २९ रबिलौवल** [निं. अ.] पाा हुजूर [ब.*] श्री। लेखन सीमा

बार

[दुसरे बाजी. पेशवे रोजनिशी पृ. ७४ पहा जप्ती 'साबान २०' ला केली पत्र तदनंतर लिहिलें.]

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

ले. ५ } श्री { श. १७१९ माघ शुा ३
साबान २ } { इ. १७९८ जाने. २०

राजश्री बुगाजी नाो जोरकर किले विश्रामगड गोासि

र्द अखडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य——— स्नाों बाबूराव कृष्ण गोरे आसीर्वाद विनंति येथील कुशल लिहीत जावें विशेष तुम्ही पेसजी पत्र पाा ते पावले .....वाघोली येथील कौल जमिनीविसी लिाा त्यास तुमचे घरीहून तुमचे चिरजीव येथे या कामाबदल यावयाचे ते येथे आल्यानंतर जमिनीची याद करून घ्यावयास येईल तुम्ही आपणांकडील सविस्तर वरचेवर लिहून पाठवावें कुलाब्याकडे सिंदेयाची फौज आली होती ती हाली कोठे आहे व तिकडील मजकूर काये तो मनास आणून सविस्तर ल्याहावे तुम्ही पेसजी येकदोन पत्रे पाठविली ती पावली व धर्मोजी सिंदा याचे सांगितल्यावरून सर्व कलले राा **छ २** माहे **साबान** बहुत काय लिहिणे लोभ कीजे हे विनति

[आंअ. टिपणें ६४५, ६४६, ६४७ वरून शिंद्यांची फौज कुलाब्यास आल्याचें व तिच्या हालचालींचें वृत्त समजतें. ती हकीकत रखर २५ नंतरची आहे. तदनुरोधानें पत्रास तारीख दिली. राखं ३ पृ. ५२० पहा.]

ले. ६ } हु { श. १७१९ माघ शुा ६
साबान ५ } { इ. १७९८ जाने. २३

पौ २५ जानेवारी १७९८

अजम हनरावयेल ज्योनाथन डंकण इस्कोयेर प्रेजिदेंत गोवर्नदोर जनराल मुा दामोहु

छ रफाअत व आंवालीपन्हा खुलत व मवाकत दस्तगाहा येतिजाद दोस्तां——— अजी दिल येखलास मानाजी आंगरे वजारतमाब सरखेल सलाम बादज सलाम महवल अयाम आंके येथील खैरियत जाणून आपली शादमानी हमेशा कलमे करीत गेलें पाहिजे दिगर दरी विला वरघाटीं पुणियास स्वारी व्हावयाचा मुकादिमा ठरावात·····से बिनाबरां लक्ष्मण गैमार सरमुकादम व कारकून व सिपाई हमराज(हा) यावयाचे आं येखलासमंदाकडे दगेयांचे सबबेंकरून राहिले आहेत त्यास सरकारची सनद व आदमी आणावयास रवाना केले आहेत तरी हरयेक बाबे हिला न पडितां येऊन पावत तें करावें व जंजिरे खांदेरी येथील माहागिऱ्यास आटकाव जाला आहे म्हणोन जाहीर जाले त्यास दोस्तीचे जागा मुनासिब नसे वरघाटी बनयाचे मालाबदल आटकाव जाला असल्यास साबिक तमाम घाट·····बराये दंगेयाचे बदोबस्त जाल्यावरून घाटीं [जाव]याचा माल माहागिरीवरून जात होता त्याची तकरीर पुरसीस मनास आणितां मुंबईचे सावकाराचा माल नाहीं अजी मानी बजिनस बेपारियाणी लेऊन दिल्हे आहे [म]रामत [सुदामत] चालत

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

आल्यामोजीब तफऊस करून सदरहू माहागरियास रजा होये तें चेगानगीचे जागा करावें तर्फेने चेकरंग घरोबा चालत असतां दरी मुकदमियात नौदिगर तसऊर करावें हे दानिशमदानजीक बिसियार दूर असे बिनाचरां कलमे केलें असे तरी आमदरत्फीस हरगीज मनाई नसावी सा छ ५ माहे **शाबान** ज्यादा काये लिहिणे मोहबत असों दिजे हे किताबती [ब] मोर्तब सुद

पैवस्ती— Manaji Angria Recd on 25 January 1798
Dated 23rd.

[मजकुराच्या डाव्या अंगास मानाजी आंग्र्याचा वर्तुलाकृति शिक्का.]

ले. ७
सुा ११९९ सफर १२ } हु { श. १७२० अधिक श्रावण शुा १४
इ. १७९८ जुलै २६

अर्जदास्त [सोडलें] बंदेगान राघो बहिरव मुा पुणें बंदगीस [सोडलें] ता छ १२ माहे **सफर** सुा **तिसा तिसैन मया व अलफ** तलग [सोडलें.] अर्ज ऐसा जे साहेबी परवाना छ २ मिनहूचा रवाना जहाला तो छ ११ मिनहूस रसीद खुसी भिस्यार हासील जाहाला पंडित प्रधान व अमृतराव यास खते पेशजी सा जाहाली ती पोहोचती होऊन जबाब घे[तले] असतील ते रवाना करणें त्यास पंडित प्रधान व [अमृतराव]ची खते पोहोचती केली जबाब याव.....ल तीमुले गाठ पडोन जबाब येत नाहीत ..... अमृतराव वडगावास लस्करात आहेत जाब घेण्याचे पैरवीत आहे आले म्हणजे बंदगीस रवना करितो येथील वैवाटीची बातमी समजोन घेऊन हुजूर लिहिणे म्हणौन आज्ञा फर्माविली ऐशास अर्ज ... ...बा पेशजी लढाई जाहाली येविसीचा माार लिहिलाच होता त्याजवरून रोशन जाहला हाली दौलतराव सिंदे याजकडील बोलणार रायाजी पाटील व रामजी पा बोलत होते की आम्हाकडील च्यार कारभारी आलीकडे जाहाले आहेत याजमुले साहेबाचे पायासी अंतर पडले याजकरिता कारभारियास दूर करितो व मुजावरखान व नारायणराव बक्षी वगैरे आम्हाकडील आ[सामी] ..... बदोबस्त ..... व बाईस खर्चाचे बेगमीस सर[जाम] तो आणि दौलतीचा बदोबस्त राखावा त्याजवरून श्रीमंताचे म्हणे की तुमचे दौलतीत मनुष्य नाही व आमचेहि नाही याजकरिता मागील तुमचे कारभारी तुम्ही काईम करून कामकाज चालवावे व नाना फडणवीस हे आमचे स्वाधीन करावे म्हणजे आम्हाकडील बदोबस्त नाना करतील याप्रो ठरोन अजम नाना यास आणिले हाली नाना सिंदेयाचे लस्करात आहेत बालोबा पागनीस यास आणावयास गेले आहे आल्यानंतर काये ठरेल ते पाहावे रात्रदिवस दोही लस्करात हुशयारी ... ... आहे पुढे होईल त्याप्रो अर्ज लेहून पाठवि .....आबा हवलदार

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

यास साहेबाचे क ..... यासी अर्ज करावयासी सांगितले आहे हवालदार करतील त्याप्रो बंदोबस्त होऊन चिठ्या द्यावयाची आज्ञा जाहाली पाहिजे ज्यादा काय लिहिणे हे अर्ज रोशन अर्ज [तुटक तेथें कसरीमुळें नष्ट.]

ले. ८ सफर १२ } हु { श. १७२० अधिक श्रावण शु॥ १४ इ. १७९८ जुलै २६

बंदगीस भिकाजी नाईक काा मुा पुणे [सोडलें] ताा **छ १२ सफर** तलंग [सोडलें] दिगर पुणे या ··· लस्कर सिद्याचे कपूने सरजेराव घाटगे व यादो भास्कर व फकीरजी गाढवे व बाबजी शंकर याप्रमाणे च्यार आसामी सिद्याकडील पूर्न कईद करून ठेविले आहे मुखे कपूचे लक्ष श्रीमत बाजीरावसाहेब याजकडे आहे त्याच्या हातोन फितूर जाला रावसाहेब याजकडे फौज पंचवीसतीस हजार जमली आहे नाना फडणीस सिध्याच्या कपू ··· तच आहेत खुद्द सिंदे आपले स्वार पा ··· फितूर बहुत ··· व परशरामभाऊ मिरजकर याजवल पांच हजार फौज जमून वाई देशात मुकाम मालगाव येथे आहे व मोरोबादादा जुनरास पाच हजार फौजनी आहेत याप्रमाणे बातमी आहे आठादाहा दिवसी झाडून फौज पुण्यात येणार आहेत पर्शराम [भाऊ पटवर्धन] व नारोबा फडणीस या उभयतास मामले ··· माणसे श्रीवर्धनास साहे ... साहेबाचे पायाजवल आहे माझ राबाराहाटाचा व ··· सार बुटक [१] याचा पैका रामाजीपंत ठोसर यांजवलून साहेबी घ्यावा म्हणोन हुकूम फर्मावीला तो माझे हाती पैका आला नाही साहेब देववितील हे किताबत

ले. ९ सुा १२०० साबान १७, पौष } श्री { श. १७२१ पौष वा॥ २ इ. १८०० जानेवारी १३

यादी बाजीराव रंगाजी **सुा मयातैन व अलफ** पो कोंढवी येथील हवाला व लिहिण्याचें काम मजकडेस आहे सरदेचें ठार्णे पोलादपूर चढूकडील रहदारी चाकरीचा न्हेट बहुत सन **सवा सवैनात** कोकणपटी तोतयानी घेतली किले प्रतापगडास शह बसविला ते समई जयेराम रुष्ण याचे विद्यमानें बातमीचें काम राखिलें सरकारच्या पागा आरब गाडदी याची बरदास्त केली नवे लोक ठेविले आणि बहुत मेहनतीनें किलाचा बच्चाव केला मसलतीसंमधें खर्चाखाली आलों तोतयाचे लोकानी घर लुटोन चीजबस्त नेली खराबीत आणिलें त्याजवर तोतयाचे लोकाचें पारिपत्य केलें बाजी गोविंद व जयराम रुष्ण याजबरोबर कोकणपटीच्या बंदोबस्तास होतों नंतर रायेगड तालुकियाचे बंदोबस्तास पाठविलें बंदोबस्त केला सरकारचाकरीचे उपयोगी जाणोन आफ्तागीर व मशाल व दीडशें रुपये होतें जाजती चालविलें की कचा बेहेडा करून घेतेसमई

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

नेमणूक करून घेणार होते बेहेडा न जाला गडबडीचे दिवस पडिले हली चाकरीवर नजर देऊन रुपाछु होऊन पोख्त तैनात करून देविली पाहिजे नेमणूक ———— रुपये

१७५ वेतन सालिना मोईन
१५० कदीम
२५ इजाफा
१७५

५७ शागिर्दपेशा माणसें १ यो

१२॥ आफ्तागिराचें सामान येक वर्षाकरिता रुो २५ येकसाली [मोईन]

५॥ मशालेचे तेल
२५०

[नि. अ.] बाजी रंगाजी चाणी चाकरी चागली केली सा सरकारी नेमणुक नख्त दीडशे रुो व जाजती सालमाारापासून माणसे व दिवटीस तेल व आत्पगीराचे सामानाबा मिलोन शंभर रुो माहाली साधून देणे सरकारी हिसेबी दीढशेचे करारप्रो खर्च लिहिणे सरकारची सनंद जाल्यावर खर्ची ल्याहावयास येईल येणेंप्रो करार

छ १७ साबान मयातैन पैाषमास

ले. १० सुा ४२०१ रवल १ } श्री { श. १७२२ श्रावण शुा ३ इ. १८०० जुले २४

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्ये राजश्री बालकृष्ण बापुजी गोसावी यांसि

सेवक बाजीराव रघुनाथ प्रधान नमस्कार सुहुर सन **इहिदे मयातैन व अलफ** शामल जंजीरकर यांजकडील लोक सरकार तालुक्यांत येऊन रयतेस उपद्रव करीत होते ते तुम्ही धरून तालुके अजणवेल येथे अटकेस ठेविले आहेत ते हाली सोडावयाचा करार करून हे सनद सादर केली असे तरी हुजुरून रा बापुजी बलाल कारकून जंजिरकराकडील जाबसालास पाठविले आहेत त्याजकडे पोहचते करून कबज घेणे ते जंजिरकराचे हवाला करतील जाणिजे **छ १ रावल** आज्ञा प्रमाण

[याच दिवशीचें गोपाळराव पासलकर तालुके अवचितगड यांस लिहिलेलें कैदी सोडण्याचें पत्र आतां रद्द केलें.]

ले. ११ सुा १२०१ मोहरम १ अधिक ज्येष्ठ } श्री { श. १७२३ अधिक ज्येष्ठ शुा ३ इ. १८०१ मे १५

यादी आरमारसमंधे कामकाज होणे त्याची कलमे सुा **इहिदे मयातैन व अलफ**

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

आरमाराकडे मोबदल्यास अैवज पाच हजार कार्तिकअखेरपर्यंत देऊ त्याची परत कोलावणपैकी होऊन बाकी अैवज फिरेल तो रोख द्यावयाची आज्ञा कलम १

सदरहु आरमाराकडे अैवज पावेल त्यात कौलावणीचा अैवज वजा करून बाकी राहील ते लाऊन दिल्ही जाईल येणेप्रो करार खुद हातचा.

आरमारचे सरजामाचा जिनस परबदरीहून आणावा लागेल त्यास माहागेऱ्याची सरबारा सरकारातून होत असावी कलम १

निकडीने जिनस आणावा लागल्यास सरकारातून माहागेऱ्या दिल्या जातील येणेप्रो करार खुद हातचा

आरमारचे खर्चाबदल जिनस हरबंदरीहून आणू त्यास जकातीचा हसील अजी माफ असावे पैदास्ती जिनस सरकारातून आम्ही घेऊ तो परबंदरी रवाना करीत जाऊ त्यास जकात घेऊ नये दस्तके सरकारातून देत असावी कलम १

खर्चाचा जिनस परबंदरीहून आणाल त्यास जकात माफ केली जाईल येणेप्रो करार खुद हातचा

आरमाराचे वहिवाटीसमंधे जिनस वगैरे सरकारात पावले व सरकारातून मोबदला होईल त्याचा हिसेब दरमाहाचे दरमाहा होऊन मखलाशा होत असाव्या कलम १

दरमाहाचे दरमाहा हिसेब होऊन आरमारचे सरंजाम जिनस सरकारात बाजारनिरखप्रमाणे देत जाऊ व्याज सरकारातून येकोत्राप्रो द्यावयाची आज्ञा कलम १

जिनसापो अैवज हिसेबी ठरेल त्यास साहा महिनेपलीकडे येकोत्रा संवस्थानसिरस्तेप्रो व्याज दिल्हे जाईल येणेप्रो करार खुद हातचा असे

पैदास्ती जिनस सरकारांत येईल तो आमचा ऐवज हिशेची फाजील असल्यास बाजारनिरखप्रो अैवजात द्यावयाची आज्ञा कलम १

पैदास्ती जिनस येईल तो तुमचें फाजील असल्यास त्यात निरखाप्रो दिल्हा जाईल येणेप्रो करार खुद हातचा

कौली तरांडे दर्यातून धरून आणिले तर दप्तरात कौलाची तेरीख पाहोन सोडून द्यावे लागेल कलम १

कौली तरांडे दस्त होऊन आणिल्यास सालाचे सालात कौलाची तेरीख पाहून सोडऊन दिल्हे जाईल येणेप्रो करार खुद हातचा असे.

कौलाची सनद आमचे नावे व्हावी कौल काढावयास सावकार वगैरे येतील त्यास कौल व्हावयाची आज्ञा आमचे मारफतीने असावी कलम १

कौलाची संनद तुमचे नावे होईल कौल काढावयास सावकार वगैरे येतील त्यास तुमचे मारफतीने कौल दिल्हा जाईल येणेप्रो करार खुद हातचा असे

सरकारात करारापो अैवजाचा सरबरा करून सदरहु अैवज न पावल्यास

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

मखलासी केली जाईल येणेप्रो करार खुद हातचा

इनामपटी नजराणा घेऊन गावचे भात वगैरे ऐवज घेतला सबब कुटुंबाचे बेगमीस द्यावयाची आज्ञा पेस्तर सालापासून गाव तुम्हांकडे ठराऊन दिल्हे जातील येणेप्रो सदरहु गाव तुम्हांकडे करार करून मोकलीक चिठ्या दिल्या आहेत त्याप्रो वहिवाट करणे येणेप्रो करार खुद हातचा

जाजती ऐवजाची सोय होणार नाही त्याची इतराजी नसावी कलम १

करारापेक्षा जाजती ऐवजाची सोई न जाहाल्यास इतराजी होणार नाही करार खुद हातचा

इनामपटी घेतात त्यास आम्ही कुटुंबादाखल सबब न घ्यावयाची आज्ञा दुसऱ्याची साहेब सरकारात घेतात त्याप्रो आम्हांस माफी असावी कलम १

तुम्ही सरकारचे पदरचे उपयोगी पडता सबब इनामाची माफी केली जाईल येणेप्रो करार खुद हातचा.

कलमे ११

सदरहु अकरा कलमे करार केली असेत येणेप्रो करार खुद हातचा असे

छ १ मोहरम उर्फ **आधिक जेष्ठ** मास

ले. १२ } श्री { श. १७२३ अधिक ज्येष्ठ.
{ इ. १८०१ मे

राजश्री बच्याजी रंगाजी स्वारी नाते गोसावी यासि

विनंति उपरि आडीचे रानात शामला[कडील] तेरा आसामी आल्या आहेत म्हणून बातमी आली आहे त्यास स्वारीपैकी पंचवीस माणूस चोरबातमीने पाठऊन काढा काढवणे [नि. अ.] बहुत काय लिहिणे हे विनति

ले. १३ } हु { श. १७२३ अधिक ज्येष्ठ वा ७
मोहरम २० } { इ. १८०१ जून ३

बंदगीस वामनराव जनार्दन मुा तलागड बंदगीस आदाब तसलिमात व कुर्निशात अर्ज मी रसानद ता **छ २० मोहरम** तलग साहेबाचे नेकनजरे येनायेती करून कमीन खैर असे बाजद अर्ज दयाराम गुजराथी याणी असवारी घेऊन पोलादपूर येथे जाऊन गाव लुटोन गाव जालिला आणि बोझी घेऊन येत होते तो रायेगडची स्वारी येऊन धरून नेले नाव सरकारचे सागतात म्हणोन तेथून ता गोरेगाव येथून कागद बजिनस आला त्याची तालिक पाठविली आहे चोरट्यानी तो जागाजागा

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

उपद्रव फार केला आहे रोज उठोन तंटा येथे किती सांगावा रायेगडास चोरटे नेले ते सरकारचे नसल्यास बेहतर असल्यानी रायेगडकरी मामलेदार उठाऊठ पुण्यास लेहून पाठविलीं तेथे बापुजीपंत गेले तेव्हा त्याजकडे वेडेपण आणिलीं कोणते रंगावर जाईल न कले लाहान बाते नी मोठ्यासी लागते याचा बंदोबस्त चांगला जाहाल्या-खेरीज निशा होत नाही गोज्या धोबियाची चीजबस्तसुधा मागाहून रवाना करितो बंदगीस रोशन होये हे अर्जदास्त

[अप्रसिद्ध चित्रे शकावलींत याच मजकुराची नोंद इहिदे मयातैनमधील आहे.. तिचे आधारें तारीख दिली.]

ले. १४ } हु { श. १७२३ अधिक ज्येष्ठ वा८
मोहरम २१ } { इ. १८०१ जून ४

बंदगीस वामनराव जनार्दन मुा तलागड ··· [कांहीं सोडलें.] ··· ताा छ २१ माहे **मोहरम** तलग साहेबाचे नेकनजेर [कांहीं सोडलें] अर्ज कसचे पोलादपूर येथे असवारी दयाराम गुजर वीस आदमी घेऊन तेथे जाऊन गाव जालिला व लुटला आण तेथून निघोन मौजे रेपोवली ताा गोरेगाव येथे निघोन आली तीं रायेगडची स्वारी जाऊन धरून नेले नाव जजिरकर म्हणोन सागितले त्याचा मजकूर बंदगीस लिहिला आहे व माहाडी चौधरी गोवल्यास नांदवीहून कोकणे याजकडून वसतस आला होता तेथून नादवीस जात होता तो मौजे अलसुदेयाचे गाणीवर पाच आसामी सरकारचे भेटले त्याणी त्यास पुसिले की नादवीचे माहालात माणूस किती आहे त्याणी सागितले की वाडा भरून निघाला आहे कोकणे हवालदार कोठे आहे तर तल्यास आहे म्हणौन सांगितले त्यावरून चौधरी यास उताणा घालोन मारिला बेहाल जाहाला तेव्हा त्यास सोडला त्यास गावकरी याणी उचलोन नादवीस नेला नादवीहून कागद आले त्यावरून कमीनास भला माणूस पाठऊन कागदपत्र पाहावयासी पाठविले पाहून सांगोन पाठविले की तुमची आमची भेट होईल तेव्हा जाबसाल करू सरकारची असवारी मौजे लेप व सोनघर हरदू गाव मिलोन च्यालीसपनास लोक आहेत तेव्हां सुभाहून नांदवीस संभर माणूस माहालचे रखवालीस पाठवावयासी सागितले त्यावरून कमीनानी चिठी सुभेदार याजकडे पाठविली की लोकाचे काम नाही आमचे लोक आहेत ते आम्ही न्यावयास हुजूर अर्जदास्त रवाना करितों त्यावरून राहाविले असवाऱ्या सरकारच्या गेल्या नसतील आण नाव सरकारचे जागाजागा होते त्यामुळे सुभेदार चापेकर व सोमण म्हणतात तह कशाचा करिता हे मजकूर पुणेयास समजत चालले तेव्हां आमचे पारिपत्य होईल तरी पुणेयास लिहितो तुम्हास बदोबस्त होत नाही तेव्हा तुम्ही उठोन जावे व ठाणी न्यावी यैसे कितेक रोज उठोन तंटे येतात कमीनानी काये बोलावे कमीन लाचार आहे हुकूम होईल तरी निघोन येतो बापुजीपंत पुणेयास गेले

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

तेथे त्याची अचरु राहाणार नाही कमीनानीं किती लचाड बोलावे रोज उठोन तंटा तोडीत असावे दुसरा आधिक होतो या वाचे हुकूम फर्मावणार साहेब आहेत बंदगीस रोशन होये हे अर्जदास्त

[अप्रसिद्ध चित्रे शकावलीच्या आधारें तारीख दिली.]

ले. १५
सुा १२०२

श्री

श. १७२३ ज्येष्ठ
इ. १८०१ जून

दो बो जबानी गंगाजी बिन त्रिंबकजी नरे खोत मो लोहारे ता बिरवाडी सुा **इसने मयातैन व आलफ** कारणे शेवेसी कतबा लेहून दिल्हा ऐसाजे ठाणे पोलादपूर येथील सदर व पेठ शामलाचे लोकानी मारून आग लाविली, ते दिवसी मी पोलादपुरी होतो. याचा मार काय कसा जाला, तो तपसीलवार लेहून देणे म्हणौन आज्ञा, त्यास, जमना गुजर याचे कर्ज देणे, त्याविसी त्याजकडील माणूस बसला. त्याचे मनाचिठीकरिता घराहून चार घटका दिवसा रविवारी निघोन दुकानी आलो. बोलणे जाले. चिठी दिवेलावणी[स] घेतली. आगोधर चेतेक्षणी दरेकरीण इजकडे पाणी घेऊन तबाखु खादला. धोडजी घोरपडे याचा रामराम जाला. नंतर चिठी घेऊन घरी जावयास लोहारचे खलाटीत घटका रात्रीस जात होतों. तों, इतकियांत शामलाचे लोक पनास आाा सदरी गावचे मार्गे येतां गाव चाभार पटी मजी[१] करितो तेथे मंडली मी विचारल्यावर सदरहुप्रा गडकरी म्हणौन बोलले बरोबर जानू गुरव महाबलेश्वर हाली वा मौजे लोहारे हा होता. त्याही मजला कोण, कोठील, म्हणौन विचारले. मी लोहारकर गंगाजी नरे म्हणोन सागितले. कोठे गेला होता म्हणोन विचारले. तेव्हा मी सागितले, गुजराकडे चिठी निवारण आणावयास गेलो होतो. ती चिठी त्यास दाखविली. तेथे माझे पागोटे व सेला घेतला. मजला व गुरवास फिरविलें. हत्यारे भवती लाविली मानेवर तरवारा दोन ठेविल्या हाती ढेण पेटविली होती मी त्यास कोठे जातां असे विचारले नाही. त्याही मजला बरोबर घेऊन पोलादपूरचे मार्गे चाललें. तेव्हा मी बोलले[।], ही लूट काय. आम्ही कौली मुलकातील. असे म्हणतां दोनच्यार सरदार भोवते जाले. त्याणी सिव्यागाली लोकास देऊन माझे पागोटे सेला कोंडालकर सेत लाविती तेथें देविला आणि मजला व गुरवास बरोबर आणिले. चिखलीचे वोढ्या-पलीकडे गुरव राहिला त्याची माझी मग गाठ पडली नाही. चिखली आलीकडे दोन वाटा फुटल्या आहेत तेथे सारे जमा जाले. तेथे निवडी केली. नदीकिनारा जावे तरी पाण्याची वाट. माणसांची गलबल. याजमुळें वरचे मार्गे जावें असा बेत करून वाटाड्या पुढें होणें. नाव घेऊन ते कोणी बोलले नाहीत, मीही ऐकिलें नाही. ते वाटेस लागोन जाऊ लागले. ते वेळेस मी त्यातून उडालों, चुकवोन मावलतचे आंगास निघालों. तेथे मात्र निक्षून मनांत समजले की पोलादपुराबर जातात. त्यांत माझे बोलखी

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

कोणी नव्हतें व कोणकोण सरदार लोक यांचे नाव येकंदर ठाऊक नाही येकाचे अंगावरी ताबडे, सकलादी टोपी होती. दोघास मसुरंचे चोळणे होते त्याचे हातून सुटलो, ते पोलादपुरावरी खलाटीचे मार्गे चालले. मी तसाच निघोन पाण्यावरी चिखलीचे गेलो, परसाकडे बसलो, पाणी घेतले. तेथे क्षेणभर तंबाखु खाण्यास बसलो. इतकियात दीन दीन म्हणौन हाक ऐकिली. आर्गाचा उजेड पाहिला. तसाच परतोन चाभारवलीत येऊन माझेबरोबर चला म्हणोन चाभारास बोलले[1] तो कोणी येईनात. इकडून गाव मारून जाऊन खलाटीचे वाटेनी निघोन गेले. जलले. चाभाराचे घरावरी जावे असे बोलले तेव्हा चाभार पळून गेले. मीही बिबावीकडे आलो. नंतर गावची माणसे सारी नदीत भरली होतीं, तिकडून मार्गानी भोसल्याचे घराजवल येऊन हक मारली तो कोणी जाब दिल्हा नाही. तेथून पिंपलाचे पाराजवल तिस्यावरी आलों. तेथे दोनच्यार गावकरी मंडलीची गाठ पडली. चिखलीवरून सुटल्यानंतर त्याची आमची गाठ पडली नाहीं. गुरव परभारे घरी पावला. घरची माणसे बहुत हैरान जाली. भाऊचंद मिलाले होते. तेव्हा, तेव्हा कागोरकर वगैरे गुजराचे सिपाई होते, त्याणी चाप चढऊन बसले होते. परंतु कोणी आमचे गावकरी माझे शोधास आले नाहीत. या आगोधर महिन्याच वर्तमान, अैनाडचा गौळी कागद घेऊन आमचे गावी आला. त्याणी निरोप सागितला, स्वारी हावशाची अली आहे. त्यास सवामण तादुल, येक बकरे वगैरे घेऊन येणे. तेव्हा मी चिरवाडीस होतो. बारा चौदा भाकरी त्याच गौल्याजवल दिल्या होत्या. त्या अलीकडे व पोलादपूर मारल्यावरी जेवणखाण दिल्हे नाही व त्यांची आपली गाठ पडली नाही. हवशाची लोक आम्हावर डाफरतात की रायेगडस वर्तमान कलऊन आमची स्वारी धरली. सा तुम्हास जाऊ. फायाफितुरात आम्ही लागु जाल्यास सरकारचे गुन्हेगार. सदरहु लेहून दिल्हे याप्रा पुरसिसीनिसी पुरवणी करून देऊ. हा कतबा लेहून दिल्हा [सही]

ले. १६
सावान ११

हु

श. १७२३ मार्गशीर्ष वा १४
इ. १८०१ डिसेंबर १८

अर्जदास्त [सोडलें.] वामनराव जनार्दन मुा तलागड [सोडलें.] ता **छ ११** माहे **सावान** तलग [सोडलें.] अवचितगडचे सुभेदार याही कमीनास खत लिहिले आहे तेच बजिनस बंदर्गास रवाना केले आहे जाहीर होईल [सोडलें.] वैवज तूर्त गोखले आल्यासिवाये देत नाही पुणेयाकडील बातमी आताच कागदी आले त्याणी सागितले की अमारतपन्हा आमृतराव आपली बाबस्तां व माधवराव याचा कबिला घेऊन नासकास गेले हाली पुणेयांत वैजनाथ भट व बालोजी कुंजीर [श्रीमंत पेशवे] याजवल कारभार करीत आहेत ··· ··· लस्कर सात हजार फौज पायेदल आहे त्यास खर्चाची मोठी तारांबल आहे मामलेदार याजकडे बाकी नसतां बराता करून

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

वैवज घेतात शाह्यांतील मोठे मोठे आदमी अजुर्दा आहेत अमृतराव गेले त्या दिवसापासून शह्रांत गडबडच आहे म्हणोन बातमी आहे कमीनास थंडीनी हैराण केले आहे ताप येत आहे बंदगीस जाहीर व्हावें बंदगीस रोशन होये हे अर्जदास्त

[ऐतिसं. भाग १३ वा लेख ६२०९, ६२१० पहा. तुटक तेथें वाळवींनें नष्ट केलें.]

ले. १७ सवाल ७ | श्री | श. १७२३ माघ शुा ९ इ. १८०२ फेब्रु ११

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री बापू स्वामीचे शेवेसी

पोष्य सदाशिव माणकेश्वर सां। नमस्कार विनंति येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लिहीत जावे विशेष राजश्री बाजीराव रंगाजी पो कोढवी तालुके किले प्रागड चाज[कडे] प्रो। माा्ची वैवाट आहे त्यास गुदस्तां शामलाकडोन [लोक] चेऊन माारनिलेचा वाडा दग्ध केला बहुत नाश केला व नित्य उपद्रव होतो त्यास येविसींचा चदोबस्त होऊन पुन्हा उपद्रव न लागे ते जाहाले पाहिजे पाट फरमासी तयार करावे... आयापी येऊन पोहोचले नाहीत स्मरणार्थ ..... विनं[ति] ... रा छ ७ शवाल बहुत काये लिहिणे लोभ आसों दीजे हे विनंति

ले. १८ पौा जिल्हेज ९ | श्री सांब | श. १७२४ चैत्र शुा १० इ. १८०२ एप्रिल १२

राजश्री हणमंतराव दाजी[1] हवालदार गोसावी यासि

दं अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्ये —— श्रीं मल्हार बाजी व भगवंत चाबूराव रामराम विनंति विशेष तुम्ही कालचे पत्रीं लिहिले की वारवार रागे भरून लिहिता त्यास आपलें लिहिण्यात चेक व करण्यात चेक सध्याच सूतवाले यासी आम्ही कौल देऊन आणले येसे असतां दिवीचे चौकीवर चार रोज अटकाऊन ठेऊन रात्री सेपनास माणूस पाठऊन झाडून बैलसुधा किल्याखाली नेले म्हणून कललें येसे आपलेकडून होते तेव्हा बदरी उदमी कसा येतों तुम्ही लिहिलें की जे करणे ते आज्ञनेच करितों त्यास आपल्यास कसी काये आज्ञा आली तिची नकल पाठवावी किंवा तेथे पाहावयासी तुमचे उतर आल्यावर येथोन कारकून पाठऊन देतो तुम्हास सरकारची आज्ञा असल्यास आमचे काही जात नाही दुसरे अडकणार ... डिचे भरवाडाचे बक्करे आज धरून नेले पहिले चेक नेले त्याचे तुम्हास लिहिले असतां काही आले नाही हाली दुसरे नेले असो जे करना ते बरेच करितां आम्ही वसाहत करितो तुम्ही त्यास उपद्रव करितां माहाल आमचा सानक [1] नाहीं आम्हास कामकाज सांगितले चाजकरितां

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

जालेले वर्तमान लिहावे लागले मर्जीस आल्यास भरवाड पाठविला आहे याचे चकरे देवावे लोभ करावा हे विनंति

पौ छ ९ जिल्हेज

[१ हणमंतराव दळवी किल्ले पारनेरा. गायकवाडांचे ताब्यांतील प्रदेशांत जाणाऱ्या मालावर पेशवे आपल्या प्रांतांत नाक्यांवर जकात घेत व गायकवाडांच्या प्रांतांतून पेशव्यांच्या प्रांतांत जाणाऱ्या मालावर गायकवाड जकात घेत.– पहा The Gaikwads of Baroda, Vol. V p. 391 १९ मार्च १८०२ चें पत्र.]

ले. १९ जिल्हेज ११ } श्रीसांब { श. १७२४ चैत्र शु।। १२ इ. १८०२ एप्रिल १४

राजश्री हणमंतराव दलवी हवालदार गोसावी यांसि

दं अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्यें——श्रीं मल्हार बाजी व भगवंत बाबूराव रामराम विनंति येथील कुशल ताा **छ ११ जिल्हेज** जाणून स्वकीये लिहीत असावे विशेष सुताचे बैल पेठेत नेऊन अटकाऊन ठेविलें आणि त्यास बोलता की तुम्ही हिमायेत केली त्यास त्याही हिमायेत काये म्हणून करावी व तुम्हावर जबरदस्ती काये केली असो तुमचेच सांगितल्यावर त्याही मागे कची चिठी नेली की माल बदरी येऊ द्यावा जकातीचा यैवज सरकारची आज्ञा ज्यास येईल त्यास देऊ यैसी तुमचे सांगितल्यावर आणली असता तन्ही मालास रजा दिल्ही नाहीं सावकारानीं जकातीचे फडशास यैवज घरीहून आणला नाही तुम्ही तो त्याजपासोन जकात घेतल्यासिवाये येऊ देत नाही याजकरितां माल साराच तुम्ही आपलेजवल ठेऊन बैलास रजा द्यावी तुम्ही जे करणे ते दूरंदेशा करून सरकारआज्ञेने करिता याजप्रो तुमचे लेख आम्हाजवल आहेत सरकारची जकातीची अमदानीचे दिवस हेच त्याची नुकसानी होते त्याचा जाबसाल धण्यानी विचारल्यास आपण करतील उत्तर पाठवावे लोभ करावा हे विनंति

[नि. अ.] **पौ छ ११ जिल्हेज**

ले. २० मोहरम १२ } हु { श. १७२४ वैशाख शु।। १३ इ. १८०२ मे १५

अर्जदास्त [सोडलें] बंदा वामनराव जनार्दन सुा पुणें [सोडलें] ताा **छ १२ माहे मोहरम** तलग [सोडलें]

बाजद अर्ज [सोडलें] आमारतपन्हा बाजीराव व चिमाजी आपा नासिकास पंधरावे तारखेस जाणार लस्कर नवे ठेथीत आहेत आगरे याजवर मसलत आहे यैसे बोल-

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation,Chandigarh

तातें दारू व तोफा नव्या करावयाचा मोठा कारखाना लागला आहे येथे मुतसदी कुंजीर व मुनशी व वैज्यनाथ भट व देसमुख व सरसुभा यैसे आजारी पडिले आहेत कोण्हावर इतबार नाही मनास येईल ते श्रीमंत करीत आहेत कोण्हाचे काडीमात्र चालत नाही पुढे कसे होईल ते न कले हाली सरसुभाहून पत्रे सावरकर[1] व सरसुभाचा कारकून यास घेऊन पाठविली आहेत सरकारतर्फेस उपद्रव रेवदंडकर हाली करणार नाही आगोधर सरसुभाहून लोकास व आरमारकरी यास ताकीद गेली आहे हाली लोकास फिरोन पत्रे घेऊन रा॥ केली आहेत सारे लोक उठोन आणावयाचे पैरवीत आहे सरकारतर्फेहून कोठेही तुर्त तसदी चेकंदर होऊ नये सनद जाईतो लोकानी कोरळचे कोरळेस राहावे व रेवदंडकर याणी रेवदंडयास असावे सरकारचेतर्फेस चेऊ नये यैसे जाले आहे मागाहून काये होईल ते पाहातो बंदगीस रोशन होये हे अर्जदास्त

ले. २१ सुा [१२०]२ मोहरम २० } हु { श. १७२४ वैशाख वा॥ ६ इ. १८०२ मे २३

पौ छ २३ मोहरम जाब छ २६ मोहरम सन इसने

बंदगीस वामनराव जनार्दन सुा पुणे [कांहीं सोडलें] ता॥ छ **२० मोहरम** तलग [सोडलें] अर्ज–इकडील बातमी आमृतराव पडित जोरवे येथे आहेत फौज पाच हजार आहे होलकर पंढरपुरानजीक आला आहे सिंदे बराणपुरास आहेत फौज बहुतेक हिंदुस्तानात रा॥ केली तीन कंपु व पंधरा हजार फौज मात्र सडी आहे बाबूराव आगरे यास आजच सामोरा जाऊन घेऊन आले निजामआलीकडील आपले जागा आहे भोसले आपले जागा आहेत कर्नाटकात बाजीराव बर्वे यांची रवानगी जाली दाहा हजार फौज दिल्ही आण इग्रजावर रा॥ केले येथे दिवसोदिवस तुळु आहे फौज जागाजागाची आणवीत आहेत मानकरी सारे व हुजुरपागा सान्या जमा केल्या आहेत स्वारी नासिकास जाणार आहे बाहृमियाकडील वकील येथे आहे मिया चेका महिन्यानी येथे येणार आहे इग्रजानी कबूल केले आहे की जजिरकराची आम्ही कुमक काडीमात्र करीत नाही मुबईहून जिनस काडीमात्र नेऊ देऊ नये यैसी येथे टोपकर यास सागितले आहे त्याणी मुबईस लेहून पाठविले आहे उतर आले नाही त्या शोधात आहेत तल्या... किल्या... गोविंदराव सोमण... आज दोन दिवस... जाहाले पैका पटला नाहीं पटला म्हणजे खाली येणार ... किल्यासुधा जाहाली व अवचित-गडची मामलत दादोपंत गोडबोले याचे बेट्यानी केली सिके जाहाले सुवर्णदुर्ग येथील यैवज सरकारचा दरसाल येणे त्यास काल ताकीद जाली की जंजिरकरास यैवज देऊ नये सरकारचा हुकूम होईल तेव्हा देणे तर व्यावा यैसी बालाजी कुंजीर यास सागितले आहे यामोजीच येथील हकीकत आहे कमीनानी काये करावे त्याचा संभीर चागला होऊन हुकूम सादर फर्माविला पाहिजे त्याशी करीन येथे राहून सार्थक नाही

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

सरकारचे बोभाट मना होते म्हणजे बोलावयास येते येथे आमारतपन्हाची जवानीची उमद घनीपणा नवा तेव्हा च्यार नजीक आहेत ते गैर माहीतगार गुदस्ता होते ते हाली नाही नवेच कारभारी आहेत असा येथील विचार आहे याचा विचार करून हुकूम फर्मावणार साहेब धनी माबाप आहेत बंदगीस रोशन होवे हे अर्जदास्त

[ऐलसं. भाग १३ वा पत्र नं. ६३८४ पहा; तेथील पत्र अपूर्ण आहे. इसन्ने मय्यातैन मय्ये छ २० मोहरम दोनदां येतो; अखेरसाल धरून तारीख.]

ले. २२ मोहरम २० } श्री { श. १७२४ वैशाख वा ६ इ. १८०२ मे २३

श्रीमंत राजश्री ——— बाबासोहब साहेबाचे सेवेसी

आज्ञाधारक हणमतराव दलवी हवालदार किले पारनेरा प्रां सुरत आठाविसी दडवत विज्ञापना ता छ २० माहे **मोहरम**पावेतो किले मजकूरचे व सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष स्वामीचे आज्ञेप्रमाणे साहेबाचे चरणाजवल येकनिष्टेनी सेवाचाकरी केली सालमजकूरी किलेमजकुरची बेगमी नाही कोठीस तीन खडी भात सिलक राहिले तेव्हा तेही पावणेतीन खडी भात लोकास आडिसेरीपो घालण्याविसी राजश्री आन्याबा आभ्यंकर याचे बधु रा रावजी याची आती निकड पडली तेव्हा त्यास उतर सागितले की साहा महिन्याचे बेगमीस ठिकाण नाही आणि तीन खडी भात सिलक राहिले ते देविता पुढे च्यातुरमासचे बेगमीचा काये विचार तों उतरी केले की मागील [ग]ला झाडून खर्च करून मग बेगमी करणे तरी करू त्यास किला सरकारचा येका दिवसाची बेगमी नाही तेव्हा किलेकोटाचे काम यास्तव खर्च करणे मना केले त्याजवरून सेवकाचे निसबतीचे लोकमुघा दिभतीवाद घालणे म्हणून वाद झाली ते बजिनस यादीची नकल करून स्वामीचे चरणाजवल पाठविली आहे येविसी आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत त्यास आम्ही पुसले की दरोबस्त सिलका झाडता आनी दारू गोली मात नसता जाचा होईल त्यास ते बोलले की आमचे आम्ही सिलक झाडू आगर ठेऊ दारू बिघडली तरी आमची बिघडेल परतु आम्ही झाडा सिलकेचा करणार अैसे बोलले तेव्हा आम्ही बोललो की किलेकोटाचे काम येथे आसा विचार योजिलात त्यापेक्षी येथे रक्षेन कोणत्या आसरयावर करावे तेव्हा याचे बोलणे तुम्हास गरज काय आमचे मनास येईल त्याचे हावले करू आगर आमचे चितात येईल तैसे करू अैसे बोलणे पडले तेव्हा आम्ही काही याचे ठेवणूक नव्हे स्वामीचे सेवक आणि स्वामीनी जागा रक्षणाकरिता ठेविले आणि आमलदार हा विचार योजितात तेव्हा कोणयेक जाग्यास नुकसान आली आसता स्वाम चाकरास पुसती[ल] तेव्हा आम्ही उतर काये द्यावे आनी येवढीही करून जुने लोक आजपावेतो सेवाचाकरी येकलक्षाने

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

करीत आले तेही रजेस घातल्यानें आम्हास भरवसा याचा न पुरे यास्तव याप्रमाणे स्वामी आज्ञा आहे की हे मधेच करितात यास्तव सेवेसी विज्ञापना लिहिली आहे तरी याप्रमाणे मामलेदाराची वर्तणुक आसल्यास आमच्याने जाग्याचे रक्षण कसे होते यास्तव पुढे स्वाम सब्द लाविताल यास्तव वि विज्ञापना लिहिली आहे बदोबस्त करावयाचा तो पका करून द्यावा नाहीतेव्हा सेवकास येण्याची आज्ञा जाहाली पाहिजे सेवेसी किलेकराने फार विस्तार काय लिहू सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना

[कागदास एक जोड.]

ले. २३ श्री शा. १७२४ ज्येष्ठ शुा १२
सुा १२०३ सफर १२ नकल इ. १८०२ जून १३

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजश्री नारो गोविंद गोसावी यांसि

सेवक बाजीराव रघुनाथ प्रधान नमस्कार सुा **सलास मयातैन व आलफ** किले प्रतापगड येथील मामलत सरकारातोन रां खंडोजी जाधव याजकडे आहे त्यास किलेमारचे बेगमीचे कोढवी महालात शामलाकडील चोरट्यानी दंगा करून गाव जाळून माणसे तोडितात म्हणौन हुजुर विदित जाले त्याजवरून हे पत्र सादर केले असे तर तुम्ही तौं रायेगड येथील गावगना ताकीद करून चोरट्याचा पता लाऊन पारपत्य करणे गावकरी याणी चोरट्यास आसरा देऊन बातमी न सांगितली आणि तुम्ही त्याचे पारपत्य न केले असे जाल्यास प्रतापगडकरी चोरट्याचा मुदा गावकरीयाचे आंगी लाऊन परभारे नेऊन पारपत्य करितील जाणिजे **छ १२ सफर** आज्ञा प्रमाण मोर्तब असे

[याच तारखेस चंद्रगडचे हवालदारासहि बाजीरावानें याच मजकुराचें पत्र लिहिलें.]

ले. २४ हु शा. १७२४ आषाढ शुा १
सफर ३० इ. १८०२ जुलै १

अर्जदास्त अर्ज दरबंदगी ··· वामनराव जनार्दन मुा पुणे [सोडलें] ता **छ ३०** माहे **सफर** तलग [सोडलें] बखैर असे

बाजद अर्ज–इकडील बातमी होलकर याची फौज दाहा हजार पठाण व दाहा हजार होलकर याचा साला यैसी वीस हजार फौज राहुरी वामोरीलग येऊन तमाम मुलुक उज्याड करीत चालले होलकर नदीआलीकडे आला नाही येणार आवाई आहे आमारतपन्हानी तोफा व फौज दाहा हजार व गारद यैसी गारपीरावर ढेरे दिल्हे आहेत दुसरी नवी फौज ठेवितात मानकरी हुजुर पागेयावर इतराजी करून झाडून खासी हुजुरातीस दूर केले असे लौकिकात आणोन त्यास आतोन

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

ताकीद केली की तुम्ही आमृतराव याजकडे जाऊन चाकर राहून त्यास धरावे असे सागोन आज दोन दिवस मानकरी निघोन गेले हाली छ २९ सफरी फडके याचे आदमी व मोरोचा फडणिस व त्याचे चटे व दुसरे ब्राह्मण कारभारी वाड्यात नेऊन अटकाऊन ठेविले वाड्यात कालपासोन कोण्ही जात नाही मनाई जाहाली आहे कोण्हास कैदत घालतील याचे शास्वत नाही कमीनास रजा दिल्ही आहे परंतु खताचा जाब मागितला तो याववास सागितला आहे तो जाहला म्हणजे निरोपास गेल्यावर दोन बाता रुबेरुब बोलतो इतक्यात इलाही नी आलमाचे दुबेनी बरेपणा दिलात आणिल्यास बेहतर आहे नाहीतर निघोन येईन सरकारतर्फेचे बोभाट हाली येत नाही जे बोभाट येतात की सोमण व गोडबोले याणी जंजिरकरास अजीज केले आहे दोन हजार गारद मात्र दोन सुभा रा करावे म्हणजे पंधरा रोजात अवल मतगड घेऊन देतो बा दुसरे लस्कर पाठवावे म्हणोन आजच पत्रे सोमणाची आली सोमणाचा इतबार काही-मात्र नाही पाच आसाम्याविसी तेथे बोलणे लागले ते येथे लेहून पाठविले की जजिरकराचे माहालची लावी पाजुली[?] म्हणोन जंजिरकरानी भला माणूस पाठविला की आमची लावणी करू द्यावी व पाच आसाम्या धरिल्या आहेत त्या सोडाव्या म्हणजे प्रातात उपद्रव करीत नाही असे बोलतात त्यावरून जंजिरकरास सांगोन पाठविले की आगोधर ब्राम्हण नेले ते तल्यास पाठवावे बा चोरटे धरिले ते सादावयास येतील म्हणोन व कितेक मजकूर आपले तारीफचे लिहिले व गोखले याणी लेहून पाठविले की जंजिरकर या नजीक ताफेयाचे मारणीवर मरूड आहे तेथे आमचे लोक जाऊन येतात सा आगराभोवते कुपण घातली आहे अमा तिची खबर लौकरच घेतो लोक लौकरच रवाना करावे असे लिहिले त्याची पैरवी गारद हजार पाठवणार आहेत अमां हनोज निघाली नाही व बोरली पेसजी हुजूर कोकणात कोण गेला होता त्यास सनद लेहून दिल्ही आहे की लोक ठेवणे व पागोटे चेक दिल्हा त्याणी सनद बजिनस सरसुभा दाखविली आण सागत आहे की सरकारची वोळख माझी चागली आहे मजला आज्ञा करावी पाच हजार रो मजला हाली द्यावे आपले लोक येऊन जंजिरकराकडे जाऊन त्याचा चाकर म्हणऊन तुर्त मतगड घेऊन देतो असे कबूल केले त्याची रवानगी काल नारायेण जोसी पेणकर याणी करून दिल्ही व जोसी याणी पनास माणूस आपले रखवालीस घरी पेणेस आज रवाना केले आहे येथे तो ज्यास बोलता येत नाही त्याणी जंजिरची मसलतीत सिरावे असे जाहाले कोण्हाजवळ बोलावे काये करावे काये लाच्यारीस कमीन येऊन पडलो आहे याची शरम औलियां —— पाचपीरसाहेबास आहे येथील बातमी वरचेवर लेहून पाठवावी तरी वाटेची कसी निभावेल जासूद गेले ते आपले घरी बसले काये करावे उपाये नाही कमीनास आज तीन दिवस ताप येत आहे अमां तैसाच वाड्यांत जात आहे बापूजीपंत कवडीकर यास खत सरकारचे आले अमां ते सरकार तर्फेकडील काही बोलत नाही त्याजवर घुसा कारण जंजिरकराची तारीफ सांगतो म्हणोन

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

बोलत नाही सिधेचाची चिठ्या दोन चेक महिन्याच्या दिल्ह्या अमां कारखानदार हातीं धरीत नाही तेव्हा कमीनानी आमारतपन्हाचे हवाली केल्या हा चेथील धनीपणा आहे दोनसे रुो खर्चास द्यावयास सागितले त्यास ते म्हणतात तूर्त मजवल नाही बंदगीस जाहीर व्हावे बंदगीस रोशन होये हे अर्जदास्त

[कागदास एक जोड. ऐलेसं. भाग १४ वा पत्र नं. ६३९९ वर मोरोबा फडणीस इत्यादींच्या कैदेचा उल्लेख पहा. पत्र नं. ६३९६ वर गारपिरावरील डेऱ्याचा मजकूर]

ले. २५ रवल २७ } हु { श. १७२४ आषाढ वा १४ इ. १८०२ जुलै २८

बडे मुरंबी अजम सेखसाहेब मुा म्हैसले दाममहबतहु

दं अजी दिल चेखलास वामनराव जनार्दन मुा पुणे सलाम बाजद सलाम महवल मकसूद आंकी [सोडलें] आम्हांकडील बातमी आम्हास रजा आमारतपन्हाची जाहाली खत व दस्तक आल्यास आज चौदा रोज जाहाले तैसेच निघोन यावे तेव्हा अंदेश करून राहिलो बाचेश होलकर याची उचल आहे दक्षणा होये तो वाट पाहा[वी] इतक्यात काये होते ते मालूम पडेल आण आपले कागदी जातील–चेतील बारीक–मोठी बातमी समजेल हे दिली आणोन राहिलो आहे तलकरियास चेथून खत आमारत-पन्हाचे गेले की जंजिरकर याचे लोक म्हसल्यास आहेत त्याजवर छेपा घालावा आण मतगडावर पाचसे माणूस चेथून ..... ते गेले म्हणजे चेकच हला करून ..... हुशार राहावे कोण्हाचा इतबार करू ..... बी लोक बहूत बोलतात अमां त्यावर ... रेवदंड्यास बातमी घडीघडीची व ... ... आहे याची चौकसी बहुत बारकाईनी करावी...यात दाणा नाही पैसा नाही जिनस नाही लोक आहेत ते बेदिल आहेत वख्त हाच आहे पुढे असा येणार नाही अैशा बातम्या येथे डाकचौकीनी येतात ब्राम्हण आणावयाचा हंगाम हाच आहे आता दंगा कराल तितका होईल पेणेकडील ब्राम्हण सात आसाम्या मातबर चा मसलतीत आहेत त्याची नावे

१ नारायेण जोसी पंडित	१ नारायण जोसी श्रीवर्धनकर
१ दादंभट भावे	१ घारंभट धारप
१ रुष्णभट आठवले	१ लक्ष्मण जोसी घागरेकर
१ चिमणाजीपंत दामले	१ बाबाजीपंत साठे मामलेदार रेवदंडा
४	४

सदरहु आसामीस नसीहत कचेबंचेयानसी होईल तरी जाग्याचा आब राहील सदरहू आसाम्यानी जाग्या सबिलपाण्याबराबर केले आहे दुसरे ब्राम्हण यात नाही मोठा नेट याचा आहे हे दिली खुद जाणोन याची पैरवी जसी समजेल तैसी आठा

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

रोजात आम्ही येथे आहो तो जाली म्हणजे चागले येथे आम्ही जो उपाये करावयाचा त्याची पैरवी पाहात आहो काये इलाही करील ते खरे घरी आमचे लडके लाहान आहेत [घरगुती मजकूर वगळला] वाटेची मनाई नाही रा छ २७ माहे **रबिलौवल** ज्यादा काये लिहिणे हे किताबती [तुटक तेथें फाटलें.]

ले. २६ }
रवल २९ }

हु

{ श. १७२४ श्रावण शु।। १
{ इ. १८०२ जुलै ३०

अर्जदास्त [सोडलें] वामनराव जनार्दन मुा पुणें [सोडलें] छ २९ माहे **रबिलौवल** [सोडलें] इकडील मजकूर तरी खंडेराव रास्ते याचे बेटे आज मुहूर्तानी निघोन तल्यास यावयास आपला वाडा सोडून बाहेर पडिले त्यानजीक माहितगार गोविंदराव [सोमण] याचे बेटे व चिमाजी माणकर याचे बेटे व गोपालराव पासलकर व रेवदंडकर सिंदे व कानिटकर राजमाचीकर ऐसे चौघास वाड्यात मेजवानी करून कदीम सिलकी चाकर जंजिरकरासी माहीत सबब नेमणूक करून रवानगी केली बराबर च्यार हजार गारद व मावळी माणूस व देसचे ऐसी रवानगी जाली आहे रेवदंड्याहून बातमी आली की हाच वख्त आहे असा येणार नाही म्हणोन काल बातमीपत्रे येताच उठाऊठ रवानगी केली बंदगीस जाहीर व्हावें साहेबी दंगे करावयाचे दिवस असता अंदेशा का धरिला आहे न कले लावणी राहिली होती तेही जाहाली रेवदंडकर याचे आठ गावची लावणी होऊन आबाद आहेत हे जाणोन जसा उपाये चालल तैसा करावा आपले मुलुकास रजा द्यावी आस्ता कामाची नाही मकान सलामती खेत मिलेल तूर्त ताकीद होऊन पुकार यास समजेल येथील मजकूर सर्व माहितगारी गुलाम ढोकेकर यास सागितली आहे [सोडलें] पेणचे सुभेदार हाली दातार नारोपंत आहेत ते येथे आले [सोडलें] काल रेवदंड्याहून कागद आला त्यात मजकूर की भागवताचे मूल दोन व गोखले याचे दोन ऐसे बाटवावयास काढिले होते त्यावरून कमीनास बोलाऊन नेले आण विचारिले त्यास उतर केले की जंजिरकर याचा ऐवज रुजुवातीचा दरसाल देऊ म्हणोन आपले बुजुर्गाचे दस्तऐवज-तहनामे असता तो ऐवज आम्ही मागतो त्यावरून आपण मसलत करिता चागली गोष्ट नाही वरकड मकान मजबूद इलाही...तमा मागे बहुत बाटविले आलीकडे हे काम साहेबाही टाकिले होते त्याची याद आपण करितात याचे पातक जंजिरकराकडे नाही [सोडलें.] तहचे बोलणे बारकाईनी कमीनाचे आग न दिसता लाविले आहे [सोडले] हाली ब्राम्हण दक्षणास आले आहेत मार्गानी मावलातून जातील उपाये जो जसा होईल तैसा करावा धुलपाचे कागदी आज येथे आले तेथे ढमढेरे आहेत त्याचे आले त्यात लेहून आले की आरमार तयार केले नारल पडला म्हणजे कोठी तोडू [सोडलें] त्यावरून त्याचे खर्चास लाख रुा रोख देविले ऐशा तयाऱ्या जागाजागा

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

होतात कमीनाजवल बोलणे गोड चागले बोलतात आण करणी चालली आहे याचा इतबार काडीचा नाही कमीनानीं आमारतपन्हा आमृतराव यास जोरव्यास कागद लिहिला की नाजक कागद येणे म्हणौन जजिरा पाठविला त्यावरून येथे आलो असता तहचे बोलणे बोलावे ते साडून बाजाराचे निमित्य करून आम्हावर मसलत करीत आहेत त्यावरून त्याणी बाजीराव यास खत पाठविले ते खत पाहून फाडून टाकिले कागदात मजकूर जंजिरकर पाच रुा मागतात त्याची तोड काढून घरोवा राखावा हा मजकूर लिहिला ते फाडून टाकिले होलकर याची समजी पडत आहे वरकड मजकूर मूजवानीं ढोकेकर बंदगीस जाहीर करितील ब्राम्हणास तूर्त वाटऊ नये धारात होईल तितकी वरी आहे बंदगीस रोशन होये हे अर्जदास्त

ले. २७ } श्री { श. १७२४ भाद्रपद वा ३
सुा १२०३ जवल १६ } { इ. १८०२ सप्टें. १४

राजश्री बाजीराव रंगाजी पो कोंढवी गोसावी यासि

दं अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य —— श्रो खंडेराव जाधव सुभेदार किले प्रतापगड रामराम विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत जावे विशेष किले मजकूर येथील मामलत राजश्री बालाजी रघुनाथ याजकडे होती ती सरकारातोन दूर करोन आम्हाकडे सांगितली छ **८ जमादिलावली** किलास दाखल जालो पो मजकूर येथील वहिवाट तुम्हाकडे आहे त्याजप्रो कामकाज महाली चालवावे विजयादसमीच्या मुहूर्ते किलास भेटीस यावे नंतर सर्व बदोबस्त करोन दिल्हा जाईल तुमच्या पतकाचे लोक माहाली चाकरीस आहेत त्यास हाजरीस पाठवावे हाजरी घेऊन माहाली चाकरीस येतील जाणिजे छ **१६ जमादिलावल** सुा **सलास मयातैन व अलफ** बहुत काये लिहिणे [ब*] मोर्तब। सुद

ले. २८ सुा १२०३ } श्री { श. १७२४ आश्विन वा १४
श.१७२४, दुंदुभि आश्विन वा १४ सोम } { इ. १८०२ ऑक्टो. २५

यादी **शके १७२४ दुंदुभि** नाम संवत्सरे सन **सलास मयातैन**

१ आश्विन वा १४ सोमवारी येशवंतराव होलकर याची व बाजीराव रघुनाथ प्रधान याजकडील दौलतराव सिंदे याच्या फौजेचे लढाई जाहली पुणियानजीक वानवडीवर जाली सिंद्याकडील दाहा हजार फौज पडली तेच रोजी बाजीराव व बालोजी कुंजर कारभारी पलोन सिंहीगडाखाली डोणज्यास मुकामास आले आन्नपाणी नाही ऐसी आवस्ता जाली दुसरे रोजी भोजन करून बीरवाडीस मुकामावर आले तेथे एकदोन मुकाम होऊन माहाडास गेले तेथेही च्यारपाच रोज राहून तेथून निघोन

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

पाईचे मार्गानी [हरणई]स गेले चिमाजी आपाही बरोबर होते येशवदाबाई माधवराव नारायण याची बायेको वासी रायेगडास ठेविली बाजीराव व चिमार्जी आपा याच्या बायेका तो गोवा येथे किलावर राहिल्या पुढे बाजीराव रेवदंड्यास गेले–

[ऐतेसं. भाग १४ वा लेख ६४६५ ते ६४८२ पहा. ६४८६ मध्यें यशोदाबाईस रायगडावर ठेवल्याचा उल्लेख. हर्णईस गेल्याचा उल्लेख ले. ६५१० मध्यें व रेवदंड्यास गेल्याचा मजकूर ले. ६५२६ मध्यें आहे. The Gaikwads of Baroda Vol. V, p. 427 वरील जोनाथन डंकनचें २० नोव्हें. १८०२ चें पत्र पहा. फॉरेस्ट–मराठा सीरीज Vol I, पृ. ५५०–५१ वर २६ ऑक्टो. १८०२कर्नल वलोजचें पत्र पहा. संध्याकाळीं पेशवा सिंहगडाखालीं आला. दुसऱ्या दिवशी कोंकणकडे निघाला. शिंद्याचा पूर्ण पराभव. १२ नोव्हें. १८०२ रोजीं बाजीराव बिरवाडीस.]

ले. २९ सुा १२०३
श.१७२४ दुंदुभि कार्तिक शुा ३

श्री

श. १७२४ कार्तिक शुा ३
इ. १८०२ ऑक्टो. २९

कृतानेक असीर्वाद विशेष **कार्तिक शुा ३ भृगुवासर** जाणून [येथाल] वर्तमान यथास्थित असे आपण सुभानजी पवार याजबरोबर पत्र पाठविले ते पावले वर्तमान लेहून पाठवावे म्हणौन लिा त्यास रविवारी येक वेलेपासून होलकराचे फौजेचा व सिंदे याची फौज दोन कपु व लोक दाहा हजारनिसी येऊन श्रीमंताचे वाड्याभवता गराडा दिल्हा होता याची लढाई जुफली ते सोमवारी दिपवाली त्रितीये प्रहरपर्यंत लढाई जाली सिंद्याचे कंपूवर होलकराकडील मान्ये व होलकराकडील सरदार दरेकर [१] होत या तोंडावर श्रीमंत उभयेता व बालोजीबावा कुंजर अैसे निघाले ते कंपूचा मोड होताच निघाल ते डोणज्यास येऊन राहिले होते काल गुरुवारी निघोन मढ्या घाटचे आनछेत्रास आले आले ते वेलेस बारा आसामीनिसी आले साहा राऊत व साहा पाईचे वैसे आले पाठीमागोन काही पाईचे व काही राऊत अैसे आनछेत्रास येऊन मिलाले आज दोन प्रहरा बिरवाडीस येऊन दाखल जाले श्रीमत बाजीराव व चिमाजी आपा व बालोजी बावा कुंजर व बापु फडके व रामचंद्र गोसावी छेयामियाचे ? नातु अैसे आहेत आज संध्याकाली माहाडास जाण्याचा बेत आहे घोडी कुलपली आहेत जातील किंवा राहतील हे नकले याप्रो वर्तमान आहे कालपासून बिरवाडीचे लोकाचा मनसुबा होता घरोघर सडे राहिले होते स्वारी दाखल जाल्यावर ताकीद फिरली की कोणास भय नाही पळू नये तेव्हा मनुशास धीर पोहोचला पाठीमागे काही देशबंधन आल्यास चिंता नाही पेषबंद आल्यास घर सोडावे लागेल याप्रो वर्तमान आहे कलावे सदैव पत्री संतोषवीत असावे

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

पौ कार्तिक शुा ३ भृगुवासर शके १७२४ दुंदुभि नाम संवछरे सन सलास मयातैन व आलफ

[ऐलेसं. भाग १४ ले. ६४६५ ते ६४८२ मध्यें हीच हकीकत; बाजीरावा-बरोबर गेलेल्यांची यादी ६५११ वर पहा. फॉरेस्ट मराठा सीरीज Vol. I पृ. ५५१, ५५२ व ५५९ पहा.]

ले. ३० } श्री { श. १७२४ कार्तिक वा।१०
रजब २२ } { इ. १८०२ नोव्हें. १९

राजश्री हणमतराव दलवी हवालदार किले पारनेरा गोसि

दं अखडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य—श्रो गोविंदराव कृष्ण आसीर्वाद येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत जावें विशेष किले माारच्या सरकारच्या सनदा देऊन चिरंजीव राजश्री वामनराव याची रवानगी करून दिल्ही त्यांस पाऊण महिना होत आला परतु तेथें पोचोन सरकार आज्ञेप्रों बंदोबस्त होऊन काही वर्तमान कलत नाहीं याजकरिता मुजरद सिपाई पाठविले आहेत तरी सविस्तर वृत लिहून पाठवीर्ये वरकड माार चिरंजीव राजश्री मोरोपंत आपटे याजवळ सांगणे तो सांगितला आहे त्याप्रों बदोबस्त करून पत्राचे उतर लवकर पाठऊन द्यावे श्रीमंताची स्वारी काही कारणा-स्तव कोंकण प्रां जाइली बरोबर आम्ही आलो आहो लवकरच घरीं जाणार आहे वरकड माार पत्री लिहावासा नाही किल्याचा बदोबस्त हुशारीने राखोन हुशार राहावें अधिकउणे वर्तमान काही अडलल्यास वरचेवर लिहून पाठवावे बहुत काय लिहिणे लोभ करावा हे विनंति

[यापुढील मजकूर मोरोपंत आपटे व दामोदरपंत भाऊ यांस आहे. त्यांत सारांश वरीलप्रमाणें असल्यानें उधृत केला नाहीं. [नि. अ.] छ २२ रजब

[ऐलेसं. भाग १४ ले. ६५१२ मध्यें गोविंद कृष्ण 'काळे' महाडास बाजी-रावाबरोबर आल्याचा उल्लेख.]

ले. ३१ } श्री { श. १७२४ मार्गशीर्ष वा ६ सुमार
{ इ. १८०२ डिसें. १५

राजश्री विनायकपंत गोधलेकर स्वामीस

विनंति उपरि तुम्ही पत्र पाठविले ते पावलें लिहा मजकूर समजला किल्यावर गलबल जुने लोक स्वारीस खाली होते त्यागी व हवलदार यागी फितुर करून प्रातःकाली दरवाजा उघडताच लोक परवानगी न पुसता आंत येऊन दंगा केला

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

तेव्हा नवें लोकांकडून बदोबस्त दरवाजेयाचा वगैर करून जुने लोकाची हातेरे घेऊन झाडून खाली घालविलें जुना लोक अगदीं किल्यावर ठेविला नाही हर्णईस जंजिरेयाबाहेर इंग्रजी तारवे अकरा नागरवाडेयास बसलीं आहेत तारवावरील लोक दोन पलटणे फुटके टेबपाजवल उतरलीं आहेत याप्रों आतांच केलसीहून तीा रा परशरामपंत मामाकडून लिहून आली विठोजी नाईक यास हरिपंत बाहेर निघत नाही व किले देत नाही इग्रज आला लोक तीन पलटणें खालीं उतरलें किले घेऊन देतों वेकापा यास पाठवण आरबापेकी सेखाची तोड पाडिली दुसरेयाची पाडितो हे विनंति

[तारीख पूना रेसिडेन्सी कॉरेस्पाँडन्स खंड ७ वा पत्र नं. ३१ पृ. ३६ चे आधारें दिली. तेथें हर्णई व सुवर्णदुर्ग येथील गडबड व किल्ल्याजवळील भाग अमृतरावाचे हातीं गेल्याचें आहे.]

ले. ३२ साबान १९ } श्री { श. १७२४ मार्ग. वा६ इ. १८०२ डिसें. १५

राजश्री हणमंतराव दलवी हवालदार किले पारनेरा गोस

दं अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य —— श्रो गोविदराव कृष्ण [काळे] आसीर्वाद विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीयें कुशल लिहीत जावें विशेष तुम्ही पत्र छ **२४ रजबचें** पाठविलें तें पावलें लिा मजकूर सविस्तर कलला आम्ही स्वारीबरोबर म्हाडास होतों नंतर श्रीमंताची स्वारी जलमार्गेकरून वसईस गेलीं आ ··· ··· किले अंजणवेल येथे···तेव्हां पत्री मजकूर लिहिला तो सावि [स्तर] ··· ··· र मोरोपंत पुण्यास पाठविले आहेत रा गोविदपंत निा अभयंकर याणी बलसड माहाली दंगा करून पाटणकर याचे ठाणे उठऊन आपलें बसविले म्हणून पत्री लिहिलें परतु त्याजकडून ठाणें उठऊन पंत मा१ र याणें आपलें बसविले याचे कारण काय आणि पारनेरा यांजविसी वलगना बहुत करितों म्हणून लिा त्यांस तुम्ही व चिरजीव राजश्री तात्या बहुत सावधगिरीने राहावे येकादा शहाणा माणूस त्याजकडे पाठऊन बोलणें करावे की आम्ही सरकारआज्ञेप्रों चाकरीचे लक्ष राखले वर्तणुक केली त्यास तुम्ही भलतीच भाषणें करिता यांत फलादेश काय त्यास सोडचिठी व सनद त्याचे हातीं गेली नाही याजकरितां कांही लबाडी करून दबाव घालून सनद मागावी असल्यास त्यांतील अभिप्राय काहून सोईवार द्रष्टोत्पत्ति येईल तसें करावें केवल कटकट करून फलादेश कांही नसल्यास कलह माजऊ नये पारनेरासमंधे सावकारी कर्ज काहून दरबारखर्च केला त्याचा वाइदा भरोन गेला अद्याप त्यांतील परत काहीच होत नाही तरी सर्व कामें येकीकडे ठेऊन दरबारखर्चाची याद दिल्ही आहे त्याप्रों कसेंही करून त्याची तरतुद [करून] लवकर पाठवा ..... [प्रताप]राव व भवानराव दलवी आले आहेत हे सविस्तर मुखजबानी सांगतां कलो येईल

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

तुम्ही त्यें प्रांतीचे माहीतगार बहुत सावधगिरीने सरकारचा शब्द न येतां बदोबस्त करावा. [नि. अ.] रा छ १९ **सावान** बहुत काय लिहिणे लोभ करावा हे विनति

[नि. अ.] पौ छ १ **सवाल**

[सदर पत्रांत जागा सोडून पुढील पत्र आहे.]

चिरजीव राजश्री मोरोपंत आपटे यांसी अनेक आसीर्वाद तुम्ही गेल्यावर ज्वर येऊन दुखणे घेतलें यास काय म्हणावें चेवढें प्रकरण केले हे तुमचे भरवशावर आणि अद्याप कशास काहीच ठिकाणा नाहीं यास काय म्हणावें तरी सर्व कामें चेकीकडे ठेऊन सावकाराचा उलगडा अगोदर करावा रा मोरोपंत आजच निघोन पुण्यास गेले हुडी हिकडे येई ना तर त्याजकडे पाठवावी हे आसीर्वाद

[ऐतेसं. ले. भाग १४ ले. ६५२६, ६५२८, ६५२९ वर बाजीराव वसईस गेल्याची बातमी आहे.]

ले. ३३
सावान २३

श्री[1] शंकराा

श. १७२४ मार्ग. वा १०
इ. १८०२ डिसें. १९

राजश्री हणमतराव दलवी हवालदार किले पारनेरा गोसि

दं अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य—— श्रो खंडेराव नीलकंठ आसीर्वाद विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीये लिहीत जावें विशेष प्रां गुजराथ येथील सरसुभा व माहालानिहायेची मामलत अनंदराव रामचंद्र याजकडे होती ते दूर करून सालमजकुरी आम्हाकडे सरकारांतून सांगितली सनदा देऊन कारकून रवाना केले आहेत सरकारआज्ञेप्रमाणे बदोबस्त करितील तुम्ही महिमाजीराव सुर्वे याजकडे पत्र मुजरद सिपाई याजबरोबर पाठविले त्याजवरून त्याणी विदित केले की किले माारचे हवालदार लक्ष राखोन किल्याचा बदोबस्त करून हुशार आहेत किल्याचे भरतीस काही लोक पाहिजेत जुने लोक किल्यांतून जाऊन गोविंदराव जोसी यास मिलाले याकरिता भरतीस लोक देवावे म्हणोन विनंति केली त्याजवरून गाडदी दिाा रुकमुद्दीन निाा लक्ष्मण वेशवंत पाऊणसे लोकांनिसी पाठविले आहेत त्याची सावान रमजान दुमाही खर्चाची बेगमी करून दिल्ही आहे याखेरीज बापुजीराव सुर्वे यास पाठविले आहेत हे पनास लोक चागले आपले खातरजमेचे आणितील त्यास किल्यापैकी लोक गेले त्याचे चैवजी करार करून किल्याची चाकरी घ्यावी गोविंदराव जोसी तेथे आले असतील त्याचे पारिपत्य करावें सरकारलक्ष राखोन येकनिष्ठपणे वर्तणुक करणे रा छ **२३ शावान** [नि. अ.] बहुत काये लिहिणे हे विनंति

[2]पौ छ **६ रमजान**

[१, २ निराळीं अक्षरें. या पत्राची तारीख पुढील ले. २० च्या पत्राचे आधारें ठरविली.]

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

ले. ३४ सुा १२०३ साबान २४ } श्रीशंकराप्रां[1] { श. १७२४ मार्ग. वा ११ इ. १८०२ डिसें. २०

राजश्री हवालदार व कारकून किले पारनेर प्रां गुजराथ गोसि

दं अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य ——— श्रो खंडेराव नीलकंठ आसीर्वाद व नमस्कार सुा **सलास मयातैन व अलफ** प्रां मजकूर चेथील सरसुभा आनंदराव रामचंद्र याजकडे होता तो दूर करून सालमजकुरी सरकारातून आम्हाकडे सागितला त्यास आम्ही आपले तर्फेने सरसुभाचे कामावर रा भास्कर सदासिव व चितो रघुनाथ यास पाठविले असेत मशारनिलेचे इतल्याने चालोन किले मजकूर चेथील अलंगनौबत चौकी पाहान्याचा बदोबस्त चेथास्थित करून हुशार राहणे जाणिजे छ २४ **साबान** मोर्तब सुद [ब.] मोर्तब सुद

बार[2]

[१, २ नि. अक्षर. लेखाचे शेवटी डावीकडे पुढील शिक्का : श्रीमार्तंड । पंतप्रधान च । रणी तत्पर खडे । राव नीलकंठ । नीरतर]

ले. ३५ मार्ग. वा १४ } [श्रीकार फाटला.] { श. १७२४ मार्ग. वा १४ इ. १८०२ डिसें. २३

चिरजीव राजश्री लक्षुमणराव सुर्वे सुा किले पारणेरा यासी

प्रति महिमाजीराव सुर्वे सुा दादर ··· आनेक आसीरवाद चेथील क्षेम ता **मार्गसीष वा १४** पावेतो यथास्तति असे विशेष तुम्ही पत्र रा भिवजी विचारे याजबरोबर पाठविले ते पावले व मुखजबानी सागितले ते अैकोन घेतले आण श्रीमत —खडेराव तात्या सरसुभेदार यासी समजाविले त्याणी श्रीमत—पंतप्रधानसाहेब यास सरसुभेदार याणी साहीबास समजाविले त्या ··· आज्ञा जाहाली की किल्याचा बदोबस्त ···व त्याजवरून हवलदार यास सनद [सरसु]भा खडेराव तात्या रास्ते यासी सागितला त्याची सनद आभ्याकर यासी आहे ··· ··· हवलदारासही आहे ती आपणास समजेल चिरजीव बापुजीराव सुरवे याचे पनास माणूस ठेवावे म्हणून हवलदार यासी सनद आहे त्याप्रमाणे लोक ठेवावे शेरा किलेकरी आहेत त्याचा त्याप्रा करावा खाशाची तैनात श्रीमंत बाबासाहेब याच्या हातोन होईल माठे व परवारी चागले पाहून ठेवावे चिरजीव रा जइसिगराव याचा ··· आसामी पतकात करून घ्यावा

[पुढील मजकूर नष्ट. तुटक तेथें फाटलें.]

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

ले. ३६ / सावान २९ } श्री शंकर[1]प्रा[1] { श. १७२४ पौष शु्ा १ / इ. १८०२ डिसें. २५

राजश्री हवालदार व कारकून किले पारनेरा गोसावी यांसि

दं अखंडित लक्ष्मी आलकृत राजमान्य ——— श्री खंडेराव नीलकंठ आसीर्वाद व नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीये लिहीत जावे विशेष राजश्री चिमणाजी नारायेण ठोसर यांस किले मजकूरचे कामकाजास पाठविले आहेत तरी माारनिले व तुम्ही सरकारलक्ष राखोन चेकविचारे वर्तणुक करावी रा छ **२९ सावान** [नि. अ] बहुत काये लिहिणे हे आसीर्वाद

[2]पौ छ **१८ रमजान**

[१ व २ निराळीं अक्षरें.]

ले. ३७ / रमजान ६ } श्री { श. १७२४ पौष शु्ा ८ / इ. १८०३ जानें. १ नंतर

विशेष स्वामीचे आज्ञापत्र छ **२३ तेविसावे सावाण**चे आले ते छ **६ साहावे रमजानी** पावले पाऊन सनतोष जाहला सवकाकडील हकीकत सर्व राजश्री महिमाजीराव सुर्वे यानीं सेवेसी निवेदन केली त्याजप्रमाने स्वामीनी किल्याचे कुमकेस लोक पाऊनसे माणूस रुकमुद्दीन निाा लक्षुमण चेसवत पाऊनसे माणसानसी रवणा केले आहेत दुमाही वेगमी करून म्हणून आज्ञा त्यास उदईक येऊन दाखल होतील रा आनदराव रामचद्र यांजकडील सरसुभा दूर होऊन स्वामीकडेस सरकारातून सागितला त्यास [सरसु]भाची सनद सादर जाहली व सरसुभाच्या कामावर राजश्री भास्कर सदासीव व चितो रघुनाथ पाठविले आहेत त्याचे रजतलबेंत वर्तने म्हणून आज्ञा त्यास ते येऊन दाखल जाहल्यावर सरकारलक्ष राखोन व आपले चरणासी लक्ष धरून रजतलबेत वर्तनुक करून बदोबस्ता राखोन हुशार राहो येथील हकीकत पूर्वी माहाडचे मुकामी पत्र श्रीमत साहेबाकडेस पाठविली ती पावली न पावली ते कलले नाही आनी जाबही आला नाही परतु स्वामीचे शेवकाने सरकारलक्ष धरून तेथून गडनीस सनंदा घेऊन आले त्यास वर घेण्याचा मणसबा रा गोविदराव जोसी याचा नव्हता त्याने आपले तरफेन सीवबदी ठेऊन किला बलकाऊन बसला होता परंतु स्वामीचे सेवकाने सरकार सनदेआनवये साहेबाचे चरणाचे ठाई लक्ष ठेऊन तजविजीने गडनीस यास वर घेऊन किल्याची बदोबस्त सरकारआज्ञेप्रमाने कीला आनि गडनीस आम्ही चेकविचारे राहोन सरकारआज्ञेप्रमाणे सावधगिरी राखोन आधिक आगळी सीवबदी ठेऊन जाण्याचे रक्षन केल जोसीयाने प्रयेत्न फार केला परतु आजप्रयेत स्वामीचे चरणाची लक्ष धरून हुशार आहो जोसीयाणे बलसाड येथे दोन हाजार सीवबंदी ज

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

करून आहे नि ते घेण्याचा बेत होता परंतु स्वामी[चे] पुनप्रतापेकरून जाण्याची [बेगमी] सविबदीची वगैर करून हुशार आहो चेवडयात स्वामीनींही पुस्तपना केला जे पू ··· चे सीवबदीकरिता ज्यादा दोनसे माणूस बदोबस्ताकरिता ठेविले आहे स्वामीचे पुणेकरून जागा राखोन उभयेता हुशार आहो ज्याप्रमाने स्वाम आज्ञा होईल त्याप्रमाने जोसी याचे वेछनुरुच पारप्रंत करण्यास सेवकाकडोन आतर घडनार नाही मी तो आपले चरणाची व साहेबाचे चरणाची लक्षे राखोन सेवा चाकरी करीत आहे सर्व प्रकारे लेकराचे उर्जित करनार धनी आपण आहेत वसईस स्वारी आल्याचे वर्तमान कलते तेव्हाही पत्र व यादी बदोबस्ताची पाठविली आहे ती पावलीच आसतील

[येथें एक कागद संपला; पुढील नष्ट. मूळ कागद जीर्ण; फाटलें तेथें तुटक रेघ टाकली. कंसांत-संदर्भानें आमचें. ऐलेसं. भाग १४ वा. ले नं. ६५४४, ६५५२, ६५६९, ६५७४ पहा. बाजीराव वसईस.]

ले. ३८ } श्री { श. १७२४ पौष-माघ
{ इ. १८०३ जानेवारी

यादी हवालदार किले पारनेरा प्रात गुजराथ येथील कामकाजे करून घ्यावयाची

१ अडशरचि भात चौमासा बेगमी अखेरीस असावी ही चाल असता मामलेदार करीत नाही याचा बदोबस्त कलम

१ किल्याचे काम जुने जाहाले सदरचे व काठीचे व पारबदीचे काम जाहाले पाहिजे जिनस खराब होतो कलम

१ किल्याकडे कारसाई सालाबाद नेमणुक आहे याप्रो भरती होत नाही व भुतसर प्रगण्याहून कारसाई किल्याचे बेगमीस आजपावेतो येत होती हाली येत नाही याचा बदोबस्त कलम

१ किल्याकडे दारूगोला बगमीस पाहिजे याची सो करावयाची आज्ञा कलम

१ किल्याचे रोजमरे व अडशरी वगैरे खर्च होतो याची चिठी होते यास परवानगी किलेदार याची असावी

५

ले. ३९ रमजान ८ सोमवार } श्री { श. १७२४ पौष शु।। १०
{ इ. १८०३ जाने ३.

राजश्री बापुजीराव सुर्वे मुा किले पारनेरा गोस

दं अखंडित लक्षुमी आलंकृत राजमान्य—— श्रो चिमणाजी नारायण ठोसर रामराम विनंति विशेष आम्हीं काल रविवारी सायकाली किले अर्जुन येथे आलो रा

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

हणमतराव हवालदार यांसी पत्र लिहा आहे त्या[जवरून] सविस्तर समजेल किल्ल्या[चीं] फौ[ज]…… लोक व तुम्हीं उदईक दि……चे सुमारें पार[1] नदीवर येऊन रा…… इतक्यांत आम्हीं येऊ बहुत काय लिहिणे लोभ करावा हे विनंति

[नि. अ.] पौ छ ८ **रमजान**

[तुटक तेथें फाटलें. १ पार्वती नदी.]

ले. ४०
रमजान १०

श्री

श. १७२४ पौष शु।। १३
इ. १८०३ जानें. ५

पौ छ १२ माहे **रमजान**

शेवेसी भास्कर दादाजी मुा ठाणे चिरवाडी सा।। नमस्कार विज्ञापना ता।। छ **१० रमजान**पर्यंत क्षेम असो विशेष मौजे वालण घ्या येथे स्वारी माहाडकरी याची येऊन वसली आहे व दुसरी स्वारी आज आली तीही तेथेच आली व तिसरी स्वारी मौजे वालण खुर्द येथे आली किले रायगड स्वारी आणखी उतरली आहे त्याचे लोकाचे आपलेकडील लोकाचे बोलणे जाहले त्यात त्याचे उतर की आम्ही धन्याचे हुकमा[वरून] आलो तेव्हा आज्ञा येईल तेव्हा आम्ही माघारे जाऊ याप्रो बोलतात आणि लोक तोही जमतात त्यास आज्ञा येईल त्याप्रो पुढे करावयासी येईल सुमेकरी यास ताकीद करून रवाना करावे की काय लिहिले येईल त्यासारिखे रवाना करू साराप जबरीसी दिसते व पानेवकर याचे पत्र आले तेही आपणाकडे पाठविले आहे त्यावरून सर्व मजकूर ध्यानात येईल नारायणराव देशमुख व ……णें यासही वालणास रवानगी केली आहे शेवेसी श्रुत होये हे विज्ञापना

[ऐलेसं. भाग १४ ले. ६५४५ पहा. मराठी रियासत उ. विभाग ३ पृ. २१८ पहा. त्याचे आधारें तारीख दिली. फॉरेस्ट मराठा सीरीज भाग १ ला. पृ. ५६१–९ नोव्हें. चें पत्र पहा. पूना रेसिडेन्सी कॉरेस्पाँडन्स Vol. ७ वा पृष्ठ ४३, पत्र नं. ३६ पहा. त्यांत रायगडखालीं तीन सैन्यांचा उल्लेख.]

ले. ४१
रमजान २०

श्रीशंकर [1]प्रा

श. १७२४ पौष वा।। ७
इ. १८०३ जानें. १५

राजश्री हणमतराव दळवी हवालदार गोसावी यांसि

दं अखंडित लक्ष्मी आलरूत राजमान्य —— श्रो खंडेराव नीलकंठ आसीर्वाद विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीये लिहीत जावें विशेष तुम्ही पत्र छ १४ **रमजानचे** पाठविले ते पावले राजश्री चिमणाजीपंत ठोसर याणी लिहिले आहे त्याज-

---

१ [नि. अक्षर.]

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

वरून निवेदन होईल म्हणून लिहिले त्यास त्याचे पत्राचे उतर अलाहिदा माारनिलेचे नावे पाठविले आहे सविस्तर कलेल किल्याचा बदोबस्त यथास्थित राखोन हुशार राहावे रा। बापुजीराव सुर्वे यास पनास आसामी नवे ठेवावयास सागितले आहेत ते किल्यापैकीं लोक निघोन गेले त्यांचे चैवजी त्या सरंजा[मा]त ठेवावे मसलती लोक तुम्ही ठेविले असतील ते रा। बापु मजमदार तिकडे आले म्हणजे त्याजबराबर द्यावे गल्याची वगैरे बेगमी बापु करून देतील रा। छ **२०ं रमजान** बहुत काये लिहिणे लोभ करावा [नि. अ.] हे विनति

[नि. अ.] पौ छ **२५ रमजान**

ले. ४२
पौ रमजान २३

श्री

श. १७२४ पौ वा। १०
इ. १८०३ जाने. १८

राजश्री हणमंतराव दलवी हवालदार गोसावी यांसि

दं अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य——श्रो बापुजी नारायण रामराम विनंति विशेष पत्र पाठविले ते पावले लोकाचे हिसाचाविसी लिहिले त्यास राजश्री गोविंदरावजी येथे आहेत कसे हिसेब पटवायाचे असतील तैसे कोणी पाठऊन द्यावे वरकड आम्ही त्यास सागितल परतु त्याचे उतर की जो वेव्हार जाहाला तो फिरावयाचा नाही जिनसांची याद पाठविली त्यास रावजीची गाठ पडली नाही पडली म्हणजे सागू दिल्यास पाठऊ आपलेकडील काणी आला असता सारेच उलगडे होतील जिनसाविसी विचारले त्याचे म्हणणे किल्याकडे फाजील येणे आहे त्याचे फडशे व्हावयाचे त समई तसमांत रुजुवातीने असल्यास त्याचेही होईल बहुत काय लिहिणे लोभ करावा हे विनंति

[नि. अ.] पौ छ **२३ रमजान**

ले. ४३
पौ सुा १२०३ सवाल १२

श्री

श. १७२४ माघ शुा १४
इ. १८०३ फेब्रु. ५

राजश्री हणमतरावजी हवालदार किले पारनेरा गोसावी यासि

दं अखडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य ——— श्रो आनाजी नथो सुा किले पारडी रामराम विनंति येथील कुशल जाणून स्वकीये निजानंदलेखन करीत आसीले पा। विशेष आपणाकडील माणसाने येथे तोफन केले त्याजविशई नूरममद याजसमागमे पत्र पा। होते परंतु पत्राचे उतर न पा। हे स्नेहास उचित नसे येथून आपणासी दुसरा विच्यार ठेवीत नाही व ते जागा व हे जागा दोन मोजीत नाही आपले आमचे स्नेहाचा रुणानबंध बहुत दिवस चालत आला आहे तेथे आसे नसावे सिपायास ताकीद असावी की कामकाजास अलियास बखेडा न करीत तथापि तसे

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

काही आसल्यास आम्हाकडे यावे आम्ही आंतर करणार नाही आसे श्रेह ··· चालत आल्याप्रमाणे चालवावे हेच उतम नाहक सिपाई बसून राहिले आहेत हे श्रेयास उतम दिसत नाही यास्तव नूरभाईस पाा आहे हे सर्व सागता श्रुत होईल येथून आपणासी कोणेपरि दुसरा भाव नाही त्याप्रमाणेच आपणाकडूनही आसावे सुज्ञास विस्तारे लिहावेस नाही सर्वदा रुपेची वृधि आसावी बहुत काय लिहिणे लोभ करावा हे विनंति

राजश्री वामनराव तात्या स्वामीस साा नमस्कार विनंति नूरभाई सांगता येथील सर्व श्रुत होईल रुणानबधे श्रेहाची जोडी जाली आहे तेथे आसे नसावे रुपेची वृधि आसावी सुज्ञास फार काय लिहू हे विनंति

[नि. अ.] पौ छ १२ **सवाल सुा सलास मयातेन अलफ**

ले. ४४ माघ वा ५ | श्री | श. १७२४ माघ वा ५ इ. १८०३ फेब्रु. ११

राजश्री हणमंतराव दलवी हवालदार किले पारनेरा गोास

दं अखाडित लक्ष्मी आलंरुत राजमान्य —— श्रो मोरो चिमणाजी वझे रामराम विनंति उपरि येथील कुशल तागायेत **माघ वा ५** जाणून स्वकीये कुशल लिहीत असिलें पों विशेष आम्ही कांही कामकाजाकरितां श्रीमताकडे वसईस आलों तों तुम्हाकडून रा दामोधरपंत आलें ते मेाेन सर्व मार सांगितला तेणेकरून संतोष जाहला येथील किल्याप्रकर्णी सरकारातून कामकाजें व्हावयाची त्याची याद समजाऊन घेऊन मारनिल्हे माघारें रवाना केले आहेत हे मुखजबानी सांगितील त्याजवरून सर्व कलेल रा प्रतापराव व भवानराव दलवी गेले ते पोचलेच असतील हाली रा येशवंतराव दलवी याणी पत्र तुम्हास दिल्हे ते पाठविले आहे व तीा राजश्री—रावजी उभयतां यांची पत्रे पाठविली आहेत त्याजवरून सर्व कलेल तुम्ही व राजश्री —— तात्या येकविचारे चालून बंदोबस्त राखिलात तेणेकरून बहुत समाधान रावजीस जाहले आहे दरबारखर्च कर्णे तो कर्ज काढून केला त्या सावकाराची निकड बहुत लागली आहे त्याची तरतूद करून पाठऊन देतो म्हणून तुम्ही पेशजी रावजीचे पत्री लिहिलेच आहे त्याप्रो अेवज लवकर यावा येथील कामकाजे करून घेऊन लवकरच तिकडे येऊ असें आहे बहुत काय लिहिणे लोभ करावा हे विनंति

[नि. अ.] पौ छ २५ **सवाल**

[याच पत्रांत जागा सोडून दुसऱ्यांनीं दळव्यांस खुशालीचा मजकूर लिहिला आहे तो उधृत केला नाहीं.]

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

ले. ४५
पौ सुा १२०३ मोहरम १५ } श्रीसांभ { श. १७२५ वैशाख वा १
इ. १८०३ मे ७

विनंति विशेष राजश्री रावबाबा याजकडून दोन हती व काही सामान श्रीमंत साहेबाकडे जात आहे त्याजबराबर पनासाठ गाडदी इंग्रेजाचे व चेक टोपकर आहे त्याचा आज येथे मुकाम आहे कलावे दुसरा इंग्रेज व तोफा होत्या त्या व्यापाऱ्याकडे गेले सोनगडचे रोखे जाणार येसे ऐकितों बहुत काये लिहिणे लोभ करावा हे विनंति

[नि. अ.] पौ छ १५ मोहरम सुा सलास मयातैन व अलफ

[The Gaikwads of Baroda vol. V, पृ. ४४० वरील १२ एप्रिल १८०३ चें पत्र पहा.]

ले. ४६
वैशाख वा ११ } श्री { श. १७२५ वैशाख वा ११
इ. १८०३ मे १७

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री मोरोपंतदादा स्वामीचे शा

पो भिकाजी गणेश चिपलोणकर सां नमस्कार विनंति ता **वैशाख वा ११** क्षेम आसो विशेष आपण पत्र पा ते पावले स्नेहाचा मजकूर तपसिलें लिा त्यास इतकें विस्मरण मजला व्हावयाचें नाही किल्यावर आपल्ये भेटीस यावें खरे परंतु किल्यावर आपण सांप्रत आहा नाही याचाच संशय व किल्याचें भयहि अेकिल्यांत होतें याजकरितां परभारे आलो रा बाबा पुण्यांत आहेत नाही याचा शोध लागावयाचा समय नव्हता ज्याचा त्यास वाडा पारका आम्ही ज्या सोंगानें होतो तो मार बालोजी नाईक यांस सांगितला आहे चिमाजीपंत नानाचाही मार सांगितला आहे हलाखी नानाची पत्रीं लिहितां येत नाही आम्ही विरमगांवी जरूर म्हणौन जाणे गेलो न गेलो व्यर्थ अशा भावने जातो यांत समजावे सरसुभा आमंदाबादचा बलवंतराव नागनाथ यांस जाला आहे परंतु दखल होईल त्या काळीं खरी हे विनंति

[ऐलेसं. भाग १४ ले. ६६६५ मध्यें बळवंतराव नागनाथास अहमदाबादचा सुभा व मामलत मिळाल्याचा व सनदांचा मजकूर]

ले. ४७
मोहरम ७(२७) } हु { श. १७२५ वैशाख वा १३
इ. १८०३ मे १९

अर्जदास्त [सोडलें] वामन जनार्दन सुा पुणें [सोडलें] ता छ ७ माहे **मोहरम** [सोडलें] कमीन साहेबाचा हुकूम घेऊन येथे आलो ते तिसरे दिवसी पंडित प्रधान याची भेट जाहाली ती उतावलीची बोलणे न जाले सरकारचे खत रुजु केले व जी……चा दिल्हा त्यानंतर बोलणे बोलण्यास सांगितले की खडेराव रास्ते याजवल

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

बोलणे सांगितले आहे ते बोलतील त्याचे उत्तर करावे त्यावरून कमीनानी सांगितले की काये बोलणे असेल ते रुबरुच बोलन त्यास रास्ते याणी विचारिले की तुम्ही येथून पंचवीस हजार रुो व दोनसे खडी भात घेऊन गेले त्याप्रो चैवज तुम्हास पावला असता ब्राम्हण मात्र सोडले प्रातात उपद्रव नाना प्रकारचे ब्राम्हणाच्या बायेका माहार मुसलमान याणी धराऱ्या गावगना रुो घ्यावे मनमाने तैसे प्रांतात दंगे केले त्याचे मुद्दे ... चिठ्या वजिनस आहेत तुम्ही खंडणी माहालानिहाये येथे घेता त्यास तुम्हाजवल काये दस्तचैवज सरकारचे आहेत ते दाखवणे आण आजलग चैवज घेतला तो भरून देणे हाली तुम्हाकडून प्रांतात दंगा आहे त्यास येविसी तुम्ही किती दंगा करिता तो करणे कोंकणपटी उज्याड पडिल्यास चिंता नाहीं श्रीमंताचा प्रताप थोर आहे तुम्ही हुशार राहावे तुम्हावर मोहीम आहे यैसा मजकूर रास्ते याणी सांगितला त्याचे उत्तर कमीनास जाहाले ते केले कारण श्रीमंताची आमची भेट येकांती जाहाल्यावर याचे उत्तर करू दरम्यान बोलत नाही जे बोलणे ते रुबरुच बोलो त्याजवरून मुलाकात घ्यावी तो आमारतपन्हास ज्वर येत आहे आजच हुशार आहेत इंग्रज यांची कुमक करणार व सुर्तेहून बालूमिया साहेबजादे याजकडे कागदी गोपालराव मुनसी याणी पारसी लेहून पाठविले त्याचा मजकूर साहेबजादे याणी पुणेयास यावे इतका मात्र मजकूर लेहून पाठविला आहे अमारतपन्हाची मर्जी दग्यामुळे चागली नाही साफ बोलणे आहे की जातीचे ब्राम्हण असतां ब्राम्हणास उपद्रव देऊन चैवज मागणार ... मजकूर ... हाली बंदगीस अर्जदास्त लिहिली आहे साहेबी हनोज तरी असवारिया गेल्या असतील त्या आणऊन फिरोन न जात अैसे फर्माविले पाहिजे कमीन येथे बोलणे काये बोलावे लाच्चार करून ठेवितात बोलण्यास जागा नाही अगर खंडणीचा दस्तचैवज कागदपत्र कमीनानजीक नाही काही जे असतील ते तरी कमीनाकडे रा॥ फर्माविल्यास बोलण्यास बल पडेल पडित आमृतराव जोरवे गंगथडीनजीक आहे तेथे आहेत कबिला सावताचे वाडीस माहेरास गेला आहे सिदे होलकर याची समजी जाली नाही वरकड काही गलबल राज्यात नाही वकील साऱ्याचे आणोन खंडण्या मागतात नाहीतर मोइना करितो असे म्हणतात बोलणी लागली आहेत बाबूराव आगरे पाशाणे चापलीकडे आहेत त्यास तेथे राहावे मागे जाऊ नये पुढे येऊ नये आज्ञा होईल तेव्हा यावे असे करून त्यास तेथेच ठेविला आहे त्याचे बोलणे लागले आहे सरकारचा जाबश्याल जो ठरल तो वरचेवर बंदगीस अर्ज करीन बंदगीस रोशन होये हे अर्जदास्त

[या पत्रांत ७ मोहरम ही तारीख दिली आहे; पण ऐलेसं. १४ ले. ६६३३, ६६३४ व ६६३८ या पत्रांतील मजकूर प्रस्तुत पत्राशीं जुळता असल्यामुळें त्या पत्रांच्या अनुरोधानें या पत्राची तारीख ठरविली पाहिजे. ऐलेसं. १४ ले. ६६३३ व फॉरेस्ट पृ. ५९६ वरून बाजीराव १८ मोहरमच्या सुमारास किंवा अधिक बरोबर म्हणजे ७ मे १८०३ पर्यंत पुण्यास येऊन पोहोंचला नव्हता हें स्पष्ट होतें. या पत्रांत

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

तर लेखक पुण्यास बाजीरावास भेटल्याचें सांगतो; म्हणून पत्राची तारीख २७ मोहरम असली पाहिजे. पूना रॉसिडेन्सी कॉरेस्पॉंडन्स पृष्ठ ७४ पत्र नं. ६६ पहा. बाजीराव चिंचवडास ता. ९ रोजीं येत आहे.]

ले. ४८ } हु { श. १७२५ ज्येष्ठ शुा ८
सुा १२०३ सफर ६ } { इ. १८०३ मे २८

अर्जदास्त [सोडलें.] वामनराव जनार्दन मुा पुणें [सोडलें] ताा छ ६ **सफर** सुा **सलास मयातैन अलफ** [सोडलें] आमारतपन्हा बाजीराव व चिमाजा आपा सासवडास मेजवानीस वैद्याचे घरी गेले तेथें तापानी पडले त्यास आमारतपन्हा आमृतराव याचा कबिला तवळुद व्हावयास आपले माबाप याचे घरी सावताचे वाडी येथे घर होते तेथे गेला होता तो फौत जाला व बेटा जाला होता तोही फौत जाला ते सुतक आले आहे सासवडाहून पुणेयास आले नाही येणार आहेत [सोडलें.] मांडल तपेयाची लावणीची हकीकत काये जाली ते माळुम होत नाही हाली रेवदडकर याचा उपद्रव आहे की नाही ते समजत नाही कज्या तूर्त मोडावा असे साहेबाचे दिली असल्यास येथे तोड काढून तूर्त मतलब करून घेतो नाहीतर मग उगाच हिसके घ्यावयाचे काम नाही त्याजकडे खेपा घालाव्या तो फुगोन मुतसदी जातात कमीन त्याचे घरी जात नाही सरकारचे वाड्यात जाऊन तेथे जाबस्वाल होणे तो होतो साहेबाचा हुकूम जलद यावा म्हणौन कागदी राा करितो ते तेथे जाऊत धरी बसतात [सोडलें.] कमीन तल्यास असतां अजम बाबाजीपंत गोखले सुभेदार यांचे बोलणे पडिले की आमचे मुतसिलात तुमचा जकातीचा अमल आहे त्याचे कदीम सिरस्ते दरसेकडा दुतर्फा रुा पाच जकात घ्यावयाची चाल असता श्रीवर्धन येथील सुपारीचा इजारा पारसी यास दिल्हा तो तीन रुा सेकडा सागतो त्याजवरून कमीनानी हुजूर अर्ज केला त्यावरून परवाना पारसी यास दिल्हा की कदीम जकातीची चाल सेकडा पाच रुा प्रो आहे त्या मोजीब देत जाणे [सोडलें.] हे अर्जदास्त

[ऐलेसं. भाग १४ पत्र नं. ६३९० मध्यें बाजीराव सासवडास गेल्याचा व मेजवानीचा उल्लेख. ६६३८ मध्यें अमृतरावाच्या भार्येच्या निधनाचा उल्लेख. सफर ६ अव्वल व अखेर सालींहि आली असल्यामुळें तारीख ठरवितांना खरेशास्त्र्यांचा गोंधळ झाला आहे.]

ले. ४९ } श्री { श. १७२५ वैशाख.
{ इ. १८०३ मे पूर्वी

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री देवराव रावजी स्वामी गोसावी यांसि

पौ दामोदर विठल मुा बोरगाव ... [सामान्य मजकूर] इकडे पेढारियाचा [उपद्रव] फार लिहिता पुरवत नाही नेरल्याची वाडी माहालची झाबडली घोडी च्यार

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

नेली बायेका लुटल्या वाटसरू ठार केले आनेक प्रकारचे उपद्रव भोवारे गावास केले ते लिहिता न येत आपण सावध असून कामकाज करावे तिकड दगा पेढारियाचा नसल्यास लेहून पाठवावा म्हणजे मंगळा घोडा आपल्याकड पाठऊन देऊ घोड्याचा बच्चाव जाला पाहिजे ... हे विनंति

[पूना रेसिडेन्सी कॉरेस्पाँडन्स Vol. 7 पत्रें ७२, ७३, ७४ पहा.]

ले. ५० } श्री { श.
रखर २७ } { इ.

राजश्री हणमतराव दलवी किले पालगड गोसावी यांसि

श्री विसाजी लक्ष्मण आसविाद विशेष तुम्ही पत्र पाठविले ते पावले तेथे फाजेचा मार लिहिला तो कलला मेढा घालून चौकीपाहरेचा बदोबस्त करणे चौकीपाहारा करून हुशार राहणे रा छ **२७ रविलाखर** हे विनति

[नि. अ.] पो छ **२८ राखर**

ले. ५१ } श्री { श. १७२५ ज्येष्ठ शु।। ११
सफर १० } { इ. १८०३ जून १

राजश्री हनमंतराव हवालदार किले पारनेरा गोसावी यांसि

दं अखंडित लक्ष्मी आलकृत राजमान्य—श्री नारायेणराव नीलकठ मुा बिलिमोरें रामराम विनंति येथील कुशल ता। **१० सफर** जाणून स्वकीयें कुशल लिहीत गेले पा। विशेष आपली आज्ञा घेऊन निघालो ते येकादसी मगलवारी च्यार घटका रात्रीस पावलों येथे वर्तमान समजे की इग्रेजाचा सरजाम सुरतेहून हजारबारासे माणूस व सा तोफा पारनेऱ्या जाण्यास बाहेर निघाल्या आहेत आज मुकाम घणदेवीचा होईल ऐसें आहे आपणास सूचना असा[वी] म्हणोन सिपाई रा। केले आहेत तरी आपण सावध असावें आमची घरची कालजी आपणांस आहे घरी नाना आहेत जे सागतील ते कृपा करून देऊन वस्तवानी घरातून बाहेर निघे ते केले पा। या समई हैगईवर नऊ नये बहुत काये लिा। लोभ करावा हे विनंति

[पत्राची तारीख जून १३ च्या पत्रावरून ठरविली. The Gaikwads of Baroda vol. V पृ. ३६३ पहा. सुरतचें इंग्लिश सैन्य व्याऱ्यास किंवा सोनगडास पावसाळ्यांत मुक्काम करण्यास निघत आहे. याच संदर्भात पृ. ३६५, ४ जून १८०३ चें पत्र पहा.]

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

ले. ५२ श. १७२५ मुा १२०४ सफर २२ } हु { श. १७२५ ज्येष्ठ वा ९ इ. १८०३ जून १३

अजम हणमंतराव दलवी हवालदार किले पारनेरा दाम मोहचतहु

दं अजी दिल येखलास कपितान हारटण सलाम बाजद सलाम अंकी येथील खर जाणोन तुम्ही आपली खैरआफियेत कलमे करीत असावे दिगर सरकारआज्ञा ऐसी कीं किले पारनेऱ्याचा दखल जखिऱ्यासुधां हवाले घेऊन त्याचे कबज पाहिजे यैसे असल्यास द्यावे ते अमलांत आणावयाबद्दल आम्ही आज तेथे येत असों येविसीं आम्हाजवल आज्ञापत्रें आहेत तीं म्हणाल त्यास दाखऊं जादा काये लिहिणे प्यार मोहोबत असों देणे मुा छ २२ **सफर** हे किताबत

[नि. अ.] पौ छ २२ **सफर** मुा **आर्बा मयातैन व अलफ शके १७२५**

[नि. अ.] R. H. Horton Capt. Command the...

ले. ५३ सफर २२ } हु { श. १७२५ ज्येष्ठ वा ९ इ. १८०३ जून १३

अजम कपितान हारटण दाम मोहचतहु

दं अजी दिल येखलास हणमतराव हवालदार सलाम बा[द]ज सलाम अकी येथील खैर जाणोन तुम्ही आपली खैरअफायत कलमे करीत असावे दिगर सरकार-आज्ञा ऐसी की किले पारनेराची दखल जखिऱ्यासुधा हवाले घेऊन त्याचे कबज पाहिजे असल्यास द्यावे ते अमलात आणण्याचा आम्ही आज तेथे येतो असो आज्ञा आम्हाजवल पकी आहे म्हणोन लिा त्यास आज्ञा आहे ती आम्हास न दाखविता आमचे परगण्यात यावयाचे कारण काय वेव्हार सरकारी असे असता सरकारआज्ञा न दाखविता तुम्ही आला उतम गोष्ट आहे सरकारआज्ञा आहे म्हणोन आता तुम्ही लिहिता त्यास आम्ही पाचचार वेले लिा की सरकारआज्ञा आहे ती पाहावयासी पाठऊन द्यावी ती पाठविली नाही हली लिा त्यास सरकारआज्ञा आहे किवा नाही हे कशावरून खरे मानावे तुम्ही फौजसुधा किल्याखाली उतरला जबरदस्तीने आता सरकारचे आज्ञेचे प्रमाण राहिले नाही आज्ञा होती तर पूर्वीच लिा होते तेव्हाच पाठवावयाची होती ज्यादा काय लिहिणे प्यारमोह[ब]त असो देणे मुा छ २२ **सफर** हे किताबत

[The Gaikwads of Baroda vol. V पृ. ४४७, २३ जुलै १८०३ चें पत्र पहा.]

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

ले. ५४ पौ रवल १७ } श्रीसांभ { श. १७२५ आषाढ वा ३ इ. १८०३ जुलै ७

राजश्री वामनराव रावजी स्वामीचे सेवेसी मल्हार बाजी व भगवंत बाबूराव सां दंडवत विनंति विशेष डोंगरीचे चौकीदारास चिठी पाठविली ती पावली सोनगडचे मार्गे फतेसिंग गायेकवाड पंधरा हजार फौजनसी चेऊन व्याऱ्याचे ठाणे घेतलें तेथे बालाजीपंत नवसरीस सुभाचे कामावर होते ते मागे पलसाऱ्यास आले व इंग्रेज बारडोलीस आला चिखली झाडोन पलोन मोटा सुरजी देसाई बलसास आला ऐसे ऐकिले ते लिहिले आहे लोभ करावा हे विनंति

[नि. अ.] पौ छ १७ रौवल

[The Gaikwads of Baroda Vol. V पृ. ३७९ ले. २, ३, ४ पहा बाळाजीपंत = बाळाजी लक्ष्मण. होळकराच्या मदतीनें फत्तेसिंग लढत आहे.]

ले. ५५ सुा १२०४ रजब १८ } + श्रीगजानन { श. १७२५ कार्तिक वा ५ इ. १८०३ नोव्हें. ४

[बदामी आकाराचा शिक्का]

आज्ञापत्र अजस्वारी राजश्री बलवंतराव अनंत सुभेदार प्रांत राजपुरी ता॥ खोत गावगना तो गोवेले सुा **आर्बा मयातैन व आलफ** तुम्ही पत्र पाठविले ते पावले पाहाणदार सालिम सुकव्याची पाहाणी करीत नाहीं व पाहाणदार चाजबराबर जमीदार असावे व जंजिरकर वसुलाचा तगादा करितात म्हणोन लिहिले ते विदित जाले ऐशास जंजिरकर याचा व सरकारचे बोलणे होऊन कोण्हीयेक ठराव जाला जंजिरकराकडील माहाये परवाने व त्याजकडील स्वाऱ्या मुलकात आहेत त्यास उटवून नेले याकरिता जंजिरकरास येक पैसा नख्त अथवा ऐनजिनस येक शेर वसूल न देणे वरकड पाहाणदार यास आलाहिदा पत्र पाठविले आहे ते सालिम सुकव्याची पाहाणी करितील पाहाणदाराबराबर जमीदार जावयाचे त्यास कुलकर्णाचें वतन सरकारात जफ्त आहे त्यापेक्षां ते यावयाचे नाहीं देशमुख यासी ताकीद जाली आहे त्याजकडील कारकून येतील +जाणिजे छ १८ रजेब +मोर्तब सुद [ब.*] मोर्तब सुद

+पो छ २१ रजबू

[+ निराळीं अक्षरें]

ले. ५६ सुा १२०४ साबान १२ } श्री { श. १७२५ मार्ग शु॥ १४ इ. १८०३ नोव्हें. २७

अज स्वारी राजश्री नारो आबाजी सुभेदार तो महिपतगड ता॥ कमाविसदार को विन्हेरे ता॥ मार सुा **आर्बा मयातैन व अलफ** चोरटे मुलखामध्यें जाहाले होते

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

ते चेकीकडेसच धरून छपाऊन ठेविले साा मसाला चेकूण रुा येणे—प्रो ५ भीवराव मोरे ३ म्हार ८

चेकूण आठ रुो मसाला देऊन देखत चिठी निघोन चेणें जाणिजे छ १२ माहे **साबान** मोर्तब सुद [ब*] श्री मोर्तब सुद

ले. ५७ पौष शुा १३ } श्री { श. १७२५ पौष शुा १३ इ. १८०३ डिसें. २६

राजश्री गणपतराव नाना देशमूख ताा बीरवाडी गोसावी यांसी—

दं अखंडित लक्ष्मी आलंरुत राजमान्ये——श्रो आमृतराव देशमूख व सदाशिव केशव व मोरो गोविद देशपाडे कुलकर्णी व समस्त रयेत गावगना ताा मजकूर रामराम विनंति विशेष दोन हस्ते सरकारचें लाविले तिसरे हस्तेयाचे रोखे जाहाले हुजूर सुटीविसी दोन आर्ज्या गले चास माहिना जाहाला आद्यापी हुकूम आला नाही देशात तीन हिसे सूट सरकारातोन चेऊन किर्दआवादी जाहाली कोंकण प्राती····· सुटी आल्याचे वर्तमान आहे आजपावेतों नऊदाहा रुपयावर खंडीस दर नाही वीट कीड खाद व पर्ज्यन्यानी दर्यागर्क आवणे तरवें व लावलेली सेते वाहून नुकसानी जाहाली व चांगली सेते आली त्यास पीक दरोवस्त बुडाले कोठें बिघ्यास दाहामण यंधरा मण असीं उत्पन्नें मलण्या काढल्या त्याचे उतारे जाहाले याजमुळे हाहाकार फार जाहाला आहे आम्ही सर्व मिलोन हुजूर जावयास नाते येथे गेलो राजश्री मोरोबा आबा चास तुम्हीं सरकारची चिठी घेण्याकरिता पाठविली ते तुम्हाकडे चावयास निघालें त्यास आम्हीं राहून घेतले आणि तुम्हास लिहिले आहे तरी श्रीची शफत तुम्हास आहे तरी पत्रदर्शनी निघोन यावें बहुत काय लिहावे लोभ करावा हे विनंति करपत्र रााां **पौष शुा १३** तुम्ही येण्यास आनमान दिरग लावाल तरी श्री कुलस्वामीची व वडिलाची शफत असे हे विनंति

ले. ५८ फाल्गुन वा १२ } [श्रीकार फाटलें त्यांत गेला] { श. १७२५ फाल्गुन वा १२ इ. १८०४ मार्च ९

अपत्ये दाजीबाने व सदोबाने चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील क्षेम ताा **फालगुण वद्य द्वादसी** मुा बडोदे येथ सुखरूप असो विशेष वडिली दोन पत्रे पाठविली लिहिला मजकूर सविस्तर कलला व चिरंजीव अले त्यानी सर्व कचे वृत निवेदन केले त्याजवरून सर्व ध्यानास अले इकडील मजकूर तरी श्रीमंत राजश्री फतेसिंगराव याचे लस्कर मालवा किला ... वी नजीक आहे तेथ मोर्चे लागले आहेत श्रीमंत मात्र लग्नाकरिता बडोदिया अले तो निबालकर देसीहून येणार होते ते

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

न अले याजमुले ते लग्न राहिले श्रीमत सयाजीबावा यांचे मात्र कन्येचे लग्न फालगुण वदे शष्टीस जाले राजश्री रवलोजी सिंदे यांस मूल दिल्ही लग्नसमयास चिरंजीव येऊन पोहचले हाली श्रीमत फतेसिंगरावबावा वर्शप्रतिपदा जाली म्हणजे सैन्यात जाणार अहेत लग्नाची तरतूद मंडप वगैरे चाली जाली याजमुले श्रीमत सतोश अहेत अपल्या ... ममता पहिल्यापेक्ष्या विशेष अहे बाबा लस्करात खुशाल अहेत घराऊ मजकूर तरी काही ... [दिव]स अखेरीचे अहेत अम्हाकडून काही स ... त नाही येथही लोकाचे देणे बाराचवदा हजार ... याचीही गलचीपच अहे सर्व गोष्टी ईश्वर वडिलाचे पुण्यकरून पार पाडील आपण कोणा गोष्टीची चिंता न करावी गावचा मजकूर लिहिला त्यास कसैतरी करावे परतु सरकारातून सोंडऊन घ्यावा आपण पुण्यास जावयाचे असले तरी जलदीने सडे जाऊन गावचा बदोबस्त करून लवकर माघारे यावे वैशाख मासी इकडे यावे लागेल इकडे आलियावर श्रीधारकानाथ घडून पुढेही श्रीइछेने सर्व येथास्थित घडल आपले येणे इकडे जाले म्हणजे गावचे काम तसच राहील पुन्हा देशी जाणे श्रीसतेन घडल तोपर्यंत वतन जो तुम्ही बहुता दिवसाचा गाव गेलेला मिलविलात तो पुन्हा अपलेच हाते गेला मणजे उचित नाही प्रेत्न करून साडू नये सपदियाचे हावली करून यावें चिरजीव याची मर्जी काय ते काही कलत नाही अस्तु आपण पाहातील तसे करती[ल] देशी जाऊन कोण्हाचे पेचात न यावें कर्ज तो जन्मास लागलें मागील फिटल म्हणून म्हणून पुढें प्रेत्न करावा तरी आणिक कर्ज होतच आहे अता कालजी काये लि[हावी] सरजामाची बेगमी करून दोन दिवस ... [पुढील मजकूर नष्ट]

ले. ५९ } [पत्राच्या आरंभींचा भाग नष्ट] { श.१७२६ कार्तिक शु।। १५ नंतर / इ. १८०४ नोव्हें. १७ नंतर

सर्वास ...घड ही जाल्या तेथून पुढे मार्गाचा बंदोबस्त करून बाबा... रानगी करून देतील वडिली पुन्हां भावनगरापावेतो काठेवाडची स्वारी परत करण्याचा मनसुबा योजून तालुके चुकवीत हाली मोरबीवर आहेत तेथील उलगडा जालियावर पुढें जीर्णगड फुल-बंदरपावेतों जाऊन काठेवाड प्रांतीचा सालमाारसुध्धा मुलुकगिरीचा फडशा करणार भावनगर चुकोन आलीकडे आलियावर भेटीचा संकेत घडून चरणेदर्शन घडावे ऐसे मोजीत होतो परंतु मुलुकगिरीचा हंगाम या हंगामी फडशे लौकर चुकतात सराईचे दिवस यामुले भूमे जरब खाऊन चुकवितात तो हंगाम चुकल्यावर मोठा प्रेत्न मसलतीसी गांठ आसे विचार जाणोन वडिलीही लिहिले प्रस्तुत जंसी बडोद्यात दौलतीची बोढ तसीच लस्करात मला जाली याकरितां भूम्यांचे फडशे होतील तितके आपल्यास हिनावह भेटी आज नाही उ[द्यां] श्रीसते होतील दूर नाही त्यावरून विचार पाहता[भे]टीच्या योगे कितेक गुंते च्यार दिवस लागोन लांबणीवर पडते संपूर्ण मुलुकगिरी बुडते तेव्हा जाण्याचा बेत

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation,Chandigarh

उतम त्याप्रों गेले श्रीसांबप्रतापे व खावंदाचे नेकसलेकडून भूमे पादाक्रांत होऊन सालमजकूरचे खंडणीचा फैसला करून वडील लौकरीच येतील चिंता नाही दुसरे तीर्थस्वरूप राजश्री—काकासाहेब हाली लस्करसुध्धा कोट्यावर मुकाम करून आहेत रामपुऱ्यापावेतो आजम करनेल मरीचे सोबतीने गेले ते मोठें प्राणसंकटे दिवस काढिले बाबा करनेल मरीने काकास बहुतां प्रकारें छळिले बहुत उन्मत्त होऊन लुटोन घेईन म्हणोन कितेक दुर्भाषणे केली व रोजमऱ्यास ठिकाण नाही यावरून आजम मेजर साहेबासी जालीतसी बोलणीं पडत गेली व काकानी माघारे फिरोन फौजसुा यावे म्हणोन पत्रे गेली हे मेजरसाहेबास कललियावर त्यांणी जाल्या हकी[कती] मरीच्या मुंबईस लिहिल्यावरून आजम जनराल जूनसाहेब आले ते येथे भेट जाली बोलण्या-चालण्यांत बहुत तारीफदाना मनुष्ये दिसण्यात आला परंतु समागमाचे आंती गुणआवगुण ध्यानात येतील त्याविना काये समजते आस्तु आम्ही चितात आणिले जे तेथे जाऊन आपल्यास परिचये चेईल तो खरा माारनिले निघोन गेले मरी रामपुऱ्याहून पुढे कोट्याकडे निघाला काका माघारे मंजुसरपावेतो आले तो इकडून जूनसाहेब यांचे लस्करात जाऊन पोहचले परस्परे मुलाकात होऊन ते दिवसी आगतस्वागत जाले चाउपरांत जनरालसाहेबी तुम्ही माघारें का आला आतां मी नेतो तुम्ही चलावे त्यावरून मरीचे दुर्भाषणाचे भाव जे बोलण्यात आणिले होते ते मुस्तकीम जाहीर केल्यावरून त्यासही परम आश्चीर्ये वाटोन खुब आहे म्हणोन बोलले नंतर आतां त्यासी संमध नाही तुम्ही माझे भिस्तीवर चलावे सरदार व लोक चास समजोन सांगावे मी रोजगारीचा अैवज चालता व राहिला तो येथे देतो सध्या...[ऐव]ज नाही लस्करपावेतो लोकानी अैकिल्यास चांगले आहे न ऐकिल्यास बडोद्यास हुंड्या देतो आणि पुढे दरमहा तिलभाचे वेध न पडता देईन करनेल मरीची गरज तुम्हास नाही व तोहि आता जाईल किवा कारभार न करिता स्वस्त लस्करात राहाणार यावरून काकानीं सर्वास सांगितले परंतु करनेल मरीच्या गुणाआवगुणाचे दोश चिती स्मरोन लोक सरदार कबूल न करीत आडोन बसले त्यावरून जनरालसाहेब व काका दर सरदाराचे राहुटीस जावोन गळ्यात हात घालोन लोकासही बहुत तऱ्हेने समजोन सांगोन हामराहा केलें आणि रोजमऱ्याचा अैवज कांही तेथेही दिल्हा व येथे आजम मेजरसाहेबावर हुंड्या दिल्ह्या नंतर सर्वत्र त्याचे दोस्तीवर खुसी होऊन माघारे फिरोन कंपनीचे लस्कराबरोबर जाण्यास हामराह जाले अैवजही करारापाो जिकडिला तिकडे येथे मेजरसाहेबानी पार पाडिला यावरून ... हा मोठा संतोष जाहला मोठी कालजी पडली होती नंतर ... सर्व प्रकारे त्यांचे कश्यपी लागोन चुकलो तेव्हा करनेल मरी लाहान माणूस करून जाईल ते आपणास जनराल मुंबईपावेतो वाईट वाटोन वाकडेपणा पदरी यावयाची पाली श्रीने आणिली होती काका मागेच मंजुसराहून पुढे जाण्यास केवल कंठी प्राण आसावेत परंतु येथून लिहिली गेली यामुले रामपुरा प्रयासे पाहिला शेवटी लोकानी तर रोजमऱ्यासाठीं वगैरे जिवासी गाठ घालोन धरणी करू लागले म्हणोन निरोपाये जाणोन फिरले ते जनराल

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

जूनसाहेब जाऊन पोहचताच सर्वप्रकारे सुगम जाले मोठी चिंता जिवाची वारली याउपरि जनराल व काका कोल्यावर मिळोन जाऊन काकाचीही पत्रे जूनसाहेब बहुत थोर त्याची चाल व करणे. पाहून संतोष वाटला याच चालीने चालल्यास आटकेपावेतो मुलुक पाहावयास चिंता नाही यावरून उत[रे] त्वरित जाऊन पोहचावी व इकडोनही वरचेवर पत्री स[र्व] मजकूर लिहिण्यांत येऊन सांयात आपणास कलावे परंतु चेक चेक घोर निर्माण आहेत त्याचा निर्वाह करिता निसीदिवस या खाली गुजरोन तेही सोईसोईने विल्हेस लावावे कारण चहूकडून दौलतीत वोढा येऊन पडला यास्तव सर्वांची मनोधारणा रक्षोन करणे ह्याच मोठ्या बिडत्या पडून वागणें लागे आस्तु तेही सर्वप्रकारें कैलासवासीचे पुण्यंकरू[न पा]र पडत आहे चिंता नाही आपण दोन्ही पत्रे कलमचंदीवार लिहिली त्याची उतरें पों व्यारे यथील जमाबंदी ठराऊन दिल्ही त्याची चाद व बारा हजार रुपयाच्या हुंड्या चिठ्या च्यार पाा आहेत आणिखी ऐवज मागाहून पाठवितो म्हणोन लिाा ते कलले अैशास आपण व्यारे येथील जमाबंदी व धारा टाकानें ठराविली व यादी पाठविल्या त्यात जकातीचे कलम मोघम ठेविले व दंडफुरोईचे यादीत लेहून चौकसीनें होईल बेरीज ती··· [ध]रावी म्हणोन त्या यादीवरून सर्व मजकूर ध्यानात आले परंतु बाबा हा माहाल गुद्स्ता बतीस हजाराचा आकडा आहे त्याजवर चड बसवोन चालीस हजार ठराविले होते हे आपणासही किंचित समजण्यात आलेच आसल वाटते तेव्हां आपण ठराविले यांत तोटा [धे]ऊन सरकारात कसे पार पडल वरकड आपण तेथील चौकशी करण्यात कमी केले नसल ही मजला खातरजमा आहे व नजर पोहचल्यास आपण चौकसीत आलस करणार नाही याकरिता आपण तेथील बंदोबस्त चांगला ठेवावा कोण्हीकडून सरकारतोटा न व्हावा हे धोरण ठेवावे राजश्री नाना मोहनकर सुर्तेस बरे व्हावयास गेले आहेत यामुळे तीाा राजश्री बालबा काकान पुरुषोतमपंतास महाली रांना केले परंतु उपयोगी नाहीत म्हणोन आपले लेखात आले त्यास तेथील भिस्त कारकुनावर आपण ठेऊ नये आपण पाहणे ते वरचेवर पाहत जावे नाना बरे होऊन लौकर महाली गेल्यास मग ते बदोबस्त राखितील तोंपावेतो पुरुषोतमपंताच्यांनी सांभाळिल्यास आपण वहिवटून घ्यावें बहुतच बखेडा बंदोबस्त राहत नाही आसे आपले नजरेस आलियास कारकून आपले खातरजमेचा पाठऊन बंदोबस्त राखावा तीाा राजश्री बालबा काका येथे नाहीत व तीाा बापूही लस्करांत तेव्हा तेथील जुजरुसी आपल्यास नंतर राखणें याकरितां लिहिलेप्रो तेथील बंदोबस्त राखावा पो बेलसर येथील मामलतीचा मांाार लिाा त्याचा मजकूर पेसजी लिहिण्यावरून ध्यानात आलाच आसल बाबा मजलाही मोठे संकोच वाटोन लिहिण्यास हात चालत नाही आजपावेतो हो ह्या शब्दात ठेऊन शेवटी ना जाले हे मला कोठे प्रशस्त वाटले परंतु निरोपाचे वैगुण्य-आर्थ लाच्यारीमुळे शेटजीची मर्जी उलंघिता आडचणी बहुत पडतात माहालावरूनच खेपा करावे तरी त्याचे हाते लाखाचे रुपयाचे पेंच उलगडून घेणे न घेता परिणाम... कार्ये न जाले आस्तु चिंता करू नये भगवत्संतेनरूप होईल आगाध नाही जमीदार

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

यांजवर आदावत राजश्री नथोपंत करितील त्याची उस्तवारी करण्याचे लिहिले त्यास त्यांकडून जलालजाजती होऊ लागल्यास कलवावें लेहून बंदोबस्त करऊ बहुधा च्यातुर्मास आगोटपावेतो गुजरता घालमेलीचे घडल तसे पाहतों माझे मनात सहस्रगुणे आहे व लौकिकात येऊन न जाले हेही चिती प्रशस्थ वाटत नाही आसो याचा इतिहास लिहिल्यानी फल कोणते पो गावेसमंधे जमाबंदी आझेप्रो कांही गांवची जाली राहिले गांव तेही मापणी करोन ठरवितो नथोपंत आजून बखेडे करितात पाटलाचे नावे पत्रे लेहून तेथे बोभाट लिहीत आसतील त्यास करणे ते वाजवी करीत आहू म्हणोन लिहा त्यास बाबा आपण चौकसीने वाजवी कोण्हाचा पक्षापक्ष जलाल न करितां करितां त्यापेक्षा येथे शंभरानी गिला लिहिल्यास चिंता नाही व आप[ले लिहि]ण्यास माझी खातरजमा आहे सालमारीं दरोबस्त माहालांवर वधारे टाकिले गावे व भाटे आपले खाजगी तेथेही सर्वांप्रो व धारा जसा साधल तंसा साधावा हे धोरण आपले ध्यानात आहे त्यापेक्षा विशेष काये लिहावे लावणो आबादीचा वगैरे बंदोबस्त येथास्थित ठेवावा राजश्री दादाजी आपले आझेखेरीज पाऊल टाकणार नाहीत त्याचे चिरंजीवाचा वृ(त)बंध माघमासी करण्याचे योजिले आहे कांही खर्चाची बेगमी जाली पो म्हणोन लिहिले त्यास आपलेकडून वेतनासिवाये आडीचसेंपावेतो रुपये द्यावे त्यांचे पत्री लेहून पाठविले आहे बाबास लिहिले आहे त्याप्रो घेऊन वृतबंधाची कार्येसिध्दी करावी राजश्री कोन्हेरपंत तात्या पास पो टेजोरे (१) येथील जमाबंदीचा ठराव मुकडीसुत करून दिल्हा सरकारबेरीज चढवावी तर मांडवीकरासही सांगित... [चढवा]वी लागल म्हणोन [लिहिले] ते कलले ऐशास टेंजरे येथील जाबसाल आपण ठराऊन दिल्हा परंतु येथे कोण्ही दहा हजार रुपये चड देतो म्हणोन बोलत आहेत सावकारी निशा पत्रीही खातरजमेनी देतात तेव्हा आपण ठराविले या बेरजस पाहता आंतर फार पडते याचा विचार कसा हे लेहून पाठवावे वरकड तात्याचे ठाईं आमचा आती लोभ चालवावे कुटुंबवत्सळ त्याचे भलेपणावर येथे आम्ही कोणी बोलतात त्यांसी उतर करीत नाही परंतु तात्यानीही प्रतारणा न करिता वागावे म्हणजे पार पडल व चांगले आहे त्यास तेथील वैहिवाट तात्याची समजून घेऊन त्याणीही येथा आसल ते न प्रतारणा ठेविता आपणास समजवावे नंतर बंदोबस्त करून द्यावा येथेही बोलणा-रानी तथा ठेविली नाही आज सावकारी निशा देत आहेत हा मजकूर आपणास कलावा म्हणोन लिहा आहे [पेशजी]चे पेशकसीचे ठराऊन दिल्हे कडीसुध्धा बेरीज लिहिली ती कलली उतम केले पो ब्यारे येथील बारा हजार रुपयांच्या हुंड्या पाठविल्या त्या पावल्या राजश्री परभूदासशेठ याजकडे दिल्ह्या आणखी नजराणेप्रा सात हजारांच्या अेवजाकरिता निकड केली आहे त्याही हुंड्या पाठवणार उतम आहे अैशास आजपावेतों बारा हजार रुा रसदेपो आले तेव्हा वरकड भरणा कधी होणार इतर माहालचे फडशे होऊन चुकले आसतां या माहालचे अैवजास ठिकाण नाही याउपरि हांगाम तो कोणता याकरिता आपण तेथील वसुलाचा वगैरे किल्याप्रा

CC-0. Panjab Digital Library Collection. Digitized by eGangotri

बंदोबस्ताचे संधान बहुत प्रकारे ठेऊन अैवज वसुलात आणोन रसदेचा व खेरीज रसदी भरणा करावा पो घणदिवी चेथील पेशकसीचा मजकूर लिहिला येथे ठरावितो म्हणोन बापुसाहेबाचे पत्र आलें यास्तव वाद् पाठविली आहे तरी तेथे ठरऊन काये ते समजावे म्हणोन लिहेले त्यास आजम सिनोर मिंगलसाहेब यांचे बोलणें पडले आमचेकडे नारायेण वसियाचे वतनाची जफ्ती आहे त्यापेक्षां हकदस्तुर सरकारात सालमारी घ्यावयाचे ते येथेच ठराऊन द्यावे त्याप्रों फडशा करितों म्हणोन बोलो लागले तेव्हा तीर्थरूप राजश्री—बाबासाहेबी कबूल करून आपणास पत्र लिहून दिल्हे नंतर येथे ठरवावे हे ठीक नाही जाणोन सिनोर यास समजून सांगितले जे पेशकसीचा ठराव करणे तो बाबाकडे करून फडशा करावा हे उतम येथे निरानिराले करूं लागल्यास त्याणीं तरी काये करावे तुम्ही म्हणता आसेच सारे माहालकरी बोलो लागतील व म्हणत आहेत त्यासही निक्षूण सांगोन बाबाकडेच सोपिले तसेच तुम्ही करावे गुमस्त्यास लेहून पाठवावे ते बाबाकडे नवसरीस जाऊन ठराऊन घेऊन फडशा करून देतील बाबाही वरकडा माहालाप्रो चा माहालचे ठरावतील त्यावरून त्यांणीही पत्र तीर्थरूपाचे घेऊन परभारे गुमस्त्याकडे पाठविले आहे व सिनोराने आपले मेहत्यास लिहिले आहे ते आपणाकडे येतील त्याप्रो ठराऊन देऊन फडशा करून घ्यावा पो [वसरा]ई येथे साडेच्यार हजार रुपयाची वरात सिवराव कडूचे पागेची गुदस्ताचे अैवजावर आहे त्यास गोविंदराव-भाईजी श्रमी होऊन कबूल करितात परंतु सालमाार चेकसष्टीचे सालात मजुरा द्यावे म्हणोन त्याचे बोलण्यावरून लिहिलें ते कलले त्यास बाबा सरकाररीतीने निक्षूण चौकसी करितां येईल परंतु मामलेदार यास प्रशस्त वाटणार नाही जमीदार सुा चेक मास नवसरीस येऊन बसले रुजुवात पाहातां कश्यास ठिकाण न लागे हे चालीवर न्यावयाचें तोवरच विचार निक्षूण चौकसी करिता त्यास फार वाईट वाटल याकरिता त्याणी विचार पाहून समजून करावे वरात जाली आहे ती गुदस्ताचे अैवजात पार पाडून फडशा करून घ्यावा [मजु]रा पडणार नाही सालमाार रसद भरणा व खेरीज रसदी [ने]मिल्याप्रो जिकडील तिकडे भरावा येथे भाईजी आले तरी निक्षूण हाच जाबसाल सांगावयाचा पो वसराई व मरोली येथील जमीदारास हकदस्तुर नाही आठांवनचे सालात माहालात साधोन दिल्हे म्हणतात त्यास तेथेच काादार बोलणार त्यापेक्षा ठरऊन पाा म्हणोन त्यांस पेशकसीसमंधे बाबा सदर जाबसाल चेकच मामलेदार यांस सागितला येथे कोण्हाची रद्दबदल अैकत नाही बाबाकडे जाऊन त्याचे विाा तेथेच फडशा करून घ्यावा म्हणोन पस्ट सांगत आलो येथे रद्दबदली भीड कोण्हाचेच अैकावयाचे नाही आपण तेथेच ठराऊन फडशा करून घ्यावा तसेच काम करन !... ठरावावे तेथे उपन जमीदाराची काय होते आथवा माहालावर साधून घेणेच्या...यास येथील आत्र धरू नये आपण... सिनोर मिंगल साहेब यांसही हेच सांगितले आहे पाा बास[दा] चेथील पेशकसीचा मजकूर त्यांस माहालचे उपन कचे पाहून त्यात येक हजार रुपये आपलेकडून माफ करावे कारण परभुदास शेठ याजकडे मामलत

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

